**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ.शी.**: भारतातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या 374 जिल्ह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये स्थापन करण्याचा घेण्यात आलेला निर्णय

**पृ.शी.**: भारतातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या 374 जिल्ह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये स्थापन करण्याचा घेण्यात आलेला निर्णय या विषयावरील अतारांकित प्रश्न क्र. 3639 ला दिनांक 3 डिसेंबर, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, भारतातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या 374 जिल्ह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये स्थापन करण्याचा घेण्यात आलेला निर्णय या विषयावरील अतारांकित प्रश्न क्र. 3639 ला दिनांक 3 डिसेंबर, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

महोदय, भारतातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या 374 जिल्ह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये स्थान करण्याचे शासनाने घोषित केलेले आहे, त्या अनुषंगाने मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

महोदय, एकीकडे राज्यात अस्तित्वात असलेली महाविद्यालये मग ती कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांचे असतील अशा पदवी महाविद्यालयात असलेली विद्यार्थ्यांची क्षमता आणि दरवर्षी होणारे प्रवेश हे देखील या अनुषंगाने लक्षात घेण्यासारखे आहे. सध्या अस्तित्वात असलेली महाविद्यालये विशेषकरुन अनुदानित महाविद्यालये आहेत. त्यात सुध्दा पुरेशी विद्यार्थी संख्या नाही. शासन मात्र दरवर्षी नवनवीन महाविद्यालयांना परवानगी देऊन त्यात आणखी वाढ करीत आहे. गेल्या दोन वर्षापूर्वी मोठ्या प्रमाणात कायम विना अनुदानित तत्वावरील महाविद्यालयांना शासनाकडून परवानगी देण्यात आली. डिसेंबर, 2001 मध्ये शासनाने कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता देण्याचे धोरण स्वीकारुन त्या माध्यमातून मंत्री महोदयांनी त्यांच्या कारकिर्दीत एक चांगला निर्णय घेतला. पण ग्रामीण भागातील मुलींना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांना उच्च



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

शिक्षणाचा फायदा मिळावा हा उदात्त दृष्टीकोन समोर ठेवून मंत्री महोदयांनी पुढाकार घेतला व प्रत्येक तालुका स्तरावर किमान एक तरी अनुदानित कॉलेज असावे असा क्रांतिकारक व ऐतिहासिक असा निर्णय घेतला, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. मग त्यात कॉमर्स, सायन्स किंवा आर्टस असे कोणत्याही फॅकल्टीचे महाविद्यालये असो त्याला अनुदान मिळेल. त्यामुळे खरोखरच आज ग्रामीण भागात विज्ञान, कला किंवा वाणिज्य शाखेला तालुका स्तरावर अनुदान मिळत आहे.

महोदय, हे सर्व करीत असताना एक महत्वाची गोष्ट लक्षात घेणे जरुरीचे आहे. ज्या आदर्श महाविद्यालयांसंबंधी शासनाने घोषणा केली ती नव्याने निर्माण करणार की अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनाच आदर्श करणार आहात, असा प्रश्न सुध्दा या निमित्ताने निर्माण होतो, त्याचे निराकरण मंत्री महोदयांनी करावे. त्याचबरोबर मंत्री महोदयांना मी विनंती करणार आहे की, ज्या संस्था अनुदानित महाविद्यालये चालवितात त्यातील इंटेक कॅपेसिटी पाहिली तर आजही 25 टक्के जागा रिक्त राहत आहेत. एकीकडे शासन या सर्व अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर करोडो रुपये खर्च करते पण नवीन महाविद्यालये देत असताना या गोष्टींचा कुठेतरी विचार करावा लागणार आहे, असे आमच्यासारख्या शिक्षक आमदारांना सुचवावेसे वाटते. कारण आम्ही शिक्षक आमदार म्हणून अशा सर्व गोष्टींचा अभ्यास करीत असतो. अशा प्रकारे नवीन महाविद्यालये देत असताना किंवा आदर्श महाविद्यालये तयार करण्याचा निर्णय घेतला त्याला आमचा विरोध नाही, ती आदर्श झाली पाहिजे असेच आमचेही मत आहे. कारण मागासलेले तालुके व जिल्हे आहेत त्या भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, याबद्दल दूमत असण्याचे कारण नाही. पण अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांवर त्याचा परिणाम होऊ नये याचाही विचार करणे गरजेचे आहे. यातील बरीच महाविद्यालये ही खाजगी संस्थांकडून चालविली जाणारी असली तरी शासनाच्याच तिजोरीतून त्यावर खर्च होत आहे त्यामुळे त्यासंबंधीची भूमिका घेण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

आदर्श महाविद्यालये सुरु करताना सध्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना काही धोका निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. यावर्षी नवीन महाविद्यालयांना परवानगी दिली जाणार आहे, अशी आम्हाला माहिती मिळालेली आहे. मला तर असे वाटते की, या राज्यामध्ये आता एकही नवीन महाविद्यालय स्थापन करण्याची गरज नाही. माननीय मंत्री अभ्यासू आहेत. त्यामुळे आमची त्यांच्याकडून अशी अपेक्षा आहे की, नवीन महाविद्यालयांना परवानगी देत असतांना जुनी महाविद्यालये अडचणीत येणार नाहीत, याचा विचार त्यांनी करावा. कोणाचे तरी हित साधायचे म्हणून मागेल त्याला महाविद्यालय देणे चुकीचे होईल. नवीन महाविद्यालयामुळे आज अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमधील प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. नवीन महाविद्यालयांमुळे जुन्या महाविद्यालयांना विद्यार्थीच मिळाले नाही तर ही महाविद्यालये संकटात येतील. त्यामुळे अस्तित्वात असलेली महाविद्यालये टिकली पाहिजेत, या दृष्टीने सरकारला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. आदर्श महाविद्यालये सुरु करीत असतांना अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांचा विचार शासन करणार आहे की नाही ? नवीन महाविद्यालये देत असतांना अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे, त्यांची कपॅसिटी किती आहे? याचा सुध्दा लेखा-जोखा घेण्याची वेळ आलेली आहे. हे सर्व तपासून नवीन महाविद्यालयांना परवानगी देण्याचा विचार शासनाने करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्यात तंत्रशिक्षण विद्यापीठ स्थापन केले जाणार आहे, अशा घोषणा गेल्या वर्षभरापासून आपण ऐकत आहोत. औरंगाबादच्या एका कार्यक्रमामध्ये आदर्श शिक्षकांना पुरस्कार देत असतांना तंत्रशिक्षण विद्यापीठ स्थापन होईल, अशा प्रकारची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण यांनी केली होती. त्यावेळी आम्हाला असे वाटले होते की, मागासलेल्या मराठवाडयामध्ये म्हणजे औरंगाबाद येथे विद्यापीठ येईल व मराठवाडयाच्या विकासाला गती मिळेल. हे विद्यापीठ औरंगाबाद येथे स्थापण्याबाबतची घोषणा होईल, म्हणून आम्ही कान लावून बसलो होतो. परंतु आमचा भ्रमनिरास झाला आहे. आजच्या वर्तमानपत्रात बातमी छापून आलेली आहे की, हे तंत्रज्ञान विद्यापीठ लोणारे येथे होणार आहे. लोणारे येथील डॉ.बाबासाहेब

....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठाची स्थापना 1989 मध्ये झाली होती. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, लोणारे येथे तंत्रज्ञान विद्यापीठ यापूर्वीच स्थापन झाले असेल तर पुन्हा नवीन तंत्रज्ञान विद्यापीठाची घोषणा का केली ? नवीन तंत्रज्ञान विद्यापीठ आणि लोणारे येथील पूर्वीचे तंत्रज्ञान विद्यापीठ यांच्यामध्ये काय फरक आहे ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने हे विद्यापीठ सुरु झाले असेल तर त्याला आपण अधिक बळकट कसे करणार आहात ? तसेच या विद्यापीठाचे रुपांतर तंत्रज्ञान विद्यापीठात कसे करणार आहात ? असे माझे मुख्य प्रश्न राहणार आहेत.

अध्यक्ष महोदय, केवळ तंत्रज्ञान विद्यापीठाची संख्या वाढवून चालणार नाही तर जे विद्यापीठ अगोदर पासून आहे ते सक्षमपणे चालविले पाहिजे, त्यामध्ये नवनवीन संशोधनात्मक अभ्यासक्रम सुरु झाले पाहिजेत. यादृष्टीकोनातून आपल्याला चालना द्यावी लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये 309 अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये असून त्यामध्ये 1.14 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एमबीएच्या 300 महाविद्यालयात 90 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एमसीएच्या व्यावसाय अभ्यासक्रमाची 114 महाविद्यालये असून त्यामध्ये 20 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा प्रकारे साधारणपणे तंत्रशिक्षणात 5.5 ते 6 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे विद्यार्थी स्वत:च्या पायावर कसे उभे राहतील, याबाबतचे शिक्षण त्यांना देण्याची आवश्यकता आहे व हे सर्व आपण व्यवसाय शिक्षणाच्या माध्यमातून देऊ शकतो. व्यवसाय शिक्षणाला अधिक गतीने चालना द्यावयाची असेल तर तंत्रज्ञान विद्यापीठाची तातडीने स्थापना होण्याची गरज आहे. लोणारे येथे आपण तंत्रज्ञान विद्यापीठ करणार असाल तर या घोषणेचे आम्ही स्वागत करु. कारण शेवटी महाराष्ट्र हे अखंड राज्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने सुरु असलेले तंत्रज्ञान विद्यापीठाचे जर आपण विद्यापीठामध्ये रुपांतर केले तर आम्ही निश्चितपणे स्वागत करु. परंतु ते लवकर आणि तातडीने झाले पाहिजे, अशी आमची भूमिका आहे.

सभापती महोदय, दुसरी घोषणा आम्ही वर्तमानपत्रात वाचली. आता राज्यात व्यवसाय शिक्षण विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. व्यवसाय शिक्षणासाठी राज्यात वेगळे विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे का ?  हा देखील महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 10.40

श्री.विक्रम काळे ...

मी तर असे म्हणेन की,तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षणाच्या माध्यमातून आय.टी.आय. किंवा एम.सी.व्ही.सी. वा किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या जेवढया शाखा राज्यामध्ये सुरु आहेत त्या सगळया शाखांचा अभ्यासक्रम एका छता खाली आणला तर ही योजना आपण अधिक चांगल्या प्रकारे राबवू शकू.म्हणूनच व्यवसाय शिक्षण आणि तंत्रशिक्षण यांना एकाच विद्यापीठा खाली आणण्याचा प्रयत्न भविष्यामध्ये शासनाने करावा अशी मी माननीय मंत्र्यांना या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो . माननीय मंत्री या प्रश्नाचे चांगल्या प्रकारे उत्तर देतील यात मला शंका वाटत नाही . त्याचप्रमाणे जे तंत्र विद्यापीठ होऊ घातलेले आहे ते किती महिन्यात सुरु करणार आहात आणि या तंत्र विद्यापीठाचे किती महिन्यात उदघाटन करुन राज्यातील तंत्र शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना न्याय देणार आहात याबाबतीत उत्तरामध्ये खुलासा करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांनी अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने दोन महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केली आहे आणि अतिशय महत्वाचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने या आयुधाचा वापर केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो तसेच त्यांचे अभिनंदनही करतो.

सभापती महोदय, आदर्श महाविद्यालयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी पहिला मुद्दा मांडला आहे. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,देशामध्ये नॅशनल नॉलेज कमिशन गठीत करण्यात आले होते आणि त्यामधून ग्रॉस एन्रोलमेन्ट रेशो ( जीआीआर ) हा महत्वाचा पॅरामिटर ठरविण्यात आला होता. म्हणजेच उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याचे प्रमाण देशामध्ये किती टक्के आहे हे काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता व त्यातून काही आकडेवारी समोर आली आहे. आपल्या देशात ग्रॉस एन्रोलमेन्ट रेशो म्हणजेच ग्रॅज्युएशनपर्यंत शिक्षण घेणा-यांचे प्रमाण किती आहे हे काढण्यात आले आहे.दहावी बारावीपर्यत ज्यांनी शिक्षण घेतले त्यापैकी किती विद्यार्थी ग्रॅज्युएट झ ााले याचे प्रमाण काढण्यात आले होते. त्यावरुन असे दिसून येते की ही टक्केवारी फक्त 9 टक्के एवढीच आहे म्हणजें दहावी बारावी नंतर फक्त 9 टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यत जातात. आपल्या राज्यात हे प्रमाण 13 टक्के आहे.देशाच्या सरासरीपेक्षा आपल्या राज्यात उच्च शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे परंतु विकसित देशातील प्रमाण जर आपण पाहिले तर ते प्रमाणे 60 टक्के एवढे आहे. म्हणजेच त्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा जास्त संख्या उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याची आहे.आपल्या राज्याला मोठा टप्पा आपल्याला ओलांडावयाचा आहे. केन्द्र सरकाराची एच.आर.डी. मिनिस्ट्री आणि यु.जी.सी.यांनी संपूर्ण देशाचा अभ्यास करुन एक योजना तयार केली होती देशाच्या सरासरीपेक्षा सुध्दा ग्रॉस एन्रोलमेन्ट रेशो कमी आहे अशा काही जिल्हयाची त्यांनी निवड केली होती . अशा प्रकारे देशात एकूण 374 जिल्हे आहेत.आपल्या राज्यामध्ये फक्त 7 जिल्हे आहेत तेव्हा या जिल्हयात देशाच्या सरासरीपेक्षा उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे या जिल्हयांमध्ये आदर्श महाविद्यालये स्थापन करावेत असे केन्द्र सरकारने ठरविले होते. त्या आदर्श महाविद्यालयासाठी केन्द्र सरकार काही निधी देणार आहे .राज्य शासनाच्या वतीने 100 टक्के हे आदर्श महाविद्यालय सुरु करावे,कोंणत्याही परिस्थितीत ज्या खाजगी संस्था आहेत परंतु ज्यांना अनुदान दिले जाते त्या संस्थेचा काही सहभाग घेण्यात यावा, तसेच पब्लिक प्रायव्हेट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही


VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 10.40

श्री.राजेश टोपे ...

पार्टिसीपेशनच्या माध्यमातून ही महाविद्यालये सुरु करावीत अशा प्रकारे केन्द्र सरकाराने एकूण तीन पर्याय आपल्याला दिलेले आहेत. अशा प्रकारे तीन पर्याय देऊन राज्य शासनाला आदर्श महाविद्यालयाची योजना राबविण्यास सांगण्यात आले आहे. ही महाविद्यालये सुरु करीत असतांना ज्या काही अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत त्यानुसार ती संस्था अनुदानित असली पाहिजे. आपण 2001 सालापासून अनुदान देण्याचे बंद केले असून कायम विनाअनुदानित तत्वावर संस्था देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना ही योजना राबविता येत नसल्यामुळे राज्य शासनाच्या वतीने परंतु युनिर्व्हसिटी कॉन्स्टीटयुएंट जी कॉलेजेस असतील त्या ठिकाणी ही योजना करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. जीईआर पेक्षा कमी प्रमाण असलेले आपल्या राज्यातील हे सात जिल्हे पुढील प्रमाणे आहेत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

यामध्ये विदर्भातील बुलढाणा आणि गडचिरोली हे दोन जिल्हे आहेत, मराठवाडयातील हिंगोली आणि जालना हे दोन जिल्हे आहेत व कोकणातील रत्नागिरी, रायगड व सिंधदुर्ग हे तीन जिल्हे आहेत. देशाच्या जीईआरपेक्षा कमी जीईआर असणारे हे सात जिल्हे असल्यामुळे केंद्र सरकारची ही योजना राबविण्याच्या दृष्टीने आम्ही मंत्रिमंडळासमोर गेल्यानंतर त्याला मान्यता मिळाली आहे. साधारणपणे एका कॉलेजवर 8 कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यामध्ये 2.67 कोटी म्हणजे वन थर्ड युजीसी देणार आहे, 5.33 कोटी म्हणजे टू थर्ड राज्य सरकार देणार आहे. या योजनेला कॅबिनेटने तत्वत: मंजूरी दिली आहे. तसेच, यामध्ये मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, हिंगोली जिल्ह्यातील संत रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विदर्भातील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ या सर्व विद्यापीठांना राज्य सरकारने सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी प्रस्ताव तयार करुन पाठविले आहेत. सदरचे प्रस्ताव राज्य सरकारच्या शिफारशीसह केंद्र सरकारच्या ह्युमन अँड रिसोर्सेस डिपार्टमेंटकडे आणि युजीसीकडे पाठविण्यात आले आहेत. येणाऱ्या बैठकीमध्ये याबाबतचा निर्णय होणार आहे. त्याबाबत मी कालच युजीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. त्यांची लवकरच बैठक होणार असून त्यामध्ये आपल्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येणार आहे. प्रस्तावामध्ये काही किरकोळ त्रुटी काढण्यात आल्या आहेत त्यांची पूर्तता दोन-तीन दिवसात करण्यात येईल. केंद्र सरकारचा एक तृतीयांश हिस्सा आणि राज्य सरकारचा दोन तृतीयांश हिस्सा अशाप्रकारे राज्य सरकार आणि केंद्र सरकारचे संयुक्तरित्या 8 कोटींचे हे डिव्हिजन होणार आहे. अशापध्दतीने ही विद्यापीठे कॉलेज चालविणार आहेत. त्याचे रिकरिंग एक्सपेंसेस, पगार वगैरेचा खर्च प्रत्येक विद्यापीठाने करावा अशाप्रकारचा प्रस्ताव आम्ही दिला आहे. मला याबाबत विश्वास वाटतो की, लवकरच युजीसीची त्या प्रस्तावाला मंजूरी मिळेल. हे कॉलेज कोणत्याही परिस्थितीत येत्या वर्षभरामध्ये सुरु करावयाचे आहे. कॉलेजचे नाव यासाठी आदर्श दिले आहे की, त्यावर अतिशय मोठया प्रमाणावर आपण खर्च करीत आहोत. सर्व सोयींनी युक्त असलेले हे महाविद्यालय असेल, त्यामध्ये कोणतीही कमतरता नसेल. म्हणून त्यासाठी मोठे बजेट देऊन, सर्व साधनसामग्री त्यांना देऊन ग्राऊंड, लॅबोरेटरी, लायब्ररी, अप टु डेट स्टाफ वगैरे सर्व इन्फ्रास्ट्रक्चर दिला आहे. त्याचप्रमाणे स्टाफचा पगारसुध्दा ग्रँटेड असल्यामुळे निश्चितपणे त्यामध्ये कोणतीही उणीव राहणार नाही. येणाऱ्या वर्षभरामध्ये हे आठ कॉलेज कोणत्याही परिस्थितीत आम्हाला सुरु करावयाचे आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D 2

DGS/ KGS/ KTG/

श्री. राजेश टोपे...

या महिनाभरामध्ये त्याला युजीसीकडून परवानगी मिळेल अशी अपेक्षा आहे. युजीसीकडून जर परवानगी मिळाली तर येत्या जून महिन्यापासून आपण हे कॉलेज सुरु करु शकतो. त्यासाठी सर्व ठिकाणी जमिनी घेऊन ठेवल्या आहेत. या कॉलेजकरिता आपल्याला इमारतींचे बांधकाम करणे इत्यादी अनेक गोष्टी ताबडतोबीने कराव्या लागतील. त्यासाठी शक्य असल्यास भाडे तत्वावर असलेल्या जागेमध्ये सुध्दा आपल्याला या वर्षी सुरु करता येतील. जर शक्य झाले नाही तर पुढील वर्षी निश्चितपणे ही सात आदर्श महाविद्यालये सुरु होतील असे मी आपल्यामार्फत या राज्याला आणि या सभागृहाला सांगतो.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी नवीन महाविद्यालयाबाबत विचारले आहे. त्याबाबत मी एवढेच सांगेन की, नवीन महाविद्यालयांच्या संदर्भात राज्य सरकारने अतिशय कडक धोरण स्वीकारले आहे. ही वस्तुस्थिती आहे की, मागील काळात त्या ठिकाणी कदाचित योग्य पध्दतीने निर्णय झाला नसेल, काही महाविद्यालयामध्ये विद्यार्थी मिळत नाहीत असा प्रश्न निर्माण झाला असेल. परंतु काही ठिकाणी अशा तक्रारी आल्या आहेत की, इन्फ्रास्ट्रक्चर नाही, पत्र्याच्या शेडमध्ये देखील कॉलेज चालविले जाते, मोडकळीला आलेल्या इमारतीमध्ये भाडे तत्वावर कॉलेज चालविले जाते ही परिस्थिती योग्य नाही. आपल्याला जर क्वॉलिटी इन एज्युकेशन आणावयाचे असेल, उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर यापुढे भरमसाठ कॉलेजचे वाटप करण्याचे राज्य सरकारचे धोरण राहणार नाही तर शिक्षणाच्या दर्जावर आमचा भर राहील. त्यादृष्टीने सध्या आहेत ते कॉलेज व्यवस्थितपणे चालले पाहिजेत म्हणून यापुढे कॉलेजना परवानगी देतांना ते सपूर्ण निकषात बसत असेल तरच परवानगी दिली जाईल. त्याकरिता या अधिवेशनामध्ये एक विधेयक आणले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 10:50

श्री.राजेश टोपे . . . .

ज्या अनुषंगाने आम्ही महत्वाच्या दोन तारखा बदलत आहोत. एक म्हणजे आतापर्यंत प्रत्येक वर्षी 31 डिसेंबरला विद्यापीठामार्फत शिफारस करुन त्यासंबंधीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात येत होता. आम्ही याबाबतीत असा निर्णय घेतलेला आहे की, आता 31 डिसेंबरच्या ऐवजी विद्यापीठांनी 15 मे पर्यंत प्रस्ताव पाठवावेत. जेणेकरुन आम्ही विद्यापीठाला जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे असे जवळजवळ साडेचार महिन्यांचा जास्त कालावधी दिलेला आहे आणि हा जास्त कालावधी याचसाठी दिला आहे जेणेकरुन विद्यापीठाने प्रत्येक कॉलेजचा प्रस्तावासाठी लोकल इन्क्वायरी समिती म्हणजे एल.आय.सी.पाठवून ज्या कॉलेजेस्नी मागणी केली आहे त्याठिकाणी इमारत आहे काय, पाच एकर जमीन आहे काय, त्यांची आर्थिक परिस्थिती कशी आहे, त्यांनी तेथे लायब्ररी, लॅबोरेटरीज इ.गोष्टींची सोय व्यवस्थित केलेली आहे की नाही आणि त्यांची मॅनेजमेंट तेथे कशा पध्दतीने काम करीत आहे, त्यांची परिस्थिती तसेच त्यांची आर्थिक कुवत कशी आहे, त्या संस्थेचा पूर्ण लेखाजोखा, त्यांचे सोशल स्टेटस कसे आहे, खरोखरच ते चांगल्या विचाराने काम करणारे आहेत काय, त्यांचे बॅकग्राऊंड कसे आहे, इ.गोष्टी तपासून पहाणे हा यामागील दृष्टीकोन आहे. म्हणून आम्ही विद्यापीठांना तीन-चार महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. त्यानुसार आम्ही त्यांना पूर्ण फॉरमॅट तयार करुन दिला आहे की त्याठिकाणी कशा पध्दतीने तपासणी करावयास पाहिजे. त्यामुळे बिनचूक तपासणी होईल आणि त्यानंतर ज्या कॉलेजेस्ची शिफारस होईल त्यामध्ये अत्यंत स्क्रिनिंग होईल आणि आपल्याला त्याठिकाणी जशा पध्दतीच्या सोयी-सुविधा हव्या आहेत, त्यानुसार सर्वकाही असेल तरच आम्ही कॉलेज देऊ. नाहीतर आम्ही उगीचच्या उगीच चेहेरे पाहून किंवा कोणीतरी शिफारस करीत आहे म्हणून कॉलेज देण्यात येईल असा प्रकार बिलकूल होणार नाही. त्यासाठीच आम्ही संबंधित कायद्यामध्ये दुरुस्ती करुन याच अधिवेशनामध्ये हा कायदा पास करुन घेण्याचा आमचा विचार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळेजी यांनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत नवीन कॉलेज .....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले त्या बद्दल मी त्यांचे स्वागत करतो. यापुढे नवीन महाविद्यालय देत असताना त्याठिकाणी जागा आहे की नाही,आर्थिक क्षमता आहे की नाही, हे तपासणार आहोत, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु आपण अजूनपर्यंत तशा प्रकारचे नियम केलेले नाहीत.आपण याबाबत सूचना देणे ही वेगळी गोष्ट आहे.परंतु शासनाला ही बाब कायद्यामध्ये आणावी लागेल.आपण ज्यावेळी एखादेपॉलिटेक्नीक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

महाविद्यालय देतो, तेव्हा त्याबाबत ए.आय.सी.टी.चे काही नियम आहेत, त्यासाठी नियमावली केलेली आहे. तशा प्रकारची नियमावली या महाविद्यालयांच्या बाबतीत सुध्दा करणार आहात काय आणि ती किती दिवसामध्ये करणार आहात ते महत्वाचे आहे आणि असे केले तरच त्यामध्ये पारदर्शकता येणार आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी तेच सांगितले की, याबाबतीत 100 टक्के परिपूर्ण जी.आर. काढून आम्ही विद्यापीठांना कळविलेले आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठे पूर्ण तपासणी करीत आहेत. मी मघाशी सांगितले त्याप्रमाणे आम्ही फॉरमॅट तयार केलेला असून, त्यानुसार माहिती भरावयाची आहे आणि त्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांच्या बाबतीत माहिती घ्यावयाची आहे आणि सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत, त्या स्वरुपाचा जी.आर.दि.30 ऑक्टोबर 2010 रोजी निगर्मित केलेला असून त्या अनुषंगानेच कॉलेजची तपासणी होणार आहे. त्यामुळे मी नवीन कॉलेजेस्च्या बाबतीत सभागृहातील सन्माननीय सदस्यांना विश्वास देऊ इच्छितो की, विद्यापीठांचा दर्जा हा आमचा मुख्य घटक राहील आणि ते जपण्यासाठी आम्ही नवीन कॉलेजच्या बाबतीत त्या अनुषंगाचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे ज्याठिकाणी कॉलेज सुरु करण्याची गरज आहे, त्याच ठिकाणी कॉलेज दिले जाईल आणि ते कॉलेज देत असताना तेथे 100 टक्के सर्व फॅसिलीटीज् उपलब्ध आहेत की नाही ते तपासूनच दिले जाईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही हाच विश्वास नवीन कॉलेज सुरु करण्याच्या बाबतीत सभागृहाला देऊ इच्छितो.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दुसऱ्या अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीच्या बाबत चर्चा उपस्थित केली आहे. मी स्वत: इंजिनिअर असून त्याबाबत अभ्यास केलेला आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, आज 13 बिगर कृषी विद्यापीठे आहेत. मुंबई पुणे, **B.A.M.U.** किंवा अमरावती या सर्व युनिर्व्हसिटीमध्ये पाहिले तर प्रत्येक ठिकाणी 50, 100, 300, 400 कॉलेजेस् आहेत.

यानंतर कु.थारात . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

या सगळया कॉलेजेसमध्ये प्रत्येक विद्यापीठनिहाय सिलॅबस वेगळा आहे. प्रत्येक विद्यापीठनिहाय परीक्षेच्या पध्दती वेगळया आहेत. दर तीन वर्षांनी सिलॅबस अपडेट व्हावयस पाहिजे. पण इंजिनियरिंग सारख्या क्षेत्रामध्ये बऱ्याच विद्यापीठामध्ये सिलॅबस अपडेट केला जात नाही. टेक्नॉलॉजी बदलते त्याप्रमाणे तो अपडेट व्हावयास पाहिजेत. अभ्यासक्रमामध्ये बदल व्हावयास पाहिजे. पण या सगळया गोष्टी केल्या जात नाहीत. म्हणून बऱ्याच ठिकाणी, बऱ्याच विद्यापीठांच्या इंजिनियरिंगच्या ग्रॅज्युएट्सना या परिस्थितीला सामोरे जावे लागते. अनेक इंडस्ट्रिज हाऊसेस इन्टरव्हयू घेतात तेथे त्यांना नवीन अभ्यासक्रम शिकलेले विद्यार्थी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना या सगळया गोष्टीचा निश्चित प्रकारे परिणाम सोसावा लागतो. या टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीमुळे काय काय साध्य होईल याबाबतीत मी सांगू इच्छितो. सगळया विद्यापीठांचे वेगवेगळे अभ्यासक्रम आहेत त्याऐवजी आता सगळया विद्यापीठांमध्ये एकच अभ्यासक्रम राहील, एकच डिग्री राहील. या विद्यापीठांशी इंडस्ट्रिज आणि इन्स्टिटयुटचे लिंकेज केले जाईल. इंडस्ट्रिजची मागणी असेल त्या पध्दतीचे या विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रम घेतले जातील. जेणेकरुन इंजिनियरिंगची डिग्री घेतल्यानंतर पुन्हा वेगळया प्रकारचे ट्रेनिंग न घेता त्या विद्यार्थ्यांना ताबडतोब नोकरी मिळू शकेल. हे साध्य करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करील या विद्यापीठांमध्ये संशोधन होईल. संशोधन वाढीस लागण्याच्या दृष्टिकोनातून अधिक मदत होईल, म्हणून टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी होणे आवश्यक आहे. टेक्नॉलॉली युनिव्हर्सिटी व्हावी आणि या महाराष्ट्र टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीच्या अनुषंगाने एक तंत्र शिक्षण विद्यापीठ या राज्यामध्ये व्हावे, अशी शासनाची निश्चितपणे अपेक्षा आहे. यासंदर्भातील प्रस्ताव लवकरच कॅबिनेटपुढे नेण्यात येईल. यामध्ये दोन-तीन प्रस्ताव आहेत. कॅबिनेट ज्या प्रमाणे ठरवेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागेल. लोणारे विद्यापीठाला कनव्हर्ट करावयाचे आहे. लोणारे विद्यापीठ एक 'Stand al0ne University' आहे, 'Unitary University' आहे. ते स्वंतत्र युनिव्हर्सिटी म्हणून काम करतात. या युनिव्हर्सिटीला Architecture, Pharmacy, Hotel Management हे तीन कोर्सेस अधिकचे जोडले आणि Unitary University ला खऱ्या अर्थाने Affiliated University चे स्वरुप देऊ शकलो तर अधिक

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

खर्च न करता, आहे त्या इन्फ्रास्ट्रक्चरचा वापर करुन हे विद्यापीठ निर्माण करता येईल आणि त्या विद्यापीठाला Web Based Governance देता येऊ शकेल. अस्तित्वात असलेल्या विद्यापीठांना सबसेंटर्स देऊ शकू, अशा प्रकारचा सुध्दा एक प्रस्ताव आहे. पण हे सगळे प्रस्ताव विभागाकडे आहेत. याबाबतीत मी एवढेच सांगेन की, कॅबिनेट जे ठरवेल ते आपल्याला मान्य करावे लागेल. पण मी या खात्याचा मंत्री म्हणून टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी लवकरात लवकर व्हावी, याबाबतीत फर्म आहे. कॅबिनेट अंतिम निर्णय घेईल. याच अधिवेशनामध्ये कॅबिनेटने अंतिम निर्णय घ्यावा आणि याच अधिवेशनात या संबंधीचे विधेयक इंट्रोडयुस होऊन ते पास व्हावे, या दृष्टिकोनातून या विभागाचा मंत्री म्हणून मी निश्चितपणे प्रयत्न करीत आहे. येणाऱ्या कॅबिनेटमध्ये किंवा आठडवडयाभरात नंतरच्या कॅबिनेटमध्ये याबबतचा निर्णय घेण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येतील एवढा विश्वास मी या ठिकाणी सभागृहाला देऊ इच्छितो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी उच्च शिक्षणाच्या संदर्भात या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे. मंत्री महोदयांनी चांगल्या पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे आणि या सभागृहाचे समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. 374 जिह्यांमध्ये आदर्श महाविद्यालये सुरु करण्यात येत आहेत. त्यासाठी केंद्र शासनाकडून 2/3 आर्थिक मदत मिळणार आहे तर 1/3 हिस्सा राज्य शासन टाकणार आहे. ही अत्यंत चांगल्या प्रकारची आणि सर्व प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर असलेली गुणवत्तापूर्ण महाविद्यालये सुरु करण्यात येत आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

या राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी अशी महाविद्यालये सुरु आहेत की, ज्या ठिकाणी पुरेशी विद्यार्थी संख्या आहे. ही महाविद्यालये ग्रामीण भागात आहेत. आपण असा एक निकष लावलेला आहे की, साधारणत: एका तालुक्यामध्ये एका शाखेचे एक तरी महाविद्यालय अनुदान तत्वावर असावे. ही जी नवीन महाविद्यालये आता आपण सुरु करणार आहात ती अनुदानावर असणार आहेत. त्यांना अनुदान मिळणार आहे. म्हणजे नव्याने सुरु होणारे महाविद्यालय अनुदानावर येईल. आता सुरु असलेली महाविद्यालये शहरी भागात आहेत. एका तालुक्यामध्ये सहा महाविद्यालये आहेत त्यापैकी 5 शहरी भागात आहेत. मी कल्याणचे उदाहरण नेहमी सांगत असतो. जी अनेक अनुदानित महाविद्यालये आहेत ती शहरी भागामध्ये आहेत. ही महाविद्यालये कल्याण शहरामध्ये आहेत. परंतु आमच्या टिटवाळ्याजवळ ज्या ठिकाणी एक हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेतात, जी मुले कधीही शिक्षण घेऊ शकली नसती, त्यांच्याकडून फक्त एक रुपया भरुन गोरगरिबांची, शेतकऱ्यांची हजारो मुले त्या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागातील त्या महाविद्यालयाला आपल्या निकषात बसत नाही म्हणून अनुदान देत नाही. एका तालुक्यात किमान एक तरी महाविद्यालय अनुदान तत्वावर असावे, एक तरी शाखा अनुदान तत्वावर असावी हा निकष लागू करताना आपण शहरी भागाचा विचार न करता ग्रामीण भागाचा विचार करावा. त्या तालुक्यामध्ये ग्रामीण भागात एक तरी महाविद्यालय असावे या दृष्टीकोनातून आपण विचार करावा, अशी माझी विनंती आहे. अन्यथा ही नवीन महाविद्यालये अनुदानावर येतील आणि वर्षानुवर्षे ग्रामीण भागामध्ये काम करणारी महाविद्यालये विनाअनुदान तत्वावरच राहतील.

सभापती महोदय, दुसरा जो तंत्रज्ञान विद्यापीठासंबंधीचा विषय आहे त्यामध्ये लोणरेचा प्रस्ताव आपल्या विचाराधीन आहे. लोणेरे येथे तंत्र विद्यापीठ आहे. त्या ठिकाणी चांगल्या प्रकारचे इन्फ्रॉस्ट्रक्चर उपलब्ध आहे. म्हणून खऱ्या अर्थाने आपल्या राज्यामध्ये कोकणाला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून लोणेरे येथे तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव आहे त्याचा आपण विचार करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

...2...

RDB/ KGS/ KTG/

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाने कायद्याप्रमाणे आता शिक्षण सक्तीचे केलेले आहे. त्याचा विचार राज्य शासनाने केला आहे की नाही ? सक्तीचे शिक्षण झाल्यानंतर या ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या वाढणार आहे. आता तालुक्याला महाविद्यालय देण्याचे शासनाचे जे धोरण आहे त्यामध्ये तालुक्यामध्ये किमान दोन तरी महाविद्यालये देण्याचे नियोजन शासन करणार आहे की नाही ?

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, हमारे मंत्री महोदय खुद इंजीनियर हैं, इसलिए उन्होंने हायर और टेक्नीकल एज्यूकेशन के बारे में डिटेल प्लान दे दिया है और यह बता दिया है कि वे भविष्य में क्या करने वाले हैं, इसलिए मैं शासन का और उनका अभिनंदन करता हूँ. मेरे 2 छोटे प्रश्न हैं. हमारे साथी श्री. मोते जी ने कहा कि ग्रामीण क्षेत्र के बारे में आपकी पॉलिसी है कि शहर के महाविद्यालय को आप अनुदान देते हैं और ग्रामीण क्षेत्र के महाविद्यालय को आप अनुदान नहीं देते हैं. आप विस्तृत पॉलिसी बना रहे हैं तो मेरा प्रश्न यह है कि क्या आप ग्रामीण क्षेत्र के महाविद्यालय को अनुदान देने की बात का इस पॉलिसी में समावेश करेंगे या नहीं ? ग्रामीण क्षेत्र में एक तालुका में कम से कम एक महाविद्यालय का कॉंसेप्ट ठीक है, लेकिन एक तालुका में ग्रामीण क्षेत्र में अगर ज्यादा महाविद्यालय की आवश्यकता है तो उसको आप अनुदान देंगे या नहीं ?

सभापति महोदय, आप अलग अलग विश्वविद्यालयों के अन्तर्गत 7 आदर्श महाविद्यालय खोल रहे हैं. मेरा दूसरा प्रश्न यह है कि यूनिवर्सिटी को यूनिवर्सिटी ग्रान्ट कमीशन के नार्म्स को लागू करने के लिए मंत्रालय या आपके विभाग की अनुमति की आवश्यकता है या नहीं, यू.जी.सी. के नॉर्म्स को यूनिवर्सिटी इनडिपेंडंटली लागू कर सकेगी या नहीं ?

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, नवीन आदर्श महाविद्यालये देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाच्या अंमलबजावणीचा विषय आपल्या समोर आलेला आहे. या संदर्भात ज्या दोन तीन शंका माझ्या मनात आल्या त्या मी उपस्थित करीत आहे. ही महाविद्यालये खाजगी शैक्षणिक संस्थांना दिली जाणार आहेत की, शासनच चालविणार आहे ? दुसरे म्हणजे या महाविद्यालयांमध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान या तीनच विद्याशाखा असणार आहेत की, आणखी अन्य विद्याशाखा असणार आहेत ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे....

तिसरा एक मुद्दा असा आहे की, या महाविद्यालयांची संलग्नता मग नागपूरचे महाविद्यालय असेल तर नागपूर विद्यापीठाशी असणार आहे की त्यासाठी वेगळी तरतूद करणार आहे, या महाविद्यालयांचे नियंत्रण एआयसीटीकडून होईल असे मला वाटत नाही. युजीसीकडूनच त्यांना डायरेक्शन्स मिळतील. एआयसीटीचा संबंध तंत्र शिक्षण विद्यापीठाच्या बाबतीत किंवा लोणारेसंबंधी असू शकतो. याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, तंत्र शिक्षण विद्यापीठ स्थापन करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची अर्ध्या-तासाची चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी म्हटल्या प्रमाणे शिक्षण हक्क कायदा मंजूर झाल्यानंतर भविष्यामध्ये या विद्यापीठांची संख्या वाढत जाणार आहे. त्या दृष्टीने राज्यात तंत्र शिक्षण घेणाऱ्यांची संख्या किती अपेक्षित आहे, त्याचे नियोजन करीत असताना शासनाला तंत्र शिक्षण विद्यापीठ स्थापन करीत असताना तो एक घटक विचारात घेण्याची आवश्यकता आहे.

याठिकाणी अन्य राज्यांचे अनुभव सांगू नयेत. मला नुकतीच शेजारच्या गुजरात राज्याची माहिती समजली आहे. गुजरात सरकारने बी.एड., डी.एड., एम.एड., या शिक्षण शास्त्रासाठी एक विद्यापीठ प्रस्तावित केलेले आहे. जर पिढी घडवावयाची असेल तर चांगले शिक्षक घडले पाहिजेत आणि त्यांना नोकरी मिळण्यापेक्षा शिक्षण किती मिळते हा महत्वाचा भाग असल्यामुळे शिक्षकांना अधिक प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी एक स्वतंत्र विद्यापीठाची कल्पना मांडली आहे.

दुसरा एक मुद्दा असा आहे की, संशोधन हा विषय महत्वाचा आहे. आपल्याकडे अभियांत्रिकी विद्यापीठे आहेत. त्यामध्ये संशोधन हा विभाग दुर्लक्षित राहिलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांना संशोधन करुन पुढे जायचे आहे त्यांना आपल्या राज्यामध्ये पुरेशी संधी उपलब्ध होत नाही. या संशोधनाच्या बाबतीत जर नियोजित तंत्र शिक्षण विद्यापीठात त्याच्यावरच अधिक भर दिला तर एक प्रकारे संशोधनातून पुढे जाणारी विज्ञानाची प्रगती साधली जाईल, ज्याची आपल्याला आवश्यकता आहे. आतापर्यंत ज्या स्ट्रींजस् देतो, ज्या ठरलेलेल्या आहेत त्यात मेकॅनिकल असेल, इलेक्ट्रिकल असेल, इलेक्ट्रॉनिक्स असेल, या विषयांचा वेगळ्या पध्दतीने जगभर विस्तार होत आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.हेमंत टकले.....

त्यामुळे नियोजित तंत्र शिक्षण विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय पातळीवर कोठे संलग्न करुन घेणे शक्य आहे काय, बाहेरच्या विद्यापीठाच्या बरोबरीने अधिक वेगाने प्रगती करण्यासाठी काही करता येईल का हा विचार शासन करील का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोते, सन्माननीय सदस्य श्री.जमा, सन्माननीय सदस्य श्री.साळुंखे, सन्माननीय सदस्य श्री.टकले या 4-5 सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या सर्वांनी ग्रामीण व शहरी भाग या दृष्टीने प्रश्न विचारले आहेत. एका तालुक्यात आर्टस्, कॉमर्स व सायन्स या मूलभूत फॅकल्टीज आहेत. प्रत्येक तालुक्याला एक तरी अनुदानित महाविद्यालय असावे असे धोरण शासनाने आखलेले आहे. राज्यात अद्याप ज्या तालुक्यामध्ये या तिन्ही फॅकल्टीजचे महाविद्यालय अनुदानावर आले नसेल त्या तालुक्यांच्या बाबतीत करुन संचालकांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या कमिटीच्या माध्यमातून प्रस्ताव मागविले जातात. त्यांच्याकडून प्रेझेंटेशन्स घेतले जातात. त्यापैकी जे प्रेझेंटेशन सर्वोत्तम असेल किंवा निकषामध्ये बसत असतील त्या महाविद्यालयाला अनुदान मंजूर केले जाते. तालुक्याच्या ठिकाणी शहरी भाग असतो, म्हणजे तालुक्याचे मुख्य गाव असते तेथे जास्त महाविद्यालये आहेत. याबाबतीत ग्रामीण भाग भौगोलिकदृष्ट्या कमी पडतो, ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.राजेश टोपे...

मी केवळ तालुका म्हणून नाही तर जिल्हा म्हणून सांगत आहेत. अनेक अर्ज आलेले आहेत. आपण सोलापूर, अहमदनगर जिल्हा घेऊ. विषय असा आहे की, प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाण हे जिल्ह्याचे टाऊन असते त्याला लागून तालुका असतो. काही झाले तरी जुन्या काळातील ग्राण्टेड कॉलेजेस असतात. त्यामुळे तालुक्यावर त्याचा परिणाम होतो आणि तालुक्याला कॉलेज मिळत नाही. म्हणून तालुक्याचे टाऊन हे अजून आम्ही विचारात घेतलेले नाही. परंतु जिल्ह्याचे शहर विचारात घेतले आहे. राज्यात 35 जिल्हे आहेत. या 35 जिल्ह्यांना त्यांचे जे लगतचे तालुके आहेत त्यांच्यावर अन्याय होतोय असे प्राथमिक दृष्टीकोनातून मत झालेले आहे. त्या दृष्टीकोनातून असा नवीन प्रस्ताव आणण्याचा प्रयत्न करीत आहोत की, जिल्ह्याच्या नावाचा जो ग्रामीण तालुका असतो त्याबाबतीत कॅबिनेट कडून मंजुरी घेता येईल का अशा प्रकारचा विचार सुरु आहे. मी खात्री देऊ इच्छितो की, अशा एका नवीन संदर्भाने आम्ही कॅबिनेट पुढे प्रस्ताव घेऊन जाऊ. त्यानुषंगाने ग्रामीण आणि शहरी असा जो अन्यायकारक प्रश्न निर्माण होतोय तो काही प्रमाणात तरी सोडविता येईल.

दुसरी महत्वाची बाब मी सांगू इच्छितो की, ही कॉलेजेस युनिव्हर्सिटीची, शासनाची असणार आहेत आणि ती ग्राण्टेड नसतील. ती युनिव्हर्सिटी कॉन्स्टिटयुअण्ट कॉलेजेस असतील. शासनाची त्यास मान्यता असून शासन 2/3 कॉण्ट्रिब्युशन देणार आहे. या कालेजेसवर विद्यापीठाचे डे टू डे नियंत्रण राहाणार आहे. ही आदर्श महाविद्यालयाच्या संदर्भातील माहिती मी आपणास सांगितली आहे. विद्यापीठाच्या संशोधनावर भर दिला पाहिजे असे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले. या बाबतीत मी एवढेच सांगेन की, आता कोलॅबरेटिव्ह एज्युकेशनची नवीन संकल्पना आलेली आहे. इन्स्टिटयुट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी ही देशातील प्राईम इन्स्टिटयूट समजली जाते. त्या ठिकाणी यु.एस. मधील विद्यापीठांबरोबर कोलॅबरेटिव्ह सिस्टिमने काम सुरु केलेले आहे.जॉईण्ट डिग्रीज आपण देत आहोत. यु.एस.ची इलोना युनिव्हर्सिटी आणि आयसीटीचा करार झालेला आहे. त्या माध्यमातून इलोना युनिव्हर्सिटी आणि आयसीटी अशी जॉईण्ट डिग्री कोर्स, स्टुडण्ट एक्सचेंज, फॅकल्टी एक्सचेंज सुरु केलेले आहे. टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी झाली तर या गोष्टींना निश्चितच वाव मिळणार आहे. यामुळे अधिक जास्त कोलॅबरेटिव्ह पध्दतीचे एज्युकेशन

..2..

होईल, रिसर्च होईल. यामुळे केवळ मॅकॅनिकल किंवा सिव्हिल विषयच नाही तर नॅनो टेक्नॉलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, बायो केमिस्ट्री यासारख्या विषयांना देखील पुढच्या काळामध्ये या युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून वाव मिळेल. टेक्नॉलाजी युनिव्हर्सिटी करण्याची आमची तयारी आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी ही युनिव्हर्सिटी लोणेरी येथे करावी असे सांगितले. मी काही फाईनल ॲथॉरिटी नाही. परंतु कॅबिनेटपुढे आम्ही विषय घेऊन जाऊ. एक गोष्ट निश्चित आहे की, टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी लवकरात लवकर स्थापन व्हावी या दृष्टीने आम्ही निश्चतपणे प्रयत्न करीत आहोत.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे

**मु.शी.**: कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"शालेय शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ७२२५-११०५० ची वेतन श्रेणी लागू असणे, चौथ्या वेतन आयोगात शालेय शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना व द्विलक्षी अभ्यासक्रमातील अधिव्याख्यात्यांना समान वेतनश्रेणी असणे व त्याचा लाभ मिळत असणे, ५ व्या वेतन आयोगात तंत्र शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना/अधिव्याख्यात्यांना निम्न वेतनश्रेणी देणे, शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थातील शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाप्रमाणे वेतनश्रेणी देय असूनही भेदभाव करणे व त्यांना वंचित ठेवणे, राज्यातील अनुदानित संस्थांमधील व शासकीय तंत्र निकेतनातील काही शिक्षकांना ७२२५-११०५० ची वेतनश्रेणी देणे, काहींना मात्र निम्न वेतनश्रेणी देऊन भेदभाव करणे, तंत्रशिक्षण विभागाने या विषयाकडे दुर्लक्ष करणे, शालेय शिक्षण विभागाप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचे मान्य करूनही कार्यवाही न करणे, सहाव्या वेतन आयोगात अधिव्याख्यात्यांसाठी वेतनश्रेणीचा उल्लेख नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, तंत्रशिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयात काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा हा प्रश्न आहे. आम्ही खूप भाग्यवान आहोत. या विभागासाठी अत्यंत चांगले मंत्री लाभले आहेत. खरोखर त्यांच्याकडून महत्वाच्या विषयांना आणि प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जातो. सभापती महोदय, मला एका गोष्टीबद्दल खेद व्यक्त करावासा वाटतो. वेगवेगळया विषयाच्या संदर्भात आम्ही अट्टाहास करुन विविध आयुधांचा वापर करतो आणि या सभागृहात वेगवेगळ्या विषयांची चर्चा उपस्थित करतो. त्या विषयावर आमचे म्हणणे मांडतो आणि मंत्री महोदय त्या संदर्भात उत्तर देत असतात. आजही पूर्वप्रमाणेच आम्हाला उत्तर दिले जाईल याची खात्री वाटते. त्यामुळे हा प्रश्न पूर्वीप्रमाणेच प्रलंबित राहणार का? यापूर्वी अनेकदा हा प्रश्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभागृहात उपस्थित झालेला होता. कोकण निवड मंडळाचा प्रश्न उपस्थित केला होता. शासनाने सभागृहात आश्वासन दिले होते की, याबाबत अन्याय झालेला आहे त्यामुळे ज्यांनी हा चुकीचा निर्णय घेतला त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. तीनच शिक्षक त्या विभागातील आहेत, त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले होते. मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना बोलावून एकदा नव्हे तर तीन वेळा माझ्यासमक्ष सांगितले होते. तीनच शिक्षकांचा हा प्रश्न आहे, त्यांची बाजू न्याय्य आहे, विभागाकडून अन्याय झालेला असल्यामुळे हा प्रश्न ताबडतोब सोडवावा असे मंत्री महोदयांनी सांगूनही दोन वर्षापासून अद्याप अधिकाऱ्यांनी याचा निर्णय घेतलेला नाही.

सभापती महोदय, दुसरा विषय असा होता की, तंत्रशिक्षण विभागातील शिक्षकांना कालबध्द पदोन्नती देण्यासंबंधी मंत्री महोदयांनी सभागृहात एक वर्षापूर्वी उत्तर दिले होते. सभापती महोदय, आपण देखील शासनाला निर्देश दिले होते की, तातडीने मुख्यमंत्र्यांना भेटून हा विषय मार्गी लावावा. एक वर्ष उलटूनही कार्यवाही झालेली नाही. आजही प्रश्न सोडविला जाईल असे मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु विभागाचे अधिकारी या आश्वासनाची पूर्तता करणार आहेत का? ज्या अधिकाऱ्यांनी या विषयाबाबत हलगर्जीपणा केला, ज्यांनी हा चुकीचा निर्णय घेतला, ज्यांनी आमच्या शिक्षकांवर अन्याय केला त्याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी आणि कोणती कारवाई करण्यात आली हे सदनाला कळविण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, प्लस 2 स्तरावर काम करणारे ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षक हे शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त काम करतात. शालेय शिक्षण विभागाने 3 जून, 2000 रोजी आदेश निर्गमित केले. त्यांना दिलेली वेतनश्रेणी चुकीची होती, ती वेतनश्रेणी या आदेशाने बदलण्यात आली. शालेय शिक्षण विभागाने उच्च माध्यमिक शिक्षकांना 7225-11050 ही वेतनश्रेणी 1 मार्च, 2000 पासून लागू केली. या निर्णयाची अंमलबजावणी झाली. मात्र तंत्रशिक्षण विभागामध्ये 56 पदे अशी आहेत, ज्या पदावर उच्च माध्यमिक शिक्षक काम करीत आहेत. या 56 पदांपैकी शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर काही शासकीय व अनुदानित महाविद्यालयांमध्ये 45 पदे भरण्यात आली आहेत. या 45 पदांपैकी 31 पदांवर काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांना 7225-11050 ही वेतनश्रेणी दिली जात आहे आणि 14 अधिव्याख्यात्यांना मात्र 6500-10000 ची वेतनश्रेणी दिली जाते. यापूर्वी

..3..



SGB/ KTG/ KGS/ 11:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

अनेकदा हा विषय सभागृहात चर्चेला आलेला आहे. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या विषयावर दिनांक 23 एप्रिल, 2010 रोजी नियम 93 अन्वये सूचना दिलेली होती. या सूचनेला शासनाने उत्तर दिले होते की, अन्याय झालेला असल्यामुळे तातडीने या संदर्भातील कार्यवाही करण्यात येईल. या संदर्भात तंत्रशिक्षण विभागामार्फत 11 जुलै, 2010 रोजी जीआर काढण्यात आला आहे. परंतु अद्याप त्या बाबतची कार्यवाही झालेली नाही. तंत्रशिक्षण विभागातील काही शिक्षक एकाच संस्थेत काम करीत असताना चार शिक्षकांना 7225-11050 ही वेतनश्रेणी लागू केली आहे.

नंतर के.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ........

दोन शिक्षक मात्र 6500-10000 हीच वेतनश्रेणी घेत आहेत. याची जाणीव संबंधित अधिकाऱ्यांना आहे, पण जाणूनबुजून या शिक्षकांवर अशा प्रकारे अन्यायकारक वेतनश्रेणी दिली जात आहे. विषय अत्यंत साधा, सोपा व सरळ आहे. पाचव्या वेतन आयोगामध्ये या शिक्षकांवर अन्याय केला आहे तसेच सहा वेतन आयोगात सुध्दा त्यांना योग्य ती वेतनश्रेणी मिळाली नाही. म्हणून मी स्पेसिफिक प्रश्न विचारला की, प्लस-2 च्या स्तरावर काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांना शालेय शिक्षण विभागाप्रमाणे 7225-11050 अशी वेतनश्रेणी दिली जात नाही. म्हणून अशा अधिव्याख्यात्यांना भूतलक्षी प्रभावाने व थकबाकीसह त्यांना देय असलेली वेतनश्रेणी शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच दिली जावी. तसेच सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी सुध्दा शालेय शिक्षण विभागाप्रमाणे देणार काय ? त्याचबरोबर पाचवा वेतन आयोग लागू होऊन 10 वर्षे झालेली आहेत तरी देखील ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे चुकीचा निर्णय घेतला व या शिक्षकांना त्यांच्या न्याय्य हक्कापासून वंचित ठेवले त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन योग्य ती कारवाई करणार काय ?

श्री. कपिल पाटील : मागील वेळेस मी सभागृहात हा मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. आता तर फक्त 14 लोकांपुरताच मुद्दा राहिलेला आहे. त्यावेळेस मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आमच्या विभागाची चूक झालेली आहे. पण ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे ते पदवी शिक्षक नव्हे तर पदव्युत्तर शिक्षक आहेत. अशा शिक्षकांना जी वेतनश्रेणी देण्याची गरज होती ती नाकारण्यात आली व त्यात विभागाचीच चूक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे एक आठवड्याच्या आत भूतलक्षी प्रभावाने या शिक्षकांना त्यांची न्याय्य वेतनश्रेणी देण्याबाबतचा शासन निर्णय काढून ही चूक दुरुस्त करण्यात येईल व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट सांगितले होते. या तिन्ही वाक्यानंतर मी थांबलो होतो आणि मंत्री महोदयांना धन्यवाद दिले होते. पण गेल्या वर्षभरात यापैकी काहीच झालेले नाही. फाईल्स फक्त इकडून तिकडे फिरत आहेत. या कामात अधिकारी जाणूनबुजून टाळाटाळ करीत असल्याचे त्यांच्या नावासह मी सांगितले होते. परंतु या अधिकाऱ्यांनी ठरवूनच सांगितले की, तुम्ही आमची बदनामी करता, मी ते होऊ देणार नाही. असे अधिकारी बोलतो हा एक प्रकारे सभागृह व मंत्री महोदयांचाही अपमान आहे, कारण अगदी मुठभर शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रस्ताव नाकारला जातो

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ........

व त्यामध्ये जी चूक झाली ती मंत्री महोदय सुध्दा कबूल करतात. पण हे अधिकारी कोण असे शहाणे लागून गेले की मंत्री महोदयांचाही अपमान करण्यास मागे पुढे पाहत नाहीत ? म्हणून किमान आजच्या आज सभागृहाची बैठक संपेपर्यंत यासंबंधीचे निवेदन मंत्री महोदयांनी करावे. मला सूडबुध्दीने वागायचे नाही परंतु ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये फाईल अडकवून ठेवण्याचे काम केले त्यांना वित्त विभागात पाठवावे. तेथे त्यांना कळू द्या की आपण शिक्षकांवर जाणीवपूर्वक कसा अन्याय केला आहे ते. यासंबंधीचा निर्णय मंत्री महोदयांनी घेऊन या 14 शिक्षकांना न्याय मिळवून देणार काय ?

श्री. भगवान साळुंखे : महोदय, या शिक्षकांना न्याय मिळाला नाही म्हणून त्यांनी येत्या 28 तारखेला "घंटानाद आंदोलन" करण्यासंबंधीची नोटीस दिलेली आहे, ती शासनाला मिळाली आहे. तसेच याबरोबरच त्यांच्या अजून बऱ्याच मागण्या आहेत. माझा या निमित्ताने प्रश्न आहे की, शासन या शिक्षकांबरोबर वाटाघाटी करणार काय ?

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत**

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, सभागृहात गेल्या वर्षभरात शिक्षकांच्या वेतनश्रेणीसंबंधी एकूण किती तास चर्चा झाली आहे यासंबंधीची स्पेसिफिक इन्फॉर्मेशन काढलेली आहे काय ?

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळेस उभे राहून मंत्री महोदयांनी जे आक्षेपार्ह विधान केलेले आहे ते कामकाजातून काढण्याची मागणी करीत असतात.)

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : ठीक आहे, मंत्री महोदयांनी केलेले वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आमच्यासारखे उत्कृष्ट शिक्षक असल्यामुळेच माननीय मंत्री महोदयांसारखे उत्कृष्ठ मंत्री घडतात, हे सभागृहाने विसरु नये.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी वेतनाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला आहे व त्यासंदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्या मला मान्य आहेत. चवथ्या वेतन आयोगाच्या वेळी वेतन समान होते परंतु पाचव्या वेतन आयोगामध्ये तफावत आहे, ही बाबही मला मान्य आहे. एफटीटी आणि अधिव्याख्याता यांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. अधिव्याख्यात्यांच्या स्केल हया शालेय शिक्षण विभागाने वाढवून घेतलेल्या आहेत. टेक्नीकल स्कूलच्या संदर्भात काही लोकांना 7250 व काहींना 6500 अशा स्केल्स देण्यात आलेल्या आहेत. ही जी तफावत आहे, ती दूर केली जाईल, असा शब्द मी सभागृहाला दिला होता. जो शब्द मी दिला होता, तो मी मान्य करतो. हा प्रश्न सुटावा, असा जो आपला आग्रह आहे, तो अतिशय रास्त आहे. यासंदर्भात मी व्यक्तिगत स्तरावर प्रयत्न केला होता. परंतु काल बजेट असल्यामुळे वित्त विभागाकडून हे प्रकरण निघू शकले नाही. आमच्या डिपार्टमेंटमधून व फायनान्स डिपार्टमेंटमधून ज्या त्रुटी रहात होत्या त्यामुळे या बाबीला उशिर झालेला आहे, हे मी मान्य करतो. त्यामुळे मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर ही तफावत निश्चितपणे दूर केली जाईल व यासंदर्भातील जीआर निश्चितपणे काढला जाईल. वित्त विभाग व आमचा विभाग ॲक्रास दि टेबल बसून हा प्रश्न कसा सुटू शकेल याबाबतीतील निर्णय नक्की घेण्यात येईल. मी अगोदर जे काही बोललो होतो त्या बाबतीत मी फर्म आहे. तफावतीच्या संदर्भात जो उशीर झालेला आहे, त्या बाबतीत मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अधिका-यांची चौकशी करण्यात यावी, अशा प्रकारची मागणी केलेली आहे. त्यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, कधी कधी सगळया गोष्टी बरोबर होत असतांना फाईलची विनाकारण टॉसिंग होते किंवा दुर्लक्ष केले जाते. मी तर असे म्हणेण की, ख-या अर्थाने सभागृहात काही गोष्टी ठरत असतात, आश्वासने दिली जातात. सभागृहातील आश्वासनांना जर अधिकारी सहज घेत असतील तर ही वृत्ती अतिशय निषेधार्ह आहे, चुकीची आहे. महिन्याभरात काम केले जाईल, अशा प्रकारचे आश्वासन सभागृहात दिले व त्याला दोन-तीन महिने लागले तर एक वेळ आपण समजू शकू. परंतु त्याला जर एक-एक वर्ष लागत

श्री.राजेश टोपे.............

असेल तर योग्य नाही. त्यामुळे यासंदर्भात मुख्य सचिवांना चौकशी करण्यास सांगितले जाईल. विलंबास कोण जबाबदार आहे, कोणत्या अधिकाऱ्याकडे जास्त दिवस फाईल राहिली, यासंदर्भात चौकशी करुन कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुख्य सचिवांच्या चौकशीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला जाईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना चौकशी करण्यास सांगितले जाईल व जितक्या लवकर होईल तितक्या लवकर अहवाल देण्याचे त्यांना सांगण्यात येईल.

यानंतर श्री.गायकवाड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी जे आश्वासन दिले आहे त्यामुळे माझे समाधान झालेले आहे. माननीय मंत्र्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. यासंबंधीचा जी.आर. काढण्यासाठी हाच विषय पुन्हा आम्हाला सभागृहात नव्याने आणावा लागू नये,अशी अपेक्षा करतो या प्राध्यापकांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतन श्रेणी देण्यांसबंधीचा उल्लेख जीआर मध्ये करण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : त्या बाबतीत मी एवढेच सांगतो की, जी ॲनॉमली राहिलेली आहे ती दूर करण्यात येईल त्याचबरोबर जे नियमात बसत असेल त्याप्रमाणे करण्यात येईल . त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी देणे हे जर नियमात बसत असेल तर त्याप्रमाणे देण्यात येईल. या संदर्भात मी एक बैठक घेईल व त्या बैठकीसाठी सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते व श्री कपिल पाटील यांना बोलावून तेथल्या तेथे हा प्रश्न सोडविण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. कोल्हापूर जिल्हयात जीवनदायी योजनेतील औषध खरेदीत झालेला भ्रष्टाचार

मु.शी. कोल्हापूर जिल्हयात जीवनदायी योजनेतील औषध खरेदीत झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

श्री.जयंत प्र.पाटील ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा - तास चर्चा उपस्थित करतो.

" शासनाच्या वैद्यकीय शिक्षण संचालनालयाचे औषध खरेदीचे दर करार उपलब्ध असताना जीवनदायी योजनेसाठी सन 2005 ते 2009 या कालावधीत शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने कोल्हापूर जिल्हयासाठी जी औषध खरेदी केली त्या दर कराराचा आधार घेत संपूर्ण राज्यातील औषध खरेदीच्या नावाखाली कोटयावधी रुपयांचा चुराडा करणे, विशेष म्हणजे कोल्हापूर जिल्हयासाठी खरेदी केलेली औषधे संपूर्ण राज्याला लागू करण्याच्या निर्णयाला वित्त विभागाची मान्यता न घेणे, मुर्तिजापूर जिल्हा (अकोला) येथील सरकारी दवाखान्यात त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांतर्गत 30 कोटीची औषधे खरेदी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिका-याने लेखा कोषागारातील अधिका-यांना हाताशी धरुन बोगसपणे खरेदी करणे, जानेवारी 2010 च्या तिस-या आठवडयात वरील बाबीसंबंधी आरोग्य संचालक यांना खुलासा करण्याचे आदेश सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी देणे, त्यांनी आदेश देऊनही आरोग्य संचालकांनी त्याबाबत मुदतीत खुलासा न करणे, कोल्हापूरच्या उप संचालकांनी अधिकार नसताना औषधांच्या खरेदीचा दर करार केला कसा आणि तो दरकरार संपूर्ण राज्यासाठी 4 वर्षे कोणाच्या आदेशाने राबविण्यात आला यासबंधी राज्यातील जनसामान्यांची भावना लक्षात घेऊन शासनाने याबाबत केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना "

सभापती महोदय, शासनाच्या वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने कोल्हापूरमध्ये औषधे खरेदी करण्यासाठी जे टेंडर काढले होते त्यानुसार ही खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये

2..



VTG/ D/ ST/ KTG/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 11.30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गैरव्यवहार झाला आहे व संबंधिताविरुध्द कारवाई केलेली आहे याची मला जाणीव आहे. हा गैरव्यवहार झाल्यानंतर दोन तीन वर्षांनी ही अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात येत आहे. औषध खरेदीमध्ये जो गैरव्यवहार झाला आहे, तो प्रकार पुन्हा घडणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे काय, या गैरव्यवहाराची चौकशी होऊन सबंधित दोषी अधिका-याविरुध्द कारवाई झाली आहे काय, कोल्हापूर प्रमाणे अकोला जिल्हयात मूर्तिजापूर येथे सुध्दा अशाच प्रकारे खरेदीमध्ये गैरव्यवहार झालेला आहे अकोला जिल्हयामध्ये 30 कोटी रुपयांची ओषध खरेदी करण्यात आली असून त्याची देखील चौकशी शासनाने केली आहे काय , कोण कोणत्या अधिका-याविरुध्द कारवाई केली होती ? याबाबत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र पाटील यांनी जीवनदायी योजनेतील औषध खरेदीत आणि अकोला जिल्हयातील मूर्तिजापूर येथील औषध खरेदीत झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. जीवनदायी योजनेसाठी कोल्हापूर जिल्हयामध्ये जी औषध खरेदी करण्यात आली होती त्यात मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून माननीय मत्र्यांना मी विचारु इच्छितो की , आतापर्यत अशा प्रकारच्या किती चौकशाची प्रकरणे प्रलंबित आहेत , त्याचबरोबर या चौकशीचे पुढे नेमके काय झाले आहे ? सभागृहामध्ये चर्चेच्या वेळी अनेक चौकशा प्रस्तावित केल्या जातात परंतु त्याबाबतीत काय झाले हे समजत नाही व संबंधितावर कारवाई देखील होत नाही त्यामुळे भ्रष्टाचार करण्यास संबंधित व्यक्तीला पुन्हा मोकळे सोडले जाते मूर्तिजापूर येथील औषध खरेदीसंबंधीचे प्रकरण तर फारच जूने आहे त्या चौकशीच्या बाबतीत शासनाने कोणती पावले उचलली आहेत, त्यातील किती अधिका-यांची बदली केली व किती अधिका-यांना निलंबित केले आहे ? त्याचबरोबर जीवनदायी योजनेमध्ये जी औषध खरेदी केली जाते त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की दर करारा प्रमाणे औषधाची खरेदी न करता त्या व्यतिरिक्त औषधाची खरेदी करण्यात येते. तेव्हा अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासन काय करणार आहे ? याबाबत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी अकोला जिल्हयातील मूर्तिजापूर येथे औषधखरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहारासबंधीची अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे . 2006 मध्ये हा प्रकार घडला असून 2008 साली त्या व्यवहाराचे स्पेशल ऑडिट करण्यात आले होते त्या गैरव्यवहारामध्ये जे कर्मचारी आणि अधिकारी दोषी आढळून आले अशा 31 लोकांच्या विरुध्द कारवाई केलेली आहे.23 लोकांना निलंबित करण्यात आलेले आहे . यासबंधी एफआयआर दाखल करण्यात आला असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे आणि अमरावती सेशन कोर्टामध्ये हे प्रकरण सध्या प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जीवनदायी योजनेतील औषध खरेदीसबंधी प्रश्न विचारला असून त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या संदर्भात नागपूर अधिवेशनामध्ये सभागृहामध्ये आश्वासन देण्यात आले होते आणि हे प्रकरण ॲन्टी करप्शन ब्युरोकडे पाठविण्यात आले होते.या विभागाचे सचिव ॲन्टी करप्शन ब्युरोच्या प्रमुख अधिका-याबरोबर कालच बोलले असून त्यांचा प्राथमिक अहवाल तयार झालेला आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

त्यामध्ये फक्त कॉस्ट व्हेरिफिकेशन व्हावयाची आहे. शासनाला त्या प्रकरणामध्ये किती प्रमाणात नुकसान झाले आहे हे व्हेरिफाय करण्यासाठी एजन्सीकडे काम सोपविले आहे. त्यांचा अहवाल दहा ते पंधरा दिवसात अँटी करप्शनकडे येईल. त्यांनी शासनाला प्रिलिमिनरी रिपोर्ट पंधरा दिवसात देतो असे आश्वासन दिले आहे. तो रिपोर्ट आल्यानंतर त्यावर कारवाई करण्यात येईल आणि त्याची माहिती सभागृहाला देण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ज्या 31 लोकांना निलंबित करण्यात आले आहे ते शासनाच्या सेवेत आहेत काय? ज्यांना निलंबित करण्यात आले आहे त्यापैकी किती लोक सेवानिवृत्त झाले आहेत?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 31 पैकी 23 अधिकारी व कर्मचारी निलंबित झाले आहेत. एका अधिकाऱ्याची सेवा समाप्त करण्यात आली आहे, 5 लोक सेवानिवृत्त झाले आहेत, 2 जणांना निलंबित केल्यानंतर व त्यांची सेवा खंडीत केल्यानंतर पुन्हा कामावर घेण्यात आले आहे. या प्रकरणी कोर्टामध्ये केस चालू असून तिचा निकाल लागल्यानंतर त्यांच्यावर अंतिम कारवाई करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्हयातील नगर परिषदेच्या अध्यक्षांनी नियमबाह्य पध्दतीने सेग्रीगेशन मशीन खरेदी करणे

**मु. शी.** : चंद्रपूरच्या नगराध्यक्षांनी नियमबाह्य पध्दतीने सेग्रीगेशन मशीन खरेदी करणे यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या अध्यक्षांनी माहे सप्टेंबर, 2010 मध्ये नागपूर (काटोल) येथील युनिव्हर्सल इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून रुपये 13 लाख 50 हजार किंमतीचे सेग्रीगेशन (घन कचरा व्यवस्थापन) मशीन खरेदी करणे, सदर मशीन खरेदी करताना सभागृहात ठराव न घेता व निविदा प्रकाशित न करता खरेदी करणे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना सुध्दा सदर खरेदीची कल्पना नसणे, सदर मशीन खरेदीवर नगरसेवकांनी आक्षेप घेऊन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे तक्रार करणे, सदर मशिनची आवश्यकता नसताना लाखो रुपये खर्च करुन त्यात केलेला गैरव्यवहार याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

सभापती महोदय, मूल नगरपालिका ही चंद्रपूर जिल्हयातील नगरपालिका आहे, या नगरपालिकेच्या नगराध्यक्षांचा कारभार गेल्या चार-पाच वर्षापासून अतिशय गोंधळामध्ये सुरु आहे. या नगरपालिकेने गेल्या दहा वर्षापूर्वी एक फायरब्रिगेड घेतले होते. परंतु गावामध्ये आग लागल्यानंतर बल्लारपूर, चंद्रपूर, ब्रम्हपूरी किंवा गडचिरोलीहून फायरब्रिगेडला बोलाविले जाते. ते येईपर्यंत दीड तास लागतो, तेवढया कालावधीमध्ये ते गाव आगीने बेचिराख होते. याकरिता सर्व नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांना, जिल्हाधिकाऱ्यांना नवीन फायरब्रिगेड खरेदी करण्याबाबत सूचना केली. त्याप्रमाणे नगरपालिकेमध्ये तशाप्रकारचा ठराव संमत करावा अशी अपेक्षा होती. एप्रिल 2010 रोजी कलम 93 (8) अन्वये नगरपालिकेने ठराव केला. तो करीत असतांना घन कचरा मशीन खरेदी करण्याबाबतचा ठराव त्याला जोडण्यात आला. वास्तविक पहाता नगरपालिकेच्या नगरसेवकांची घन कचरा मशीन खरेदी करण्याची इच्छा नव्हती तर केवळ फायरब्रिगेड खरेदी करावे अशी अपेक्षा होती व तेवढाच ठराव संमत करावा असे ठरविण्यात आले. परंत घन कचरा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्रीमती शोभा फडणवीस....

मशीन खरेदीचा ठराव त्या ठरावाला जोडल्यामुळे सर्व नगरसेवकांनी त्या ठरावाविरुध्द जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील केले. जिल्हाधिकाऱ्यांनी 28 एप्रिल 2010 रोजी फक्त फायरब्रिगेड खरेदी करण्यास परवानगी दिली. ती परवानगी देतांना त्यांनी नगरपालिकेमध्ये ठराव संमत करा, निविदा काढा आणि त्यानंतरच फायरब्रिगेड खरेदी करा असे सांगितले. यासोबत घन कचरा मशीन खरेदी करु नका अशाप्रकारचे लेखी आदेश दिले. परंतु जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशाला नगरपालिकेच्या अध्यक्षांनी सरळ सरळ कचऱ्याची टोपली दाखविली आणि नगरपालिकेचा एकही ठराव संमत न करता, नगरसेवकांचा ठराव संमत न करता त्यांनी फायरब्रिगेड व घनकचरा मशीन खरेदी केली. त्यांनी स्वत:च्या मर्जीने या दोन गोष्टी खरेदी केल्या. सप्टेंबर 2010 मध्ये त्यांनी पुन्हा विशेष सभा घेऊन त्यांना परवानगी मिळविण्याचा प्रयत्न केला. सप्टेंबर 2010 मध्ये ठरावाच्या दिवशी सर्व नगरसेवकांनी बहुमताने घन कचरा मशीनला विरोध केला. त्यामुळे आता मशीन खरेदी होणार नाही असे सर्वांनाच वाटत होते. परंतु नगराध्यक्षांनी फायरब्रिगेड खरेदी करतांना त्यासोबत घन कचरा मशीन सुध्दा खरेदी केली. त्यांनी कुणालाही न विचारता 13 लाख 50 हजाराचे मशीन खरेदी केले. हे मशीन त्यांनी काटोल येथील युनिव्हर्सल इंजिनिअरींग वर्क्स या कंपनीकडून कोणतीही निविदा न काढता मुख्याधिकाऱ्यांना न सांगता खरेदी केले व ते नगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापनासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये आणून ठेवण्यात आले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:40

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

ही दोन्ही मशीन दि. 21 मार्च 2011 रोजी आणली आणि आज 24 मार्च 2011 आहे. परंतु अजूनही घनकचरा मशीनचा कोणताही वापर केलेला नाही.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : मी सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपले मुद्दे लवकर मांडावेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मला मुद्दे मांडू द्यावेत. मी या चर्चेसाठी 3-4 दिवस थांबले आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, आज आपल्याला कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या सर्व अर्धा तासाची चर्चा संपवावयाच्या आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्ही अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यासाठी सदनामध्ये 3-3 दिवस येतो, दिवसभर उपस्थित रहातो. परंतु ती चर्चा दरवेळेस पुढे ढकलली जाते. आज येथे ही चर्चा उपस्थित करण्यासाठी मला संधी मिळाली आहे, त्यामुळे आता तरी कृपा करुन ती मांडू द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे लवकर मांडावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, अजूनही घनकचरा त्या इमारतीच्या जवळ न टाकता तलावाच्या बाजूला टाकला जातो. त्याठिकाणी एस.टी.स्टॅण्ड आहे, तेथे जाण्या-येण्यासाठी मेन रोड आहे, तेथे कचरा टाकण्यात येतो. अशा वेळी त्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे आरोग्यावर परिणाम होतो. आमच्या मूल गावामध्ये एकमेव तलाव आहे की ज्या तलावाचे पाणी जनावरांना पाजले जाते, कपडे धुण्यासाठी वापरले जाते तसेच तेथे मासे विकण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात होतो. अशा ठिकाणी घनकचरा टाकून घाणीचे साम्राज्य निर्माण करण्याचे काम ही नगरपालिका करीत आहे. या घन कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकच्या पिशव्या असतात आणि जर उद्या या पिशव्या जनावरांनी खाल्ल्या तर त्यांचाही मृत्यू होऊ शकतो हे सगळयांना नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. म्हणून हा कचरा गावाबाहेरच्या खड्डयामध्ये टाकावा अशी लोकांची मोठया प्रमाणात मागणी असूनही त्याबाबतीत नगरपालिका काहीही करीत नाही आणि असे जर करेल तर ती नगरपालिकाच कुठली? अशी या ठिकाणी परिस्थिती आहे.मला एवढेच सांगावयाचे आहे की, 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता या नगरपालिकेने ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

मोठ्या प्रमाणात 907 या खसरा नंबरमध्ये एक चाळ बांधली. त्याच्या 7/12 च्या उताऱ्यावर" सरकार"लिहिले आहे,"झुडपी जंगल"लिहिलेले आहे आणि त्याठिकाणी काही काम करावयाचे असेल तर त्याकरता जिल्हाधिकारी आणि वन अधिकारी यांची परवानगी लागणार आहे. हे सर्व माहिती असून सुध्दा संबंधितांनी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता 20 लाख रुपये खर्च करुन एक कॉम्प्लेक्स बांधण्यात आला आहे. ते गाळे बांधून दोन-तीन वर्षे झाली परंतु अजूनही त्या गाळ्यांचा लिलावही करण्यात येत नाही आणि केवळ तेथे नुसते बांधून ठेवलेले आहे. तसेच यासाठी 12 व्या वित्त आयोगामार्फत मिळालेले 20 लाख रुपये खर्च केलेले आहेत. या नगरपालिकेच्या बाबतीतील विशेष बाब म्हणजे येथील आस्थापनेवरील खर्च 103 टक्के आहे आणि त्यामध्ये जमा झालेला सर्व पैसा टाकण्यात आला आहे.पण तसे असून सुध्दा अजूनही 46 अस्थायी कर्मचाऱ्यांचा गेल्या वर्षभरापासून पगार झालेला नाही. या कर्मचाऱ्यांना स्थायी करण्यात यावे अशी त्यांची मागणी असून, त्यासाठी ते वारंवार आमरण उपोषण करीत असतात. परंतु हा प्रश्न देखील निकालात निघालेला नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने असे धोरण आखले की, दुहेरी लेखा परीक्षण अहवाल सादर करण्यात यावा. त्याबाबत सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता, वास्तविक पाहता दुहेरी लेखा परीक्षण अहवाल हा नगरपालिकेने स्वत:च्या खर्चातून करावयास पाहिजे. पण त्यासाठी सुध्दा संबंधितांनी 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून जो निधी मिळाला, त्यातून 8 लाख 11 लाख 380 रुपये खर्च केले आणि त्यासाठी सुध्दा जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतलेली नाही. त्याचप्रमाणे दुहेरी लेखा परीक्षणाचे प्रारुप दि. 31 डिसेंबर 2010 पर्यंत महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावे असा नियम असून सुध्दा अद्यापपर्यंत हे प्रारुप शासनाकडे पोहोचलेले नाही. अशा पध्दतीने स्व-मर्जीने नगराध्यक्ष काम करतात व मुख्याधिकाऱ्यांना विश्वासात घेत नाहीत, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवितात. याठिकाणी ते स्वतंत्ररित्या एकटे कारभार करीत आहेत. त्यामुळे नगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. गावातील कचरा साफ होत नाही. लोकांना महिना-महिना पिण्याचे पाणी मिळत नाही. तसेच बाजार चौकातील लाईट दोन-दोन महिने लागत नाहीत. अशा प्रकारे जर नगराध्यक्षच तेथील नगरपालिकेचा कारभार स्वतंत्ररित्या चालवित असेल तर मग आपण ही नगरपालिका बरखास्त करावी अशी मी याठिकाणी

. . . .ओ-3



APR/ D/ ST/ 11:40

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

मागणी करीत आहे. त्याचप्रमाणे तेथे प्रशासक नेमून नगरपालिकेचे प्रश्न सोडवावेत अशी मी आपल्याला अर्ध्या तासाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ ST/ प्रथम सौ. रणदिवे.... 11:45

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून, चंद्रपूर जिल्हयातील 'मूल' नगरपालिकेने सेग्रीगेशन व प्रोसेसिंगचा प्लान्ट उभा करण्याचा निर्णय जो घेतलेला आहे, त्या प्लान्टमध्ये झालेल्या अनियमिततेबद्दल सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना आणि सभागृहाला सांगावयाचे ओह की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार नगरविकास विभागाने दिनांक 31/3/2006 रोजी 12 व्या वित्त आयोगाकडून मिळणाऱ्या निधीचे वाटप आणि तो निधी कसा खर्च करावा, याबाबतीत एक धोरण स्वीकारण्यात आले आणि त्याबाबतीत नगरपालिकांना काही गाईडलाईन्स देण्यात आल्या. एकंदर मिळणाऱ्या अनुदापैकी 36.50 टक्के अनुदान हे 12 व्या वित्त आयोगातून मिळणारे अनुदान होते, ते घन कचरा व्यवस्थापनासाठी खर्च करावे अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना होत्या. सभापती महोदय, 12 व्या वित्त आयोगाचा निधी कसा खर्च करावा या संदर्भात ज्या गाईलाईन्स दिलेल्या होत्या त्या गाईडलाईन्सनुसार त्या त्या नगरिपालिकांना तो निधी खर्च करणे अत्यंत अवघड झाले होते, यासंबंधीची जाणीव आणि आताची एकंदर अडचण नगरविकास विभागाच्या लक्षात आली.

सभापती महोदय, नुकताच 13 वा वित्त आयोग जाहीर झालेला आहे. यंदाच्या वर्षी पहिल्या टप्प्यामध्ये 295 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाला मिळणार आहेत. त्यापैकी 147 कोटी रुपयाचा पहिला हप्ता आलेला आहे. 12 व्या वित्त आयोगाचे पैसे कशा पध्दतीने वापरावेत या संदर्भातील अडचणी लक्षात घेऊन तो निधी नगरपालिकांना सहजतेने वापरता यावा, त्याचा उपयोग करता यावा, या दृष्टिकोनातून सूचना देण्यात आलेल्या आहेत. 12 व्या वित्त आयोगामध्ये 56.50 टक्के निधी हा "घन कचरा व्यवस्थापनावर" खर्च करावा, अशा प्रकारच्या सूचना असल्यामुळे बऱ्याच नगरपालिकांना हा पैसा खर्च करणे अवघड झालेले होते. म्हणून या 'मूल' नगरपालिकेने सुध्दा दिनांक 18/12/2008 च्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रमांक 17 अन्वये हा "घन कचरा व्यवस्थापन" किंवा "सेग्रीगेशन आणि प्रोसेसिंग प्लान्ट" उभारण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय जिल्हाधिकारी आणि काही सी.ओ. ना विश्वासात घेऊन घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार 93(8) अन्वये सेग्रीगेशन आणि प्रोसेसिंग प्लान्ट उभा करण्याचा निर्णय घेतलेला होता. त्या अनुषंगाने त्यांनी दोन सिलबंद निविदा मागविल्या होत्या. त्यापैकी एक निविदा मेसर्स भगत

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

इंडस्ट्रिज आणि सप्लायर, धरमतरी, छत्तीसगड यांची होती आणि ती रुपये 18 लाख 12 हजारची होती. दुसरी निविदा मेसर्स युनिव्हर्सल इंजिनियरिंग ॲण्ड फॅब्रिकेशन्स, काटोल, जिल्हा नागपूर यांची होती आणि ती रुपये 13 लाख, 38 हजार 750 ची होती. त्यामुळे दोन नंबरची, कमी रक्कमेची निविदा मान्य करुन प्लान्ट उभा करण्याची वर्क्स ऑर्डर संबंधित ठेकेदाराला दिली. पहिला ठराव 2008 मध्ये झाला होता त्यानंतर दिनांक 27/1/2010 मध्ये वर्क्स ऑर्डर देण्यात आली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे दिनांक 20/1/2010 मध्ये नगरपालिका, 93(8) प्रमाणे त्यांना परवानगी देण्यात आली होती. परंतु दिनांक 05/03/2010 च्या सर्वसाधारण सभेमध्ये नऊ नगरसेवकांनी दिनांक 31/12/2009 ला ठराव क्रमांक 9 झाला होता त्याला विरोध केला होता आणि जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा अशा प्रकारचे निदेश दिले की, पुन्हा एकदा हा ठराव सर्वसाधारण सभेसमोर घेऊन जावा, सर्वसाधारण सभेचे मत घ्यावे आणि मगच या संदर्भातील निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांनी 93(8) या कलमान्वये तशा प्रकारचा निर्णय घ्यावयास नको होता आणि तो घेतलाच होता तर त्यांनी त्या निर्णयाशी स्टिकअप रहावयास पाहिजे होते. परंतु त्यांनी पुन्हा एकदा सर्वसाधारण सभेसमोर जावयास सांगितले. सर्वसाधारण सभेसमोर पुन्हा हा ठराव मांडण्यात आला. बहुमताने तो पुन्हा पारित करण्यात आला. परंतु त्यानंतर सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट निर्देश नसल्यामुळे पुन्हा जिल्हाधिकाऱ्याकडे तो ठराव मार्गदर्शनासाठी पाठविण्यात आला आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

मग जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, 28 एप्रिलला मी जे आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे पुन्हा आपण कार्यवाही करावी. त्यामुळे पुन्हा एकदा 14.3.2011 रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेसमोर हा ठराव पारित करण्याकरिता आला आणि त्या दिवशी ठराव क्रमांक 2 अनुसार सेग्रीगेशन ॲण्ड प्रोसेसिंग प्लँट उभारण्याबाबत पुन्हा चर्चा होऊन त्या ठरावाला मान्यता दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, आजही त्या प्लँटचा वापर होत नाही, आजूबाजूला कचरा टाकला जातो आणि नागरिकांना त्रास होतो, त्या संदर्भामध्ये दखल घेण्याची आवश्यकता आहे. नगरपालिकेची आर्थिक शिस्त बिघडलेली आहे अशी बाब सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिलेली आहे. त्या ठिकाणी जे सेग्रीगेशन ॲण्ड प्रोसेसिंग युनिट व्हावयास पाहिजे त्याला आता सभागृहाने मान्यता दिलेली आहे. हे काम लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्या संदर्भातील कार्यवाही केली जाईल. ही कार्यवाही करीत असताना सन्माननीय सदस्यांनी इतर ज्या गोष्टी सभागृहाच्या आणि शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्यामध्ये त्यांनी लोकांना चांगल्या प्रकारच्या आरोग्य सुविधा दिल्या पाहिजेत, नगर स्वच्छ ठेवले पाहिजे, त्यांनी गावाबाहेर एखादा मोठा खड्डा खणून त्या ठिकाणी या कचऱ्याची विल्हेवाट लावली पाहिजे, त्यांनी आर्थिक शिस्त आणली पाहिजे या बाबतीत नगरपालिकेला निश्चितपणे सूचना देण्यात येतील. त्या ठिकाणी आर्थिक शिस्त राहावी आणि बजेटनुसार त्यांचे काम व्हावे, कर्मचाऱ्यांना पगार वेळेवर दिला जावा यासंदर्भात सूचना देण्यात येतील.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ठराव झालेला आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले पण अशी वस्तुस्थिती नाही. मी स्वत: त्या गावात राहते. मी गावाच्या बाहेर राहात नाही. माझ्या घरासमोर नगरपालिका आहे. त्यामुळे मला फार लांब जावे लागत नाही. या ठिकाणी सांगण्यात आले की, जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली पण या क्षणाला सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिलेली नाही. अशा पध्दतीचा ठराव सर्वानुमते मंजूर झालेला नाही. हे मी अतिशय जबाबदारीने सांगत आहे. ते आपल्या मनाने हे करीत आहेत. घनकचरा टाकण्याकरिता मशिन बसविण्यासाठी जी इमारत उभी केली त्या बाबतीत मी बोललेच नाही. मी मशिन खरेदी करण्याबाबत बोलले. त्यांनी 93(8) प्रमाणे निविदा मागविलेल्या नाहीत. त्यांनी डायरेक्ट ऑर्डर देऊन मशिन खरेदी केलेली आहे. बाराव्या वित्त आयोगाप्रमाणे नगरपालिकेला पैसे खर्च करण्याचे अधिकार आहेत असे सांगितले तरी सुध्दा त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. जर असा कायदा नसेल तर मी माझे म्हणणे मागे घेईन. आज नगरपालिकेवर जिल्हाधिकाऱ्यांचा कंट्रोल असण्याकरिता बारावा वित्त आयोग असो किंवा तेरावा वित्त आयोग असो, नगरपालिकेला खर्च करण्याची परवानगी असली तरी त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. जिल्हाधिकाऱ्यांनी फायर ब्रिगेड खरेदी करण्यास परवानगी दिली पण बाराव्या वित्त आयोगातून त्यांना कोणत्याही पध्दतीची घनकचरा मशिन खरेदी करु नका, त्या करिता पुन्हा प्रोसीजर पूर्ण करा असे सांगितल्यानंतरही प्रोसीजर पूर्ण केली नाही. त्या ठिकाणी फायर ब्रिगेड बरोबरच ती मशिन खरेदी केली. माझे असे म्हणणे आहे की, ही जी मशिन खरेदी झाली त्याला एक ते दीड वर्ष होऊन गेले आहे. त्या ठिकाणी 2008 मध्ये 93(8) प्रमाणे ठराव केला असे मंत्री महोदयांनी सांगितले. पण आताचे अध्यक्ष त्यावेळी अध्यक्ष नव्हते. मग तीन वर्षे त्यांनी वाट का पाहिली ? 93(8) प्रमाणे जो ठराव केला त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी फायर ब्रिगेडचा ठराव घेण्याची सूचना केली होती. त्यांनी त्यामध्येच घनकचरा मशिनचाही उल्लेख करुन दुहेरी खरेदी केलेली आहे, हा माझा आक्षेप आहे. त्यांनी जी खरेदी केली त्याला नगरसेवकांची या क्षणापर्यंत परवानगी मिळालेली नाही, हे मी स्पष्ट करु इच्छिते.

आपल्याला त्यांना वाचवावयाचे असेल तर वाचवावे, त्या बाबत मला काही म्हणावयाचे नाही.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस ....

परंतु आमच्या करावर नगरपालिका चालते तेव्हा वाटेल तसे पैसे खर्च करण्याची परवानगी अध्यक्षाला दिलेली नसते. गावाच्या स्वच्छतेकरिता, आरोग्याकरिता आणि इतर व्यवस्थेकरिता स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून नगरपालिका असते. नगरपालिका ही मनमानी करण्यासाठी नसते. त्या ठिकाणी लोकांना महिनोमहिने पाणी मिळत नाही. त्याची जबाबदारी कोण घेणार ? मागे मी आपल्याकडे या बाबत तक्रार केली होती. अशा पध्दतीने नगरपालिकेला पाठीशी घालून जर लोकांवर अन्याय होत असेल तर ते बरोबर नाही. या बाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस या ज्येष्ठ सदस्या आहेत. जरी या सभागृहामध्ये त्या आता सदस्या म्हणून आलेल्या असल्या तरी विधानसभा सभागृहात वर्षानुवर्षे सदस्य होत्या तसेच त्या मंत्रीही राहिलेल्या आहेत.

यानंतर श्री. खंदारे...

श

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव......

सन्माननीय सदस्या स्वत: त्या गावात रहात असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सभागृहामध्ये एखादे सन्माननीय सदस्य स्वत:हून अशाप्रकारची माहिती देत असतील तर ती माहिती ग्राह्य धरण्याची आपली प्रथा आहे. त्या माहितीच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची आपली प्रथा आहे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहाला माहिती दिली आहे, पण दुस-या बाजूला माझ्याकडे सुध्दा माहिती आलेली आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांची माहिती सत्य आहे असे गृहीत धरुन जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबतचा ठराव आला नसताना, नगपरिषदेने मान्यता दिली नसताना जर अशाप्रकारच्या गोष्टी घडल्या असतील तर सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन नगरपालिका प्रशासनाच्या संचालकांकडून चौकशी केली जाईल, त्यांच्याकडून शासनाकडे अहवाल मागविला जाईल आणि सन्माननीय सदस्या म्हणत आहेत त्याप्रमाणे तेथे जर गोष्टी आढळल्या असतील तर सन्माननीय सदस्या म्हणत आहेत त्याप्रमाणे तत्काळ कारवाई केली जाईल.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगरपरिषद ही माझ्या मतदार संघामध्ये आहे. तेथील मुख्याधिकाऱ्यांविरुध्द अनेक तक्रारी आहेत. घन कचऱ्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी तक्रार केली आहे. पण काही मुख्याधिकाऱ्यांचा घन कचरा मशिनमध्ये पर्सनल इंटरेस्ट आहे. बल्लारशाह नगरपरिषदेतही असेच झाले आहे. नगरपरिषदेचा ठराव नसतानाही नियम 93/8 अन्वये सरळ जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी घेऊन मशीन खरेदी करण्यात आली. या खरेदीला नगरपरिषदेच्या अध्यक्षांनी विरोध केल्यावर त्या खरेदीचे पेमेंट रोखून धरण्यात आले. ही परिस्थिती बल्लारशाह व मूल नगरपरिषदेमध्ये आहे. मी नगरपरिषदेचा 22 वर्षे सदस्य होतो. नगरपरिषदेच्या अध्यक्षांना काहीही अधिकार नाही, प्रत्येक ऑर्डरवर मुख्याधिकाऱ्यांची सही आवश्यक असते. नगरपरिषदेच्या ठरावामध्ये एखादी चूक झाली असेल तर नगरसेवकांकडून पैसे वसूल केले जातात. संबंधित नगरसेवक मरण पावले असतील तर त्यांची मालमत्ता जप्त करण्याची कारवाई केली जाते. अशा प्रकारची कायद्यामध्ये तरतूद आहे. पण तशा प्रकारची तरतूद आमदारांसाठी नाही. तशी तरतूद या सभागृहाने मंजूर केली पाहिजे. आमदारांनी असे असत्य ठराव केले असतील तर त्यांच्याकडूनही वसुली झाली पाहिजे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....

नगरपरिषदेचे अध्यक्ष कोणत्याही पक्षाचे असतील, मी त्यांचा बचाव करीत नाही. या खरेदीमध्ये अध्यक्षांची कोणतीही चूक नाही. मूल नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांबाबत शासनाकडे गंभीर तक्रार करण्यात आलेली आहे. त्या तक्रारीबाबत शासन चौकशी करीत नाही. खरेदी करण्यात आलेल्या मशीनच्या ऑर्डरवर नगरपरिषदेच्या अध्यक्षांची सही आहे की मुख्याधिकाऱ्यांची आहे, मूल नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांबाबत अनेक तक्रारी शासनाकडे आल्या आहेत का ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊनच नियम 93/8 खाली तेथील अध्यक्षांनी खरेदी केलेली आहे असे सांगण्यात आले आहे. या उपरही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, असे घडलेलेच नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांची माहिती मी नाकारलेली नाही आणि सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी यांची माहिती सुध्दा मी नाकारलेली नाही. तसेच माझ्याकडे सुध्दा याबाबत माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे मी मधला मार्ग काढला असून नगरपरिषद प्रशासनाचे संचालक यांच्यामार्फत पारदर्शकपणे याबाबत चौकशी करण्यात येईल असे सांगितले आहे. त्या चौकशीत वस्तुस्थिती समोर येईल त्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल. मग त्यामध्ये मुख्याधिकारी असतील, नगराध्यक्ष असतील, जिल्हाधिकारी असतील कोणीही असोत या सगळया गोष्टी समोर येतील. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रथम 'होय' का म्हटले आणि नंतर 'नाही' का म्हटले, जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयावर कायम राहिले पाहिजे होते. याबाबत सर्वंकष चौकशी करण्यात येईल, ही चौकशी एका व्यक्तीची होणार नाही. नगरविकास विभागाला, शासनाला असे वाटते की, नियम 93/8 खाली जिल्हाधिकाऱ्यांनी कशा स्वरुपाचे निदेश द्यावेत, कशा स्वरुपाची कार्यवाही करावी यासंबंधी स्पष्ट शब्दामध्ये शासनाकडून मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. नगरपरिषदांमध्ये पुन्हा पुन्हा गोंधळ निर्माण होता कामा नये यासाठी स्पष्ट सूचना निर्गमित केल्या जातील.

यानंतर श्री.शिगम.....

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन : चंद्रपूर जिल्हा हा राज्यामध्ये सर्वात जास्त प्रदूषित जिल्हा आहे. Chandrapur is the most polluted city in Mahararshtra. चंद्रपूरमध्ये प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झालेला आहे. मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, केन्द्र शासनाच्या नियमाप्रमाणे We have given orders to purchase machinery throughout Maharashtra. मुझे पूछना है कि महाराष्ट्र के अंदर कहां-कहां पर मशीनें परचेज हुई हैं, वे मशीनें कहां-कहां पर चल रही हैं और उन मशीनों की वजह से कितना पॉल्यूशन कम हुआ है तथा शासन को उससे कितना फायदा हुआ है ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य नवीन आहेत. त्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु अर्धा-तास चर्चा ही मूल नगरपरिषदेच्या बाबतीत मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे त्यामुळे त्याबाबतची माहिती आता मिळणे शक्य होणार नाही.

----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अंध-अपंगांच्या विशेष शाळांमधील हजारो कर्मचारी कमी करण्याबाबत

**मु. शी.** :अंध-अपंगांच्या विशेष शाळांमधील हजारो कर्मचारी कमी करण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9764 ला दिनांक 7 नोव्हेंबर 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय,"अंध-अपंगांच्या विशेष शाळांमधील हजारो कर्मचारी कमी करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9764ला दिनांक 7 नोव्हेंबर 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यात अंध-अपंगांच्या विशेष शाळा आहेत. या शाळेत काम करणा-या शिक्षक आणि कर्मचा-यांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने सन 2004मध्ये आकृतिबंध आणला. त्या आकृतिबंधानुसार अंध-अपंगांच्या विशेष शाळांमधील जवळपास 3911 म्हणजे जवळपास 4 हजार शिक्षक कर्मचा-यांच्या नोक-यांवर गंडांतर आणण्याचे काम या पुरोगामी शासनाने केलेले आहे हे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते. या राज्यातील अंध-अपंगांना जवळच्या शाळेत शिक्षण मिळाले पाहिजे, त्यांना चांगल्या भौतिक सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी घटनेने कायदा करण्यास सांगितले. घटनेतील तरतुदीनुसार अंध व अपंगांच्या शाळा सुरु झालेल्या आहेत. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे सरंक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995च्या चॅप्टर 5 मध्ये असे म्हटलेले आहे की, "ensure that every child with a disability has access to free education in an appropriate environment till he attains the age of eighteen years." चॅप्टर 5 मध्ये पुढे असेही म्हटलेले आहे की, "promote setting up of special schools in Government and private sector for those in need of special education, in such a manner that children with disabilities living in any part of the country have access to such schools." अशा प्रकारची स्पष्ट तरतूद असताना राज्य शासनाने आकृतिबंधाच्या नावाखाली 3911 शिक्षक आणि कर्मचा-यांच्या नोकरीवर गंडांतर आणलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सर्वसाधारण शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविणे आमच्या सारख्या गुरुजनांना किती अवघड असते हे आपणास माहीत आहे. असे असताना अंध व अपंगांना शिकविण्याचे इतके अवघड काम करणा-या शिक्षक आणि कर्मचा-यांना आकृतिबंध लावण्याचे आदेश दिनांक 18 ऑगस्ट 2004 रोजी काढण्यात आले. त्या आदेशातील एका ओळीने या शिक्षक आणि कर्मचा-यांना कमी करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. या विरोधात कर्मचारी संघटनेने न्यायालयात याचिका क्रमांक 7358/07 दाखल केली. या विषयी न्यायालयाने शासनाला 4 पर्याय सुचविले. त्यातील एक पर्याय असा आहे की, या शिक्षक आणि कर्मचा-यांना आहे त्याच ठिकाणी कामावर ठेवावे आणि ते जेव्हा सेवानिवृत्त होतील त्यावेळी नवीन भरती करु नये. या 4 पर्यायापैकी शासनाने सोयीचा असा 4था पर्याय स्वीकारला. "यांची सेवा समाप्त करावी" असा 4था पर्याय आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे..........

म्हणजे शासन कोणत्याही हिताच्या गोष्टीकडे पहायला तयार नाही. या राज्याचा कारभार पाहणारे मंत्रालयामध्ये जे झारीतील शुक्राचार्य आहेत त्यांना शोधून काढले पाहिजे. मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. त्यांनी दोनवेळा या संदर्भात बैठक घेतली. उच्च न्यायालयाने जो पहिला पर्याय सुचविला आहे त्याप्रमाणे या कर्मचाऱ्यांना सेवेत ठेवले पाहिजे असा प्रस्ताव मंत्री महोदयांनी पाठविला. परंतु मंत्रालयातील अधिकारी मंडळींनी या प्रस्तावाला विरोध केला. आज हे कर्मचारी आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले आहेत. उच्च न्यायालयाने चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी 3911 कर्मचाऱ्यांना आहे त्याच जागेवर ठेवून सेवा समाप्त करु नये हा जो पहिला पर्याय सुचविला आहे त्या पर्यायाची अंमलबजावणी महाराष्ट्र शासन तातडीने करणार आहे का, हा निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी घेतला जाईल काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. दुर्लक्षित वर्गाचा हा प्रश्न आहे. महाराष्ट्र हे देशात तेवढेच मोठे राज्य आहे. या राज्यात अपंगांच्या एकूण 737 अनुदानित शाळा असून 14778 कर्मचारी आहेत आणि विद्यार्थी संख्या 35 हजारपेक्षा जास्त आहे. यापैकी शासकीय अंध व अपंगांच्या 21 शाळा असून त्यामध्ये 328 कर्मचारी कार्यरत आहेत व 1078 विद्यार्थी संख्या आहे. या राज्यातील एनजीओ देखील यासंदर्भात चांगले काम करीत आहेत. माननीय सदस्यांनी आकृतिबंध लागू केल्यामुळे कर्मचारी सरप्लस झाल्याचे सांगितले आहे. या कर्मचाऱ्यांना भूतलक्षी प्रभाव लागू करावा किंवा नाही याबाबत मुख्य सचिवांकडे दोन बैठका झाल्या होत्या. नुकतीच मार्च महिन्यात सुध्दा एक बैठक झाली. भूतलक्षी प्रभाव लागू करता येणार नाही, त्यांना कायम सेवेत ठेवले पाहिजे. या कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करण्याचे आदेश काढलेले नाहीत. विभागाचा हाच प्रयत्न आहे की, या कर्मचाऱ्यांना सेवेत ठेवले पाहिजे. संघटनेने सुध्दा हे मान्य केले आहे की, जे कर्मचारी निवृत्त होतील त्यांच्या जागा भरण्यात येऊ नयेत. तसा प्रस्ताव आलेला आहे. त्यामुळे शासनाचा दृष्टीकोन हा सहानुभूतीचा आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सहानुभूतीचा दृष्टीकोन दाखविल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी सांगितले की, कोणालाही सेवेतून कमी करण्याचा उद्देश नाही आणि सेवेतून कमी केले जाणार नाही. 2010 मध्ये जे कर्मचारी सरप्लस झाले, ज्यांनी एनओसी घेतली नव्हती अशा सर्व शिक्षकांना कालपर्यंत नोटीस प्राप्त झाली आहे. त्यांना 8-9 महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. त्यांना शासनाने सेवेतून कमी केले आहे. ते नियमित वेतन घेत होते. त्यांना कॉन्ट्रॅक्टवर सेवेत घेतलेले नव्हते. केवळ एनओसी घेतली नाही हा तांत्रिक मुद्दा पुढे करुन त्यांना सेवेतून कमी केले आहे. एकूण 90 शिक्षक असले तरी 57 शिक्षक असे आहेत, ज्यांना एनओसी घेतली नाही हे कारण दाखवून सेवेतून कमी केले आहे. जे सेवेत आहेत आणि नियमित वेतन घेत होते त्यापैकी कोणालाही सेवेतून कमी केले जाणार नाही असे मंत्री महोदयांनी आश्वासित करावे. खरे म्हणजे हा आकृतिबंध बदलला पाहिजे. आकृतिबंधातील निकषामुळे अंध व अपंग मुलांकडे दुर्लक्ष होणार आहे. उच्च न्यायालयाने सुचविलेला चौथा पर्याय पूर्णपणे रद्दबातल ठरविला जाईल काय?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, चौथा पर्याय विभागाने अमान्य केला आहे. या प्रश्नासंबंधी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती आहे. शासनाने कोणालाही सेवेतून कमी केलेले नाही. त्यामुळे वेतन बंद होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : मंत्रालयातील अधिकारी चांगूलपणाचा फार फायदा घेतात. सर्व कर्मचाऱ्यांना नोटीस प्राप्त झाली आहे. त्यांना सेवेतून काढून टाकले आहे. त्यांचे वेतन बंद झाले आहे. जे 5-7 वर्षापासून सेवेत होते त्या सगळ्या कर्मचाऱ्यांना पूर्णपणे प्रोटेक्शन दिले जाईल, त्यांचे वेतन पूर्ववत सुरु केले जाईल आणि एकही कर्मचारी सेवेतून कमी केला जाणार नाही असे स्पेसिफिक उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 2004 मध्ये आकृतिबंध लागू झाला. त्यामुळे कर्मचारी सरप्लस झाले. यामध्ये कोणीही अफेक्टेड होणार नाही हे मी सांगू इच्छितो.

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले........ 12:10

श्री. वसंतराव खोटरे : महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत योग्य उत्तर दिलेले आहे पण अपंगांच्या विशेष शाळांमधील हजारो कर्मचारी जे सरप्लस झाले त्यांना नोटिसा दिलेल्या आहेत. यासंदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या चार पर्यायांपैकी पहिला पर्याय मान्य करुन तसा निर्णय 15 दिवसात शासन घेणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, उच्च न्यायालयात 18 तारखेला सुनावणीची तारीख दिलेली आहे, त्यापूर्वी हा निर्णय घेण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे सत्ताधारी पक्षाचे असले तरी शासनाकडून अंध व अपंग कर्मचाऱ्यांच्या वतीने काम करीत असताना त्यांच्यावर कसा अन्याय होतो यासंबंधीचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. तसेच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो विषय मांडला या सर्व मुद्यांशी मी सहमत आहे. आजही या कर्मचाऱ्यांचे आझाद मैदानावर आंदोलन सुरु आहे. मंत्री महोदय एका बाजूने अन्याय होत असल्याचे मान्य करतात आणि दुसऱ्या बाजूने मात्र काही गोष्टी अमान्य सुध्दा करीत आहेत. म्हणून आज जे कर्मचारी सेवेत आहेत भलेही त्यांना प्रमाणपत्र मिळाले नसेल पण कोणालाही नोटीस मिळणार नाही आणि नोटिसेस दिल्या असल्या तरी त्या मागे घेण्याची कार्यवाही शासनाने करावी तसेच न्यायालयाच्या निदशानुसार कार्यवाही करणे, यासंबंधी शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेतून काढण्यासंबंधीचा हा विषय आहे. मग त्यात कोणत्या वेगळ्या कारणामुळे असेल तो भाग वेगळा. अशा गोष्टींची तपासणी करुन त्यात अन्यायकारक काही गोष्टी असतील तर त्याचाही विचार केला जाईल.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय बहुत ही रहमदिल व्यक्ति हैं. मेरा प्रश्न यह है कि सरप्लस होने के नाम पर अनेक शिक्षकों को 9 महीने से पगार नहीं हुआ है, जबकि पगार न देने के संबंध में कोर्ट का कोई आदेश नहीं है. मेरा कहना है कि जो शिक्षक अपंग विद्यार्थियों को पढ़ाते हैं, उनको पगार देने का निर्णय शासन करेगा या नहीं ?

दूसरा प्रश्न मुझे यह पूछना है कि कोर्ट ने 4 ऑपशन्स दिए हैं, उनमें से आप पहला

...2

श्री सय्यद जमा....

ऑप्शन अडॉप्ट करेंगे या नहीं ? क्योंकि यह हमारे राज्य की विश्वसनीयता का प्रश्न है. माननीय मंत्री महोदय सामाजिक न्याय मंत्री हैं. मेरा निवेदन है कि यहां पर मंत्री महोदय स्पष्ट उत्तर दें कि एक भी कर्मचारी को नहीं हटाया जाएगा, इस तरह के सकारात्मक उत्तर की अपेक्षा, मैं माननीय मंत्री महोदय से करता हूं.

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, 18 एप्रिल ही सुनावणीची तारीख मा. उच्च न्यायालयाने दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्यादृष्टीनेच शासनाचाही विचार आहे ...अडथळा..

श्री सय्यद जमा : उनका पगार चालू क्यों नहीं होगा ? .....

**तालिका सभापति** : सभी माननीय सदस्य बैठ जाईए. यहां पर सभी माननीय सदस्यों को प्रश्न पूछने का मौका मिल रहा है, माननीय मंत्री महोदय भी सभी प्रश्नों का उत्तर दे रहे है, इसलिए यहां पर सभी माननीय सदस्यों को एक साथ खड़े होकर प्रश्न नहीं पूछने चाहिए.

श्री. कपिल पाटील : महोदय, ज्या कर्मचाऱ्यांचे पगार बंद केलेले आहेत, त्यांचे पगार चालू ठेवावेत, अशी आमची विनंती आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : जे कर्मचारी सरप्लस झालेले आहेत त्यांच्यापैकी कोणालाही काढले जाणार नाही त्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याचा पगार बंद झाल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. पण वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांना काढले असेल तर त्याची चौकशी शासन करील व या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत न्याय्य भूमिका घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, मंत्री महोदयांनी लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे सांगितले, त्यापेक्षा एखादा कालबध्द कार्यक्रम जाहीर करुन अमुक इतक्या दिवसात शासनाकडून हा निर्णय घेण्यात येईल असे त्यांनी सांगावे. कारण हे कर्मचारी आजही आझाद मैदानावर उपोषणासाठी बसलेले आहेत. अंध व अपंग विद्यार्थ्यांना शिकविणे ही साधी गोष्ट नाही. त्यासाठी नॉर्मल शिक्षकांपेक्षा जास्तीचे कौशल्य आवश्यक असते. या सर्व गोष्टींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन कालबध्द आश्वासन देणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, कर्मचाऱ्यांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीनेच शासनाचेही प्रयत्न चालू आहेत. पुढील दोन महिन्यात हा प्रश्न निकाली काढण्यात येईल.

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : शालेय शिक्षणामध्ये नाविन्यपूर्ण असे मोठया प्रमाणावर बदल करण्याबाबतचा आराखडा

**मु. शी.** : शालेय शिक्षणामध्ये नाविन्यपूर्ण असे मोठया प्रमाणावर बदल करण्याबाबतचा आराखडा या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 11283 ला दिनांक 4 डिसेंबर, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शालेय शिक्षणामध्ये नाविन्यपूर्ण असे मोठया प्रमाणावर बदल करण्याबाबतचा आराखडा या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 11283 ला दिनांक 4 डिसेंबर, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने शालेय शिक्षणामध्ये नावीण्यपूर्ण बदल घडवण्याचे ठरवलेले आहे. त्यासंदर्भातील आराखडा सादर करण्यात येणार आहे, अशा प्रकारची माहिती शासनाच्या वतीने देण्यात आली होती. शालेय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करणार, नवीन आराखडा करणार, असे मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितले होते. त्यामुळे यासंदर्भात निश्चित काय केले जाणार आहे, यासंदर्भातील माहिती जाणून घेण्यासाठी ही अर्धातास चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, शिक्षण हा विकासाचा पाया आहे. जो शिकेल तो टिकेल, असे म्हटले जाते. 'एज्यूकेशन इज पॉवर' असेही म्हटले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की, "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो शिक्षण घेईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही." आज शिक्षणाला फार महत्व आलेले आहे. शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करणे गरजेचे असून त्या माध्यमातून उशिरा का होईना महाराष्ट्र शासनाने आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले आहे, त्याबद्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. आपण शिक्षणामध्ये बदल करणार आहात म्हणजे नेमके काय करणार आहात ? शासनाने शिक्षणामध्ये बदल करण्यासाठी समिती नेमली आहे त्या समितीमध्ये कोणाकोणाचा समावेश करण्यात आलेला आहे, यामध्ये एकूण किती सदस्य आहेत ? याची माहिती सदस्यांना अवगत होणे आवश्यक आहे. गेल्या अधिवेशनात मंत्री महोदयांनी

....2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्तर दिले होते की, अशा प्रकारची एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे या समितीने आजपर्यंत जे काही काम केलेले आहे त्याचा अहवाल सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च माध्यमिक शिक्षण अशा प्रकारे शिक्षणाची व्याप्ती आहे. 1 ते 4 पर्यंत पूर्व प्राथमिक, 4 ते 7 प्राथमिक, 8 ते 10 माध्यमिक व 11 वी व 12 वी उच्च माध्यमिक अशी वर्गवारी आहे. आज पहिली ते बारावीचे सर्व कामकाज शालेय शिक्षण विभागामार्फत चालते.

सभापती महोदय, मला सांगावयाचे आहे की, पहिली ते आठवी पर्यंत केंद्र शासनाने पुरोगामी कायदा आणलेला आहे व या पुरोगामी कायद्याची अंमलबजावणी आपले शासन करीत आहे. त्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. भविष्यकाळात राज्य शासन पहिली ते आठवीच्या वर्गांना प्राथमिक स्तर समजणार आहे काय ? परंतु अकरावी ते बारावी हे जे उच्च माध्यमिक आहेत त्यांचे वर्ग हे शाळेलाच जोडले गेले पाहिजेत. आज अकरावी व बारावीचे जे वर्ग आहेत व ज्या महाविद्यालयांना जोडले आहेत ते काढून त्या संस्थाची शाळा असेल तर त्या शाळांना अकरावी, बारावीचे वर्ग जोडले पाहिजेत. अशा प्रकारे वर्ग जोडत असतांना उच्च माध्यमिकचे संचालन चांगले व्हावे, शिक्षणाची गुणवत्ता वाढावी, याचा सुध्दा प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, किमान एक उप प्राचार्य द्यावा अशी जी मागणी आहे, ती मागणी जर शासनाने मान्य केली तर शासनावर फार मोठे बर्डन येणार नाही. त्यांची मागणी शिक्षकेतर कर्मचारी द्यावे, अशी आहे. परंतु हे जरी करता आले नाही तरी किमान माध्यमिकचे संचालन करण्यासाठी एक उप प्राचार्य दिला तर परिणामकारक शिक्षण देता येईल, असे वाटते.

सभापती महोदय, नवीन शिक्षण पध्दतीत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची परीक्षा घ्यावयाची नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ..

यामुळे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दररोज होणार आहे. मात्र विद्यार्थ्यांची कोणतीही परीक्षा घेतली जाणार नाही. सर्वसाधारणपणे जीवनामध्ये काही तरी मिळविण्याकरिता मनुष्य सतत धडपड करीत असतो हे आपण देखील पहात असतो. त्यामुळे त्या माध्यमातून आपण जे काही काम करीत असतो, त्याचे मूल्यमापन कोठे तरी झालेच पाहिजे. विद्यार्थ्याच्या शालेय जीवनामध्ये दहावी व बारावी या बोर्डाच्या परीक्षा महत्वाच्या असतात. पहिली ते दहावी पर्यंत चौथीची व सातवीची परीक्षा घेतली जाते ती परीक्षा पुढील काळात सर्व विद्यार्थ्यांना सक्तीची कशी करता येईल, याचा विचार केला पाहिजे. तसेच या परीक्षा दहावीच्या बोर्डाच्या स्तरावर घेण्याच्या संदर्भात भविष्य काळात शालेय शिक्षण विभागाने विचार केला पाहिजे.असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी माननीय शिक्षण मंत्र्यांनी एका चर्चेला उत्तर देताना या पुढच्या काळात शाळेला मंजुरी देत असताना बृहत आराखडया नुसार मराठी व इंग्रजी शाळेला परवानगी दिली जाईल अशा प्रकारचे आश्वासन सभागृहात दिले होते. या करिता मी त्यांचे अभिनंदन करतो. भविष्य काळात राज्यात खरोखर शाळांची गरज आहे की नाही, हे तपासण्याचे काम बृहत आराखडयाच्या माध्यमतून केले जाणार आहे. ज्या ठिकाणी शाळेची गरज असेल, तेथे शाळांना परवानगी दिलीच पाहिजे. त्या बाबत आमचा काहीही विरोध नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व शहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, याकरिता मागेल त्याला शाळा देण्याचे धोरण आजपर्यंत शासनाने राबवले आहे. त्या धोरणास कात्री, लगाम लावण्याची गरज आहे, असे मी या ठिकाणी आपणास सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये तंत्रनिकेतन उघडावयाचे असेल तर शासना मार्फत सर्व बाजू तपासल्या जातात. त्याकरिता ए.आय.सी.टी.ने काही नॉर्म्स तयार केलेले आहेत. अमुक एकर जमीन आहे काय, इमारत बांधलेली आहे काय, आर्थिक पाठबळ आहे काय असे काही नॉर्म्स तंत्र शिक्षण विभागाने तयार केलेले आहेत. एखादी शाळा मंजूर करताना अशा प्रकारचे नॉर्म्स शालेय शिक्षण विभागाकडून तयार केले जाणार आहेत काय, असा महत्वाचा प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

24-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W 1

श्री.विक्रम काळे .....

मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील भौतिक सेवा सुविधा मिळू शकतील. आज आम्ही पाहत आहोत की, ग्रामीण भागामध्ये काही ठिकाणी जवळजवळ 15 ते 20 वर्षांपासून अनुदानित शाळा एका पत्र्याच्या शेडमध्ये चालवल्या जातात. यामुळे तेथील विद्यार्थ्यांना अनेक कष्ट सहन करावे लागतात. विद्यार्थ्यांना फर्निचर, प्रयोगशाळा, शालेय साहित्य, संगणक, ग्रंथालये इ. सुविधा पुरवण्याची एखाद्या शालेय संस्थेची खरोखर क्षमता आहे काय, हे पाहण्यात यावे अशी माझी विनंती आहे. त्या संस्थेकडे या सुविधा देण्याकरिता आर्थिक पाठबळासंबंधीचे केवळ सर्टीफिकेट आहे काय हे न पाहता त्यांच्याकडे खरोखर आर्थिक पाठबळ आहे काय हे पाहिले पाहिजे. तेवढया रकमेचे एफ.डी.आर. सदर संस्थेकडे असले पाहिजेत. शाळा सुरु झाल्यानंतर , 5 वर्षानंतर अनुदान दिले जावे असे अनुदान देण्याचे सर्वसाधारण सूत्र आहे. त्यामुळे शालेय शिक्षकांना वेतन देण्यासाठी संस्थेच्या फिक्स डिपॉझिटमध्ये पैसे आहेत काय, याची खबरदारी नवीन शाळा मंजूर करताना घेण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, नवीन बृहत आराखडा तयार करीत असताना शालेय शिक्षण विभागाला काही समस्या सातत्याने भेडसावीत आहेत. त्या पैकी शाळेचे स्थलांतर ही एक मोठी समस्या आहे. शाळेचे स्थलांतर ही एक नवीन डोकेदुखी शालेय शिक्षण विभागामध्ये निर्माण झालेली आहे शाळा स्थलांतरित करणे ही बाबच काढून टाकण्यात आली पाहिजे असे मला वाटते.. एखाद्या भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची व्यवस्था होण्यासाठी त्या ठिकाणी शाळेला मंजुरी दिली जाते. एक किलोमीटरच्या आत जर एखाद्या संस्थेने शाळा स्थलांतरीत केली तर मात्र शाळेच्या स्थलांतराला राज्य शासनाची परवानगी घ्यावयास लागता कामा नये. त्यांनी केवळ संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांना शाळेच्या स्थलांतराबाबत कळविले तरी पुरेसे होईल परंतु एखादी शाळा 1 किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर जर स्थलांतरीत होत असेल तर त्याकरिता शासनाने परवानगी देता कामा नये असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मद्दा मांडावयाचा आहे. एका वर्गामध्ये किती विद्यार्थी असावेत या संदर्भात आपण वर्गांची क्षमता निश्चित केली आहे. आपण जेव्हा डी.एड.ची सस्था वा पॉलिटेक्निक चालवतो तेव्हा तेथील वर्गाची क्षमता 50 असल्यास 51 व्या विद्यार्थ्याची परीक्षा

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे .....

घेण्यास बोर्डाकडून मंजुरी दिली जात नाही दुसरीकडे मात्र .एका वर्गाची क्षमता 50 विद्यार्थ्यांची असेल तरी देखील 100 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. .

यानंतर श्री. सरफरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

आणि त्याला सुध्दा शिक्षण विभागाकडून मान्यता दिली जाते, पुन्हा वाढीव तुकडयांची त्यांच्याकडून मागणी केली जाते. शेजारच्या शाळेमध्ये विद्यार्थी नसतात तरी आपण दोन्ही शाळांना अनुदान देतो. त्यामुळे वाढीव तुकडयांची मागणी मंजूर करण्यापूर्वी या सरकारने यापुढील काळात विचार केला पाहिजे. जी शाळा एखादी तुकडी मागते त्यावेळी शेजारच्या असलेल्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची क्षमता आहे की नाही हे पाहिले पाहिजे. जर नसेल तर या शाळेमधील विद्यार्थ्यांना त्या शाळेमध्ये पाठविले पाहिजे. तसेच, यानिमित्ताने प्रत्येक शाळेचे सुध्दा मूल्यांकन झाले पाहिजे. आज उच्च शिक्षणामध्ये वरिष्ठ महाविद्यालयांचे मूल्यांकन करण्यासाठी नेट आणले, त्यामुळे या राज्यातील काही वरिष्ठ महाविद्यालयांचा कारभार सुधारला. त्या निमित्ताने एक नवीन रुप आपणास पहावयास मिळाले. ज्याप्रमाणे आपण वरिष्ठ महाविद्यालयामध्ये नेट आणले त्याप्रमाणे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षण विभागाने सॅक आणण्याची घोषणा केली होती, ती आणण्याच्या दृष्टीने यापुढील काळात तातडीने पावले उचलली पाहिजेत. ज्या शाळा चांगले काम करतात, ज्या शाळा गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचे काम करतात त्या शाळांना यापुढील काळात विशेष अनुदान दिले पाहिजे. भविष्यात त्यासंबंधीची घोषणा या सभागृहात झाली पाहिजे. वेळेअभावी माझे अनेक महत्वाचे मुद्दे मांडावयाचे राहून गेले आहेत. शिक्षण विभागाचा नवीन बृहत आराखडा कोणता असणार आहे, त्याचा प्रारुप शिक्षण विभागाने सर्व माननीय सदस्यांच्या अवलोकनार्थ दिला पाहिजे. त्या प्रारुपाला अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आमच्या सूचना ग्राह्य धरण्यात आल्या पाहिजेत अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : मंत्री महोदयांच्या उत्तराकरिता सभागृहाची वेळ 5 मिनिटांनी वाढवून देण्यात येत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा एक धोरणात्मक महत्वाचा असल्यामुळे आपण दहा मिनिटामध्ये मंत्री महोदयांना उत्तर देण्यास सांगितले तर ते चटावरील श्राध्द उरकल्यासारखे होईल आणि या प्रश्नाला न्याय दिल्यासारखे होणार नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची चर्चा आहे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी या विषयावर दिलेला प्रश्न चर्चेला आला नाही म्हणून ही अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. हा माझा प्रश्न होता परंतु दुर्दैवाने तो चर्चेला आला नाही. तेव्हा आपण ही चर्चा अर्धवट ठेवून उद्या सकाळी पुन्हा घ्यावी, आम्ही सकाळी लवकर सभागृहामध्ये येऊ. ही चर्चा आपण आपल्या सोयीनुसार केव्हाही घ्यावी, परंतु आता घाई-घाईत उत्तर दिल्यामुळे आपल्याला समाधान मिळणार नाही. याबाबत आपण निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण माननीय सभापतींना सांगून ही अर्धा तास चर्चा नियम 97 मध्ये कन्वर्ट करावी.

**तालिका सभापती** : नियम 97 मध्ये कन्वर्ट करुन ही चर्चा घेता येणार नाही. यानंतर ज्या दिवशी विशेष बैठक घेऊन अर्धा तास चर्चेच्या सूचना घेण्यात येतील त्या दिवशी या अपूर्ण राहिलेल्या अर्धा तास चर्चेवरील मंत्री महोदयांचे राहिलेले उत्तर घेण्यात येईल. बाकीच्या राहिलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना नंतर घेण्यात येतील.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 12.28 ते 12.45 पर्यंत बैठक स्थगित झाली.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**<u>सभापतीस्थानी - माननीय उप सभापती</u>**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**औरंगाबाद जिल्ह्यातील गायरान, वतन, इनामी, कूळ आणि बक्षिसीमध्ये मिळालेल्या 200 हेक्टर जमिनीच्या खरेदी विक्री मध्ये झालेला गैरव्यवहार**

**(1) * 13632 श्री.सतीश चव्हाण, श्री.एम.एम.शेख, श्री.विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद जिल्ह्यातील गायरान, वतन, इनामी, कूळ आणि बक्षिसीमध्ये मिळालेल्या 200 हेक्टर जमिनीच्या खरेदी विक्री मध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, 2011 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) औरंगाबाद जिल्ह्यातील शासकीय गायरान जमीन विक्री परवानगीबाबत निम्नस्तरीय अधिकारी यांनी जमीन विक्रीस परवानगी दिल्याचे निष्पन्न झाले आहे.
(2) अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली आहे.
(3) व (4)
1. वरील गायरान जमीन विक्री परवानगी दिलेल्या प्रकरणामध्ये कायदेशीर गुंतागुंत निर्माण होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी 19-1-2011 च्या आदेशान्वये "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारित केले आहेत.
2.दि.5-3-2011 रोजी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी वरील प्रकरणे अपर जिल्हाधिकारी बीड यांचेकडे चौकशीसाठी वर्ग केली आहेत. या प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या अहवालाची छाननी करुन पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, औरंगाबाद शहरातील कोट्यावधी रुपयांच्या विविध संवर्गातील जमिनी आर.डी.सी.ने त्यांना अधिकार नसतानाही नियमित करुन दिल्या आणि त्याच्या विक्रीसाठी परवानगी दिली. मग मोठमाठ्या बिल्डरांनी या जमिनी विकत घेतल्या.या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी याबाबत चौकशी केली. त्यांनी यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांना दोषी ठरविले. माझा प्रश्न असा आहे की, शासन या जमिनींच्या बाबतीत झालले व्यवहार कायम स्वरुपात रद्द करणार आहे काय ? तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13632 . . ..

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या व्यवहारामध्ये निश्चितपणे अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आलेले आहे.जेव्हा या प्रकरणाच्या बाबतीत माहिती घेण्यात आली, तेव्हा असे समजले की, जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणामध्ये स्टेटस्को दिलेला आहे. त्यामुळे याबाबतीत आता कोणत्याही प्रकारचे नवीन व्यवहार होणार नाहीत. तसेच या सर्व व्यवहाराचे संपूर्णपणे पुनर्विलोकन करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांची नेमणूक केलेली असून ही कार्यवाही तीन-चार महिन्यामध्ये पूर्ण होईल. त्याचप्रमाणे यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी अनियमितता केलेली असल्यामुळे निवासी उप जिल्हाधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येईल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, याठिकाणी जमिनीच्या विक्रीसाठी अनधिकृतपणे परवानगी देण्यात आली. या जमिनी नेमक्या कोणत्या ठिकाणी आहेत, किती हेक्टर आहेत आणि या जमिनींच्या विक्रीसाठी किती तारखेला परवानगी देण्यात आली ? याची माहिती देण्यात यावी.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याबाबतीत 105 प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत. त्यामध्ये औरंगाबाद तालुक्यातील 85 प्रकरणे आहेत. फुलंब्री मधील 5, पैठण मधील 3, वैजापूर मधील 1,गंगापूर मधील 5, खुलताबाद मधील 3, सिल्लोड मधील 1 आणि कन्नड मधील 2 अशा प्रकारे एकूण 105 प्रकरणांमध्ये 189.13 हेक्टर जमीन आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे.प्रत्यक्षात याबाबतीत विभागीय आयुक्तांना अधिकार असताना देखील निवासी उप जिल्हाधिकारी यांनी आदेशाचा चुकीचा अर्थ लावून गैरव्यवहार केलेला आहे. 19 जानेवारीच्या जिल्हाधिकारी यांच्या अहवालामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, जमीन विक्री परवाना देताना अनियमितता झाल्याचे सिध्द होत आहे. जर हे धुतल्या तांदुळाइतके स्पष्ट असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात, आणि ही कारवाई किती दिवसामध्ये करणार आहात? याठिकाणी तीन व चार प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"वरील गायरान जमीन विक्री परवानगी दिलेल्या प्रकरणमध्ये कायदेशीर गुंतागुंत निर्माण होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दि.19-01-2011 च्या आदेशान्वये "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारित केले आहेत." माझा प्रश्न असा आहे की, या जमिनी पुन्हा त्यांना देणार आहात की मूळ मालकांना देणार आहात ? हा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितले की, अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांना याबाबतीत पुनर्विलोकन करण्यासाठी सांगितले आहे. त्यानुसार



APR/ KGS/ KTG/ 12:45

त्यांचे पुनर्विलोकनाचे काम येत्या तीन-चार महिन्यामध्ये पूर्ण होईल. त्यातून जे निष्कर्ष प्राप्त होतील, त्यावर आधारित आपल्याला पुढील कारवाई करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे विभागाने या प्रकरणात संबंधितांची विभागीय चौकशी करण्याचे ठरविलेले आहे. या विभागीय चौकशीचे निष्कर्ष आल्यानंतर त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13632.......

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या राज्यामध्ये गुरचरण विकण्याचा सपाटा मोठया प्रमाणात सुरु आहे. सभापती महोदय, उप जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी, उप जिल्हाधिकाऱ्याची चौकशी करु शकतो काय? म्हणून या प्रकरणाची चौकशी आयुक्त दर्जाचे अधिकारी करतील काय? जी जमीन विकली गेली आहे, ती विकतांना कोणत्या कंपनीसाठी परवानगी देण्यात आली. कोणत्या व्यक्तीला ही जमीन देण्यात आली? जवळ जवळ 200 हेक्टर जमीन म्हणजे 500 एकर जमीन आहे. औरंगाबादसारख्या नागरीकरण झालेल्या शहरामध्ये जमीन मिळत नाही. सन्माननीय माजी अर्थ मंत्री आणि ग्रामविकास मंत्री यांनी रायगड जिल्हयामध्ये त्यांच्या शैक्षणिक संस्थेसाठी जागा मागितली होती. पण त्यांना जागा मिळाली नाही. त्यावेळी ते पालक मंत्री होते. तेथील ग्राम पंचायतीने त्याला ऑब्जेक्शन घेतले होते. मी चुकीचे बोलत असेल तर माजी अर्थ मंत्र्यांना याबाबत विचारण्यात यावे. ही जमीन देत असताना तेथील ग्राम पंचायतीची, नगरपालिकेची परवानगी घेतली होती काय? या ठिकाणी मंत्री महोदय चौकशी करण्यात येईल, असे अतिशय सहजतेने सांगत आहेत. औरंगाबाद सारख्या महानगरपालिकेच्या ठिकाणी 500 एकर जमीन दान दिल्या सारखी अधिकारी देत असतील तर त्याबाबतीत संबंधित अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करुन चोकशी करण्यात यावी. ही जमीन देण्याबाबत तलाठी, प्रांत अधिकारी आणि मामलेदार पर्यंतच्या ज्या अधिकाऱ्यांनी शिफारस केली असेल त्यांची चौकशी करुन शासन त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, वर्ग-2 च्या जमिनी शासनाने ग्रँट केलेल्या जमिनी आहेत. त्यामुळे या जमिनींची विक्री करताना ग्रामपंचायतीचा ठराव घेण्याची तरतूद नाही. कायद्या प्रमाणे या जमिनी विक्रीस परवानगी देण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना आहेत. त्याप्रमाणे त्यांनी ते अधिकार वापरलेले आहेत आणि यामाध्ये अनियमितता झालेली आहे. या जमिनीची विना परवानगी विक्री केली तरी ती नियमित करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. या विक्रीमध्ये कुठेही महसुलाची हानी झालेली नाही. या सर्व प्रकरणामध्ये जवळ जवळ 2 कोटी 82 लाख इतका महसूल, अनर्जित रक्कम शासनाच्या कोषागारात जमा झालेली आहे. ही अनर्जित रक्कम बुडविण्याचे कुठलेही

...2..

ता.प्र.क्र.13632.......

श्री. प्रकाश सोळंके....

इंटेन्शन नाही. कायद्यामध्ये नियमित करण्याची तरतूद असल्यामुळे अनियमितता जरुर झालेली आहे परंतु महसुलाची कुठेही हानी झालेली नाही. तरी सुध्दा विभागीय चौकशी आदेशित केलेली आहे. विभागीय चौकशीमध्ये जे निष्कर्ष येतील त्या अधीन राहून योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : ज्यांना परवानगी दिली, त्यांची नावे सांगण्यात यावीत.

श्री. प्रकाश सोळंके : जमीन खरेदी करणाऱ्यांची आणि विक्री करणाऱ्यांची नावे वाचण्याची माझी तयारी आहे. परंतु ती बरीच मोठी यादी आहे. ही 185 प्रकरणे आहेत. म्हणून मालक आणि खरेदी करणाऱ्यांची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, कुळांनी दिलेल्या, मालगुजारीने दिलेल्या, बक्षिसपात्र मिळालेल्या अशा 500 वर्षापासूनच्या जुन्या जमिनी लोकांकडे आहेत. परंतु त्या भोगवटा-2 असल्यामुळे त्या जमिनी त्यांना विक्री करता येत नाहीत, असा प्रश्न सर्वत्र आहे. म्हणून आमची अशी मागणी आहे की, भोगवटा-2 ची जमीन भोगवटा- 1 करुन त्यांना भूमीधारी करण्यास हरकत नाही. कारण आज तो फक्त भूमी स्वामी आहे. फक्त जमीन त्याच्या ताब्यात आहे पण ती जमीन विकण्याचे अधिकार त्याला नाहीत. ही जमीन भोगवटा- 1 केल्या शिवाय तिची विक्री करता येत नाही, ही गोष्ट बरोबर आहे. जमिनीची विक्री करण्याचा किंवा त्याला मंजुरी देण्याचा अधिकार एस.डी.ओ.पासून सगळयांना आहे. म्हणून माझे स्पष्ट म्हणणे आहे की,

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13632..... श्रीमती शोभा फडणवीस...

भोगवटा 2 ची जमीन भोगवटा 1 करुन देण्याकरिता महाराष्ट्रामध्ये तशा प्रकारचा कार्यक्रम आयोजित करणार का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, 500 एकर जमिनीचा हा अत्यंत गंभीर विषय आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हे स्कॅंडल सुरु आहे. तहसीलदार आणि एसडीओ हे लीज ग्रॅंट करतात किंवा त्या जागेच्या विक्रीची परवानगी देतात. त्यानंतर खरेदी करणारे लोक आहेत ते ताबा दाखवून भोगवटा 2 च्या जमिनीच्या बाबतीत अनर्जित रक्कम भरुन भूमीस्वामी म्हणून अर्ज करतात. मागच्या काळात महाराष्ट्रामध्ये शासनाने गायरान जमिनी म्हणून गुराढोरांना चरण्याकरिता, छावण्याकरिता आरक्षित केलेल्या या जमिनी आहेत. उन्हाळ्यामध्ये गुराढोरांसाठी पाण्याची व्यवस्था नसते. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र लॅंड रेव्हेन्यू कायद्यामध्ये स्पष्टपणे वर्ग 2 जमीन असे स्पेसिफाय करण्यात आले आहे. अशा जमिनी तहसीलदारांनी लीजवर दिल्यानंतर किंवा प्रमाणपत्र दिल्यानंतर अनर्जित रक्कम भरुन नियमित करण्याचा सपाटा शासन थांबविणार का आणि गुराढोरांसाठी ही गायरान जमीन आरक्षित ठेवणार का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, कायद्यामध्ये जी तरतूद आहे त्यानुसार भोगवटा वर्ग 2 च्या जमिनीची विक्री करण्यास परवानगी देत असताना त्याबाबतीत आयुक्तांना अधिकार देण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न गायरान जमिनीच्या संदर्भात विचारलेला आहे. या लॅंड ग्रॅंट झालेल्या जमिनी आहेत. प्रत्यक्षात त्यांना या जमिनी लॅंड गॅंट म्हणून दिलेल्या आहेत. त्या जमिनीच्या विक्रीच्या परवानगीमध्ये जी काही अनियमितता झालेली आहे तेवढ्या पुरती ही बाब आहे. कायद्यामध्ये तरतूद आहे की, जरी विक्रीस परवानगी दिली नाही तरी अनर्जित रक्कम भरुन ती जमीन नियमित करता येते. त्यामुळे अधिकाराचा वापर करण्यामध्ये अनियमितता झालेली आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ KGS/

**स्वयंसेवी संस्थांमार्फत सुरु असलेल्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका, पहारेकरी, सफाईगार ही पदे भरण्याबाबत**

**(२) * १३१०३ श्री.रामनाथ मोते , श्री.नागो गाणार , श्री.भगवान साळुंखे , श्री.संजय केळकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका, पहारेकरी, सफाईगार ही पदे मान्य करण्यात आली आहेत काय,

(२) असल्यास, अनुदानित आश्रमशाळांमध्ये मात्र ही पदे मंजूर नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका, पहारेकरी व सफाईगार ही पदे नामंजूर करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, ही पदे मंजूर करण्याबाबत मा.आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी शासनास प्रस्ताव केव्हा दिला आहे,

(५) असल्यास, या प्रस्तावांबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(७) अनुदानित आश्रमशाळांमध्ये ही पदे दिली जात नसल्याने स्नानगृहे व शौचालये साफ करण्याची कामे शिक्षकच करतात हे खरे आहे काय ?

**श्री.बबनराव पाचपुते :** (१), (२) व (३) शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध शासनाने ठरविलेला आहे. त्यानुसार अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधिक्षिका, पहारेकरी व सफाईगार ही पदे मंजूर नाहीत.

(४), (५) व (६) अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका व पहारेकरी या पदांना मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास मार्च, २००९ मध्ये प्राप्त झालेला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात हा प्रश्न आहे. राज्यामध्ये शासनाच्या आश्रमशाळा आहेत तसेच खाजगी संस्थांकडून अनुदान तत्वावर सुरु असणाऱ्या आश्रमशाळा सुध्दा आहेत. शासकीय आश्रमशाळा आणि अनुदानित आश्रमशाळा यांना शासनाने जो कर्मचारीवर्ग मंजूर केलेला आहे, त्या ठिकाणी जो स्टाफिंग पॅटर्न मंजूर केलेला आहे, त्यामध्ये प्रचंड तफावत आहे. शासकीय आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिकेचे पद मंजूर आहे, सफाईगाराचे पद मंजूर आहे तसेच पहारेकऱ्याचे पद मंजूर आहे. या पदांची आवश्यकता आहे. नेमकी हीच पदे अनुदानित आश्रमशाळांच्या स्टाफिंग पॅटर्नमध्ये मंजूर केलेली नाहीत. आयुक्तांनी शासनाला जे पत्र पाठविले ते मी वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ KGS/

ता. प्र. क्र. 13103 .... श्री. रामनाथ मोते ...

आहे की, "अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका व पहारेकरी ही पदे मंजूर नाहीत. अनुदानित आश्रमशाळांमध्ये निवासी मुले-मुली असल्यामुळे त्यांच्यावर शालेय वेळेनंतर तसेच रात्रीच्या वेळी लक्ष ठेवण्यासाठी पहारेकरी तसेच स्वच्छता राहावी म्हणून सफाईगार ही पदे असणे आवश्यक आहे. सदर पद मंजुरी बाबत या पूर्वीही प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापि, अनुदानित आश्रमशाळा संस्था चालकांकडून मंजुरी मिळण्याबाबत सातत्याने मागणी होत आहे. स्वयंसेवी संस्थांना सदरची पदे मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर लवकरात लवकर निर्णय व्हावा." या पत्राला शासनाने अद्यापही उत्तर दिलेले नाही किंवा कार्यवाही केलेली नाही. या ठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, हा विषय शासनाच्या विचाराधीन आहे. आम्ही गेल्या दहा वर्षापासून मागणी करीत आहोत. संस्था मागणी करीत आहेत. विचाराधीन असलेल्या या विषयाबाबत शासन किती दिवसात निर्णय घेणार ? शासकीय आश्रमशाळांमध्ये जी पदे आवश्यक आहेत तशी पदे अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुध्दा अत्यंत आवश्यक आहेत. ती पदे तातडीने मंजूर करण्याच्या संदर्भात शासन स्तरावरुन निर्णय होणार आहे का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ती वस्तुस्थिती आहे. या संदर्भात शासन गांभीर्याने विचार करीत आहे. लवकरात लवकर ही पदे मंजूर करण्याच्या संदर्भात सामाजिक न्याय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. या संदर्भात दोन बैठका झालेल्या आहेत. या आठवड्यात किंवा पुढच्या आठवड्यात आम्ही बैठक घेणार आहोत. याबरोबरच आणखी काही प्रश्न या निमित्ताने निर्माण झालेले आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये जी पदे दिलेली आहेत त्यातील काही पदे व्यपगत करावी लागणार आहेत आणि काही पदे वाढवावी लागणार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे...

NTK/ KGS/ D/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 13:00

श्री.बबनराव पाचपुते...

परंतु त्यामुळे शासनावर आर्थिक भार येणार नाही. नवीन प्रस्तावामध्ये ही पदे दाखविण्यात येतील. माननीय शालेय शिक्षण मंत्री, माननीय सामाजिक न्याय मंत्री व आदिवासी मंत्री या तिघांचा समावेश असलेल्या समितीची बैठक होणे आवश्यक आहे. त्या बैठकीत याबाबत निर्णय होणार आहे. यापूर्वी कॅबिनेटमध्ये हा विषय आला होता, परंतु या पदांसंबंधी माहिती घेऊन नवीन प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्याबाबत चर्चा झाली. या प्रस्तावाबाबत शासन अनुकूल आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सदस्यांनी काय विचारावयाचे आणि काय विचाराधीन आहे हे सांगण्यापेक्षा या प्रश्नामध्ये नमूद केल्याप्रमाणे स्त्री अधीक्षिका, पहारेकरी, सफाईगार या पदांची आवश्यकता आहे की नाही याबाबत प्रथम उत्तर द्यावयास पाहिजे होते. कमिटीबाबत नंतर सांगितले पाहिजे होते. या विषयासंबंधी शासन गांभीर्याने विचार करीत आहे. शासनाच्या गांभीर्याचा कृपा करुन आम्हाला अर्थ सांगितला तर बरे होईल. लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका व पहारेकरी या पदांना मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास मार्च, 2009 मध्ये प्राप्त झाला आहे," म्हणजे मार्च, 2009 ते मार्च, 2011 पर्यंत दोन वर्षांचा कालावधी झालेला आहे. शासन दोन वर्षापासून या विषयावर गांभीर्याने विचार करीत आहे म्हणजे नेमके काय करीत आहे ? आश्रमशाळांच्या संदर्भात येणाऱ्या बातम्या गंभीर आहेत. तेथे लैंगिक शोषण होते अशा बातम्या वर्तमानपत्रातून येत असतात, त्याबाबत सदनामध्ये प्रश्न मांडले जातात. तेथे पहारेकरी नाहीत, सफाई कामगार नसल्यामुळे आश्रमशाळांची साफसफाई मुख्याध्यापकांना करावी लागते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे शासनाला प्रत्येक आश्रमशाळांमध्ये बाथरुमची व्यवस्था करावीच लागते. म्हणून या पदांची आवश्यकता आहे की नाही, असेल तर यासंबंधी दोन वर्षाचा कालावधी लोटला असल्यामुळे शासनाच्या गांभीर्याचा अर्थ कसा घ्यावयाचा ते सांगावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, दिनांक 7.4.2010 रोजी कॅबिनेटसमोर हा विषय आला होता. त्या बैठकीमध्ये सध्या असलेल्या पदांपैकी समर्पित करावयाच्या पदांची व व्यपगत होणाऱ्या पदांची माहिती सादर करण्यास सांगितले आहे. या संदर्भात सामाजिक न्याय विभागाने हे मान्य केले असल्यामुळे आदिवासी विकास विभागाचा नवीन प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर घेऊन जात आहे. जून पासून या पदांना मान्यता मिळेल अशी परिस्थिती आहे आणि त्या पदांना शासन मान्यता देणार आहे.

डॉ.दीपक सावंत : परवाच या विषयावरील माझा एक प्रश्न चर्चेला आला होता. त्यावेळी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विचारलेल्या उपप्रश्नाला ह्या आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिका नेमल्या जातील, असे सांगितले होते. पण आज मंत्री महोदय सांगत आहेत की, सध्या आमच्या विभागात तशी सोय नाही, कर्मचारी वृंद मंजूर नाही. स्त्री अधीक्षिकांची नेमणूक केव्हापासून केली जाणार आहे, आजपासून, उद्यापासून की जून महिन्यापासून नेमणूक केली जाणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी परवा सुध्दा हेच सांगितले होते की, आश्रमशाळांमध्ये स्त्री अधीक्षिकांची गरज आहे. शासकीय अनुदानित आश्रमशाळा आणि शासकीय आश्रमशाळा यामध्ये फरक न करता दोन्ही ठिकाणी स्त्री अधीक्षिकांची गरज आहे. दोन्ही ठिकाणी मुली शिक्षण घेत आहेत. पण स्त्री अधीक्षिकांची पदे देत असताना शासनाला उपलब्ध असलेल्या पदांपैकी काही पदे समर्पित करावी लागतील. यासंबंधी वित्त विभागाला असे सांगण्यात आले की, यासाठी निधीची आवश्यकता नाही. फक्त काही पदे समर्पित करावयाची आहेत. काही पदे कमी करावी लागणार आहेत व काही पदे जास्त वाढवावी लागणार आहेत. जूनमध्ये शाळा सुरु होतील त्यावेळी स्त्री अधीक्षिकांची नेमणुका होतील याबद्दल मला काही शंका वाटत नाही.

श्रीमती शोभाताई फडणवीस : कोणती तरी पदे समर्पित केल्याशिवाय स्त्री अधीक्षिका, पहारेकरी व सफाई कामगार नेमले जाणार नाहीत, असे मंत्री महोदयांच्या उत्तरातून स्पष्ट झालेले आहे. आश्रमशाळांच्या दृष्टीने ही तिन्ही पदे महत्वाची आहेत. आश्रमशाळांमध्ये मुलींचे लैंगिक शोषण होत असल्यामुळे सातत्याने गेल्या 5 वर्षांपासून आम्ही सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करीत आहोत. प्रत्येक वेळी डिसेंबर महिन्यामध्ये नेमणुका केल्या जातील, जून महिन्यामध्ये नेमणुका होतील असे सांगितले जाते. परंतु अद्याप ह्या नेमणुका झालेल्या नाहीत. हा विषय अतिशय गंभीर आहे. ही पदे भरण्यासाठी शासन कोणती पदे कमी करणार आहे ते स्पष्ट होणे आवश्यक आहे. अन्यथा, 4 शिक्षक कमी करुन स्त्री अधीक्षिकांची पदे भरली तर एकीकडे शिक्षणाचा गोंधळ होईल, दुसरीकडे मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल. म्हणून स्त्री अधीक्षिका, पहारेकरी व सफाई कामगारांची पदे भरण्यासाठी कोणती पदे कमी करण्यात येणार आहेत ते मंत्री महोदयांनी प्रथम सांगावे.

3....



NTK/ KGS/ D/ KTG/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ज्याठिकाणी जास्त पदे आहेत तेवढीच कमी केली जातील, शिक्षकांची पदे कमी केली जाणार नाहीत. जून महिन्यापासून शाळा सुरु होतील त्यावेळी स्त्री अधीक्षिका, पहारेकरी व सफाई कामगार नेमले जातील.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ 13:05

ता.प्र.क्र.13103....

श्री. भगवान साळुंखे : आश्रमशाळांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय ठोस अशा प्रकारचे उत्तर द्यायला तयार नाहीत. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी पहारेकरी, सफाईगार व स्त्री अधीक्षिका या पदांवर नेमणुका केल्या जातील असे आश्वासन मंत्री महोदय देतील काय ?

श्री. बबनराव पाचपुते : या प्रश्नाचे उत्तर मी आधीच दिलेले आहे. नवीन शाळा सुरु होतील त्यावेळी त्याठिकाणी स्त्री अधीक्षिका असतील असे मी सांगितलेले आहे. यापेक्षा आणखी कोणत्या उत्तराची सन्माननीय सदस्यांना अपेक्षा आहे ?

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-2

**शासकीय व निमशासकीय कार्यालयात मागासवर्गीय कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या जातपडताळणीसाठी लागणाऱ्या विलंबाने पदोन्नती प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३) * १२८८८ श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अमरनाथ राजूरकर , प्रा.सुरेश नवले , श्री.चरणसिंग सप्रा , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.एम.एम.शेख :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जातपडताळणीसाठी लागणाऱ्या विलंबामुळे शासकीय व निमशासकीय कार्यालयातील सुमारे ९० हजार मागासवर्गीय कर्मचारी व अधिकारी यांची पदोन्नतीची प्रकरणे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०११ वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जातपडताळणीची प्रमाणपत्रे विनाविलंब मिळण्यासाठी घालण्यात आलेल्या अटी शिथिल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे :** (१) नाही.

या विभागाच्या अंतर्गत असलेल्या एकूण १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे माहे जानेवारी, २०११ अखेर एकूण ३७,०८९ इतकी सेवाविषयक प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) व (३) विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्यात येत असून सर्व समित्यांना सेतू सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

सद्य:स्थितीत मुंबई विभागातील जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना सेतुची सुविधा प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

श्री. सुभाष चव्हाण : या प्रश्नाला दिलेले छापील उत्तर चुकीचे आहे. उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, 2011 अखेर एकूण 37,089 प्रकरणे प्रलंबित आहेत. माझा प्रश्न असा आहे की, शासनाने जात पडताळणी समित्या वाढविलेल्या आहेत हे खरे आहे काय, असल्यास इतकी प्रकरणे प्रलंबित राहाण्याची काय कारणे आहेत, जे विद्यार्थी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत त्याला कोण जबाबदार आहे ? ते विद्यार्थी आत्महत्या करायला निघालेले आहेत. जात पडताळणी प्रमाणपत्र तीन महिन्याच्या आत देण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शासन करणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : जेव्हा विद्यार्थी 10वी पास होऊन 11वी आणि 12वीमध्ये शिक्षण घेत असतात त्याच वेळी त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र दिले जाते. तसेच ज्यांचे प्रकरण प्रलंबित असते त्यांनाही प्रवेशासाठी संधी दिली जाते. त्यामुळे ते विद्यार्थी वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी प्रवेशापासून वंचित राहाण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

. . . CC-3

. . . ता.प्र.क्र. 12888

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, जाति प्रमाणपत्र देने के बारे में जो समिति बनाई गई है, वह धीमी गति से काम कर रही है और समिति के पास कुल 37,089 प्रकरण पेंडिंग हैं. मेरा प्रश्न यह है कि जब तक इन लोगों की जाति की जांच-पड़ताल नहीं होती है, तब तक इनके प्रमोशन रुकेंगे या नहीं रुकेंगे ?

श्री. शिवाजीराव मोघे : प्रश्नामध्ये 90 हजार मागासवर्गीय कर्मचारी व अधिकारी यांची पदोन्नतीची प्रकरणे प्रलंबित आहेत असे म्हटलेले आहे. प्रत्यक्षात 37,089 सेवाविषयक प्रकरणे प्रलंबित आहेत. जे सर्व कागदपत्रांची पूर्तता करतात त्यांना तीन महिन्याच्या आत प्रमाणपत्र मिळते. परंतु जे संपूर्ण कागदपत्रे सादर करत नाहीत त्यांचे पोलिसांमार्फत व्हेरिफिकेशन करावे लागते आणि त्यामुळे विलंब होतो.

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, मेरा प्रश्न यह है कि जब तक इन लोगों की जाति की जांच-पड़ताल पेंडिंग है, तब तक इनके प्रमोशन रुकेंगे या नहीं ?

श्री. शिवाजीराव मोघे : प्रमोशन होईल. परंतु जोपर्यन्त जात प्रमाणपत्र सादर केले जात नाही तोपर्यन्त त्याला त्या पदावर रुजू करुन घेऊ नये असे सामान्य प्रशासन विभागाचे आदेश आहेत.

श्रीमती दिप्ती चवधरी : जात पडताळणी संबंधीच्या कामाचे संगणकीकरण किती दिवसात करण्यात येणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : पुण्यामध्ये जात पडताळणीची अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. संगणकीकरण करण्याचे आम्ही मान्य केलेले आहे. मुंबईमध्ये संगणकीकरण करण्याचे काम चालू आहे. हे काम पुणे येथे 20 दिवसात  सुरु करण्यात येईल आणि संपूर्ण राज्यामध्ये 2 महिन्यामध्ये सुरु करण्यात येईल.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याच्या संदर्भात या सभागृहामध्ये सातत्याने चर्चा होत असते. माननीय उच्च न्यायालयाने जात पडताळणी समितीच्या दोन सदस्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रश्न असा आहे की, एका वर्षाच्या आत ऑन लाईन पध्दतीने जात पडताळणीचा दाखला देऊ असे शासनाने सांगितले होते. तशा प्रकारे ऑन लाईन दाखला केव्हा देण्यात येणार आहे ?

....नंतर श्री. भोगले...

अग्रेषित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 13:10

ता.प्र.क्र.12888..... श्री.राजन तेली....

दुसरा प्रश्न असा आहे की, 37,089 प्रकरणे प्रलंबित आहेत. ही प्रकरणे केव्हापासून प्रलंबित आहेत आणि ती केव्हा निकाली काढली जातील?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ऑनलाईन प्रक्रिया करण्याचे म्हटले होते त्या प्रक्रियेनुसार मुंबईच्या तीनही समित्यांमध्ये काम सुरु आहे. पुढील 20 दिवसात पुण्यामध्ये आणि दोन महिन्यात राज्यभर ऑनलाईन प्रक्रिया सुरु होणार आहे. ही पेंडन्सी अलिकडच्या काळातील म्हणजे 1 जानेवारीपासूनची आहे. जर कागदपत्रांची पूर्तता केली जात असेल तर तीन महिन्यात आत व्हॅलिडीटी दिली जाते.

श्री.हुसेन दलवाई : हा प्रश्न सभागृहात अनेकदा चर्चेला आला आहे. जात पडताळणी समितीच्या कार्यालयामध्ये आर्थिक व्यवहार केले की, ताबडतोब प्रमाणपत्र मिळते. निवडणुकीच्या संदर्भात जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी मी चिपळूण येथील कुणबी समाजाच्या एका महिला उमेदवारांना समितीच्या कार्यालयात घेऊन गेलो होतो. सुरुवातीला ते प्रमाणपत्र देण्यास तयार नव्हते. फार आरडाओरडा केल्यानंतर चार-पाच लोकांना प्रमाणपत्र दिले गेले. मुस्लीम समाजातील ओबीसी प्रवर्गातील लोकांना त्रास दिला जातो. खाटीक म्हटल्यानंतर जो मांस विक्रीचा धंदा करतो त्याला लगेच प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. जात ही त्या व्यक्तीच्या नावावरुन, चेहऱ्यावरुन, वागण्यावरुन दिसून येते. परंतु मुद्दाम त्रास देण्याचे काम केले जाते. या प्रक्रियेमध्ये सुधारणा करुन लोकांना रिलिफ मिळणार आहे का? वाणी समाजाच्या लोकांना वैश्य वाणी किंवा अमुक वाणी, तमुक वाणी समजले जाते. कोणतीही पोटजात असली तरी तो वाणीच असतो. त्यामुळे हे त्रास देण्याचे प्रकार थांबतील काय?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, चेहऱ्यावरुन जात कशी कळते? चुकीची नोंद रेकॉर्डवर राहू नये.

**उप सभापती** : काहींना फेसरिडींगचे नॉलेज असते, त्या संदर्भात माननीय सदस्य बोलले आहेत.

श्री.शिवाजीराव मोघे : शासनाकडे चेहऱ्यावरुन ओळखणारे एक्स्पर्ट नाहीत. कागदपत्रे दिल्याशिवाय जात ओळखता येत नाही. जातीचे प्रमाणपत्र मिळण्याची प्रत्येक माणसाला संधी मिळावी. अनेक प्रकरणांमध्ये स्वल्पविराम, पूर्णविराम असल्यामुळे देखील अडचणी निर्माण होतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12888.....

श्री.हुसेन दलवाई : सोशिऑलॉजी विषयाचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येईल की, चेहऱ्यावरुन जात कळू शकते. अनेकांनी संशोधन केल्यानंतर हे सिध्द केले आहे. ज्यांची बोलीभाषा वेगळी आहे, जेवणाच्या ताटामध्ये कोणते पदार्थ कुठे ठेवतात, व्यवसाय कोणता करतात यासंबंधीचा अभ्यास करुन स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, मेडिकल, इंजिनिअरिंग, तंत्रशिक्षणाच्या कोर्सला प्रवेश घेण्यामध्ये अडचण येऊ नये म्हणून दोन वर्ष अगोदरच विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व्हेरिफाय करावे लागते. जोपर्यंत व्हॅलिडीटी प्रमाणपत्र सादर केले जात नाही तोपर्यंत नोकरीमध्ये अपॉईंटमेंट, प्रमोशन दिले जात नाही. इतकेच नव्हे तर ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना व्हॅलिडीटी प्रमाणपत्र सादर करावे लागते. यासाठी अर्ज करणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. या कामासाठी विभागाला एका महिन्यात स्वतंत्र अधिकारी उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. आतापर्यंत कर्मचारी अतिरिक्त काम करीत होते. यापुढे ऑनलाईन पध्दत सुरु झाल्यामुळे फार कमी वेळेत व्हॅलिडीटी प्रमाणपत्र मिळेल असा मला विश्वास आहे.

नंतर 2ई.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12888........

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे हा सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांसमोर एक डोकेदुखीचाच विषय झालेला आहे. अशा जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केल्यानंतर किती दिवसात ती पडताळणी व्हावी अथवा तो अर्ज निकाली काढावा अशा सूचना शासन संबंधित समितीला देणार काय ? कारण 20-20 वर्षापूर्वी नोकरीत लागलेल्यांची पडताळणी करुन घेण्याबाबत शासनाने आदेश काढले आहेत. अशा चुकीच्या पध्दतीने सांगून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले जातात. नवीन नोकरीत लागलेल्यांच्या बाबतीत मी समजू शकतो. असे आदेश शासन मागे घेणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, सन 1995 पूर्वी जे शासकीय नोकरीत लागलेले आहेत अथवा प्रमोशन घेतले असेल आणि त्यांनी खोटे जात पडताळणी प्रमाणपत्र घेतले असेल तर त्यांना शोधून त्यांना प्रमोशन मिळणार नाही पण सन 1995 नंतर जे नोकरीत लागले असतील त्यांना नोकरीतून काढण्याची व्यवस्था शासनाने या निर्णयाच्या माध्यमातून केलेली आहे. आणि मते असेच केले पाहिजे. कारण घटनेने या लोकांना दिलेल्या अधिकारावर कोणीही अतिक्रमण करु नये, यासाठीच शासनाचा हा निर्णय आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी किती दिवस अगोदर अर्ज करावा, किती दिवसात तो निकाली काढावा अशा प्रकारे काही तरी काल मर्यादा शासन ठरविणार की नाही ? नुकत्याच ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या व जात पडताळणी प्रमाणपत्र नसल्याने अनेक लोकांना निवडणुकीपासून दूर रहावे लागले, त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले. मंत्री महोदयांनी या पध्दतीमध्ये संगणकीकरण होत असल्याचे सांगितले पण संगणकीकरणामुळे हा प्रश्न सुटेल असे मला तरी वाटत नाही. म्हणून यासाठी स्पेसिफिक असा कालावधी घालून देणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, संपूर्ण कागदपत्रे सादर केल्यानंतर तीन महिन्याच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी केलेला अर्ज निकाली काढणे बंधनकारक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे उदाहरण दिले. त्या अनुषंगाने मी असे लक्षात आणून देतो की, निवडणुका हा विषय वेळेवरच असल्याने तसेच सीव्हीसी ही क्वॉसी ज्युडिशियरी समिती

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12888........ श्री. शिवाजीराव मोघे .....

असल्याने तो उमेदवार निवडून आल्यानंतर त्याचे प्रमाणपत्र व्हॅलिड आहे की इनव्हॅलिड याची तपासणी करण्यासंबंधीचा निर्णय आपण या सुधारणेच्या माध्यमातून घेतलेला आहे. म्हणून निवडणुकीचा फॉर्म भरताना सीव्हीसीची गरज नसते. निवडून आल्यानंतर मात्र त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागते.

-------

.....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) येथील सासवणे मांडवा विभाग मच्छिमार सहकारी संस्थेअंतर्गत श्री.रमेश सदानंद नाखवा यांच्या नावे बँकेत खोटे खाते उघडल्याबाबत**

**(4) *13154 श्री.जयंत पाटील , श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) येथील सासवणे मांडवा विभाग मच्छिमार सहकारी संस्था.मर्या.,संस्थेअंतर्गत सभासद श्री.रमेश सदानंद नाखवा यांच्या नावे बँकेत खोटे खाते उघडून राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजने अंतर्गत 35 टक्के जमा रक्कम खात्यातून काढल्या संदर्भात जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांचेकडे लेखी तक्रार दिनांक 2 ऑगस्ट, 2010 रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, खोटे बँक खाते उघडून बँकेतून रक्कम काढणाऱ्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबतचा पोलीस विभागामार्फत चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(3) नसल्यास, विलंब लागण्याची कारणे कोणती ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2) सदर प्रकरणी पोलीस विभागामार्फत चौकशी करण्यात आली असता तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आल्याने तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, याच प्रश्नावर मी सभागृहात परवा लक्षवेधी सूचना दिली होती. त्यावरील चर्चेच्या वेळेला मंत्री महोदयांनी संबंधितांना निलंबित करण्यात येईल अशी घोषणा केली होती. या प्रकरणातच श्री. रमेश नाखवा यांनी त्यांची फसवणूक झाल्याबद्दल दि. 7.1.2010 रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यात त्यांनी माझ्या नावावर बोगस कर्जाची उचल झाल्याचा उल्लेख केला आहे. तसेच दि. 20.1.2010 रोजी पुन्हा प्रमाणपत्र दिलेले आहे की, माझ्या नावावर बोगस कर्जाचा उचल झालेला आहे. मी बँकेचा चेअरमन आहे म्हणून मला माहिती आहे. ज्या भागात असे बोगस खाते उघडण्यात आले त्यासाठी 100-200 महिला हे खाते उघडण्यासाठी आल्या होत्या. अशा प्रकारे हे खाते उघडण्यात आलेले आहे. तसेच एनसीडीसीच्या माध्यमातून ज्या गावात सक्षम मच्छिमार संस्था आहेत तेथेच बोगस संस्था उभ्या करण्याची मोहीम सुरु आहे. त्या माध्यमातून 25 कोटीच्या कर्जाचा उचल करण्यात आला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13154 .....**

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, सासवणे गावात कोपरी सोसायटी उघडली गेली असून त्याच्याही आधी या गावात एक सोसायटी अस्तित्वात होती. या सोसायटीच्या संदर्भात कोणतीही तक्रार नसतांना या गावात दुसरी नवीन सोसायटी उघडण्यात आली त्यामुळे यासंदर्भात चौकशी केली जाईल काय ?

सभापती महोदय, पोलीस विभागाचा खाते उघडण्याच्या संदर्भात जो रिपोर्ट आहे तो चुकीचा आहे. या प्रकरणाची कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची सीआयडी मार्फत फेर चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिनांक 1 ऑक्टोबर, 2010 रोजी यासंदर्भात तक्रार केली होती तसेच रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. सुभाष प्रभाकर पाटील यांनी बोगस खाते उघडण्याच्या संदर्भात दिनांक 3 ऑगस्ट,2010 रोजी तक्रार केली होती व श्री. रमेश नाखवा या इसमाच्या खात्यामधील रक्कम परस्पर काढली गेली अशीही तक्रार केली होती. या विषयाच्या अनुषंगाने रायगड जिल्हयाचे एस.पी. यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून या चौकशी अहवालामध्ये "अशा प्रकारचा कोणताही प्रकार घडलेला नाही" असे सांगण्यात आले आहे. संबंधित व्यक्तीने स्वत:चे अकाऊंट स्वत: ओपन केलेले आहे. सदर व्यक्तीला 14 लक्ष 81 हजार 100 रुपये मंजूर झाले होते व सदर व्यक्तीच्याच संगनमताने संबंधित व्यक्तीची मोठी मुलगी दिपीका व मुलगा प्रथमेश यांनी वडिलांच्या खात्यामधील पैसे काढले होते अशी माहिती मिळालेली आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी एक नवीनच माहिती सभागृहाच्या समोर आणलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले की, ही बँक माझ्या अधिपत्याखाली असून या बँकेचा मी चेअरमन आहे. या बँकेवर 100-200 लोकांनी मोर्चा आणून, पोलीस आणून अकाऊंट ओपन केले गेले. प्रेशर खाली बँकेने अकाऊंट ओपन कसे काय केले असा नवीन प्रश्न आता समोर आलेला आहे. प्रेशर खाली अकाऊंट कसे काय ओपन करण्यात आले असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. बँकेत अशा प्रकारे दबाव आणून खाते ओपन केल्याची तक्रार सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी केलेली आहे. सदस्य म्हणतात की, यासंदर्भात प्रतिज्ञापत्र 2-3 वेळेस करण्यात आलेले आहे. परंतु पोलीस तपासात अशा प्रकारची बाब समोर आलेली नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13154 .....**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची फेर तपासणी सीआयडी मार्फत केली जाईल काय अशा प्रकारची मी मागणी केलेली आहे. हा प्रकार घडला तेव्हा मी स्वत: बँकेत होतो. त्योवेळेस बँकेत पोलीस आले व त्यांच्या समोर 8-10 लोकांचे अकाऊंट ओपन केले गेले. ज्यानी खाते उघडलेले आहेत त्यांचा आंगठा सुध्दा पेपरवर आहे. हा विषय फार गंभीर आहे. खात्याचा विषय वेगळा आहे. या सोसायटीच्या माध्यमातून लाकडी बोटी न घेता फायबर बोटी घेण्यात आलेल्या आहेत व यासंदर्भात तक्रार केल्यामुळे बँकेने पैसे देण्यास बंदी घातली होती. लाकडी बोटीची किंमत 45 लक्ष रुपये असून फायबर बोटीची किंमत केवळ 9 लक्ष रुपये आहे. 45 लाख रुपये किंमतीच्या लाकडी बोटीमध्ये 50 टक्के सबसीडी एनसीडीसी बँके मार्फत दिली जाते. सबसीडी पेक्षाही कमी किंमतीची बोट घेतली जाते व लाकडी बोटीची सबसीडी घेतली जाते. ही फार गंभीर बाब आहे. काल माननीय मंत्रीमहोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात कबूल देखील केलेले आहे. या प्रकरणामध्ये केवळ एकच प्रश्न आहे असे नसून अशा प्रकारे सोसायटया उघडण्याची मोहीम मंत्रालयातील अधिकारी करीत आहेत. यामध्ये कोणत्याही मंत्री महोदयांचा संबंध नाही. ही जी सर्व मोहीम आहे ती मंत्रालयातील अधिकारीच राबवित आहेत. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात येईल काय अशी माझी मागणी आहे. सीआयडी चौकशी मधूनच यामधील सत्य प्रकार उघडकीस येईल. एनसीडीसीच्या माध्यमातून या ठिकाणी मोठया प्रमाणात लूट सुरु आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. भास्कर जाधव हे चांगल्या प्रकारे प्रश्नाची माहिती घेतात व सभागृहात चांगल्या प्रकारची उत्तरे देतात, आमच्या सारख्या खट आमदारांना तुम्ही गप्प बसवता हे सर्व आम्हाला माहिती आहे. या विषयाच्या संदर्भात मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, आपण हे प्रकरण जेवढे लाईटली घेत आहात तेवढे सोपे प्रकरण नाही. कैंद्रीय मंत्री माननीय शरदचंद्र पवार यांनी एनसीडीसीसाठी भरपूर पैसे दिलेले आहेत परंतु हे पैसे गरिबांपर्यंत पोहचत नाही, हे पैसे ख-या मच्छीमारांपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे हे प्रकरण दडपण्याचे काम न होता या प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत केली जावी अशी माझी मागणी आहे.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड.....

VTG/ D/ ST/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 13.25

ता.प्र.क्र. 13154 ...

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय, परवाच्या दिवशी या विषयासंबंधीची लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती त्यावेळी एका वेळेला 9 गटांच्या लोकांनी कर्ज प्रकरण केले होते त्यातील आठ गटाच्या लोकांनी प्रथम लाकडी बोटीसाठी कर्जाची प्रकरणे मंजूर करुन घेतली होती आणि नंतर त्यांनी फायबरच्या बोटी बांधल्या होत्या हे प्रकरण उघडकीस आले होते. त्यातील 30 लाख रुपयांची वसुली करण्यात येत आहे असे त्यावेळी सांगण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एकाच वेळी अनेक गोष्टींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. मघाशी बॅकेच्या संदर्भातील एक विषय त्यांनी मांडला होता अर्थात तो विषय आपण बाजूला ठेवू या. मी सभागृहात असतांना असा प्रकार घडला होता अशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक गंभीर बाब सांगितली होती. वास्तविक त्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणे आवश्यक होते परंतु तोही विषय आपण थोडा बाजूला ठेवू या .या प्रकरणामध्ये सबसिडी मिळविण्याच्या दृष्टीने कोणी बोगस प्रकरणे केली असतील तर त्या बाबतीत केवळ चौकशी करुन हा प्रश्न सुटणार नाही त्यामुळे गेल्या पाच वर्षात अशा प्रकारची किती प्रकरणे झाली आहेत, खोटी प्रकरणे करुन किती प्रकरणात सबसिडी मिळविण्यात आली होती, याची देखील चौकशी करावी लागेल. खोटे आंगठे दाखवून, दुसरे सभासद दाखवून सोसायटया रजिस्टर करुन पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला आहे काय, अशा प्रकारे या प्रकरणामध्ये व्यापक स्वरुप असल्याचे मला वाटते. त्यामुळे आतापर्यत या प्रकरणाची चौकशी अन्य अधिका-यांमार्फत करण्यात आली होती आता या प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे परंतु सीआयडी मार्फत चौकशी करावयाची झाल्यास ते प्रकरण गृह विभागाकडे जाईल आणि तो विभाग ही चौकशी मान्य करील किंवा करणारही नाही तसेच त्या चौकशीला बराच कालावधीसुध्दा लागेल तेव्हा या प्रकरणाची चौकशी विभागाच्या सचिवांच्या मार्फत करण्यात येईल

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**जिल्हा परिषद सेवेतील माध्यमिक शिक्षक संवर्गातील जेष्ठता सूची बी.एड. अर्हता दिनांकापासून तयार करण्याच्या मागणीबाबत**

**(५) * १३३०० अॅड. उषाताई दराडे , श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद सेवेतील माध्यमिक शिक्षक संवर्गातील जेष्ठता सूची बी.एड. अर्हता दिनाकांपासून तयार करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र शिक्षक संघटना, जिल्हा शासन, बीड यांनी दिनांक १२ एप्रिल, २०१० रोजी वा त्यासुमारास मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर मागणीच्या तयार केलेल्या जेष्ठता सूचीत त्रुटी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जेष्ठता सूची त्रुटी विरहित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील,श्री.जयंत पाटील यांच्याकरिता :** (१), (२), (३), (४) व (५) याबाबत अशी वस्तुस्थिती आहे की, शासनाच्या नियमाप्रमाणे शिक्षकांची सेवाजेष्ठतासूची जिल्हा परिषदेतर्फे तयार केलेली असून त्याबाबत संघटनेची उक्त निवेदन जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले नाही.

अॅड.उषा दराडे : सभापती महोदय, जिल्हा परिषद सेवेतील माध्यमिक शिक्षक संवर्गातील ज्येष्ठता सूची बी.एड. अर्हता दिनांका पासून तयार करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र शिक्षक संघटना जिल्हा , बीड यांनी दिनांक 12 एप्रिल 2010 रोजी निवेदन दिले होते हे खरे आहे काय असा प्रश्न मी विचारला होता परंतु हे निवेदन प्राप्त झालेले नाही असे चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. या सेवा ज्येष्ठता यादी मध्ये त्रुटी आहेत परंतु त्याही बाबतीत उत्तर देण्यात आलेले नाही . या संदर्भात शासन काय करणार आहे, जे निवेदन प्राप्त झालेले आहे त्याबाबतीत कोणती भूमिका घेणार आहे त्याचबरोबर सेवा ज्येष्ठता यादीमध्ये ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्यासाठी कोणती पावले उचलणार आहे ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या संबंधीचे निवेदन शासनाला प्राप्त झालेले नाही. हे निवेदन प्राप्त झाल्याशिवाय त्यामधील त्रुटी कळणार नाही सन्माननीय सदस्यांनी जर निवेदन दिले तर त्यातील मुद्याबाबत विस्तृतपणे चर्चा करता येईल.







असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय,जिल्हा परिषदेतील शिक्षकाच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषदांच्या काही माध्यमिक शाळा आहेत. तसेच काही खाजगी माध्यमिक शाळाही आहेत. जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शाळाचे नियम आणि खाजगी माध्यमिक शाळांचे नियम वेगवेगळे आहेत. माध्यमिक शिक्षक संवर्गातील शिक्षकाची सेवा ज्येष्ठता सूची ही बी.एड. च्या अर्हतेच्या दिनांकापासून तयार करण्यात यावी अशा प्रकारचा हा विषय आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषदांमध्ये दोन प्रकारच्या सेवा ज्येष्ठता याद्या तयार करण्याची पध्दत आहे.1965 पूर्वी जे शिक्षक लागले ते पदवीधर होते आणि नंतर ते बी.एड. झाले होते अशा वेळेस काही जिल्हा परिषदांमध्ये जे शिक्षक ज्या दिवसापासून नोकरीस लागले त्या दिवसापासून सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली आणि काही जिल्हा परिषदांमध्ये मात्र ते शिक्षक ज्या दिनांकापासून ते बी.एड. झाले त्या दिवसापासून सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली होती. वास्तविक पाहता ज्या दिवशी ते बी.एड. झाले होते त्या दिवसापासून सेवा ज्येष्ठता यादी तयार करावयास पाहिजे होती व ही बाब महत्वाची असून सर्व खाजगी माध्यमिक शाळांमध्ये हीच पध्दत सुरु आहे. परंतु जिल्हा परिषदांमध्ये हा घोळ असल्यामुळे अनेक शिक्षक पदोन्नतीपासून वंचित आहेत त्यांची पदोन्नती थांबलेली आहे.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13300....

श्री.वसंतराव खोटरे...

सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सेवा ज्येष्ठता यादी बी.एड. अर्हता प्राप्त इ ालेल्या तारखेपासून धरणार की, नेमणुकीच्या तारखेपासून धरणार आहात, आपणास अभिप्रेत असलेली सेवा ज्येष्ठतेची तारीख कोणती आहे?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी जागा रिक्त होते त्यावेळी शिक्षकांना सेवेत घेतले जाते.त्यामुळे त्या शिक्षकाच्या नेमणुकीची तारीख सेवा ज्यष्ठतेसाठी धरणे क्रमप्राप्त आहे. पदोन्नतीच्या बाबतीत देखील डी.एड. झालेले शिक्षक सेवांतर्गत बी.एड. झाल्यानंतर इन् डयू सर्व्हिस....

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही. शिक्षकांची अर्हता पदवी आणि बी.एड. अशी आहे. काही शिक्षक पदवीधर म्हणून नोकरीला लागतात आणि त्यानंतर ते बी.एड. होतात. त्यामुळे बी.एड. झाल्यानंतर त्यांची सेवा ज्येष्ठता सुरु होते. परंतु जर तो शिक्षक अगोदर डी.एड. म्हणून लागला असेल व नंतर पदवीधर झाला असेल तर सेवा ज्येष्ठता यादीमध्ये त्या शिक्षकाचा क्रमांक खाली सरकतो. परंतु केवळ पदवीधर अर्हता धारण करणारे शिक्षक सेवेत लागले आहेत त्यांची सेवा ज्येष्ठता बी.एड. झालेल्या शिक्षकांप्रमाणे धरणार काय? जिल्हा परिषदेमधील शिक्षकांच्या सेवा ज्येष्ठता यादीसाठी आपण कोणती अर्हता ग्राह्य धरणार आहात?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : जे शिक्षक डी.एड. झाले असतील त्यांनी सेवांतर्गत बी.एड. करावे आणि त्यांना इन् डयू सर्व्हिस प्रमोशन देण्यात यावे अशाप्रकारे प्रमोशनसाठी सेवा ज्येष्ठता धरली जाते. त्याप्रमाणे् शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून धोरण ठरविले जाते. त्याकरिता हायकोर्टामध्ये एक केस टाकण्यात आली होती त्या निमित्ताने हायकोर्टाने शिक्षण विभागाला सूचना दिल्या की, याबाबत आपण एक धोरणात्मक निर्णय घ्यावा. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाने विधी व न्याय विभागाकडे हे सर्व प्रकरण पाठविले आहे. त्यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या अहवालावर पुढील निर्णय अवलंबून राहील. आपण व्यक्त केलेल्या सर्व गोष्टी निवेदनामध्ये आहेत. विधी व न्याय विभागाकडून अहवाल आल्यानंतर भविष्य काळात त्यासंबंधी योग्य तो निर्णय घेणे क्रमप्राप्त होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ D/ ST/

ता.प्र.क्र. 13300....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील सेवा ज्येष्ठतेच्या संदर्भातील दोन विषय आपल्यासमोर आहेत. एखादा शिक्षक सुरुवातीला एस.एस.सी किंवा एच.एस.सी., डी.एड. अशाप्रकारची अर्हता धारुन करुन नोकरीला लागतो. नंतरच्या काळात तो आपली अर्हता वाढवितो व प्रशिक्षित पदवीधर होतो. दुसरा विषय असा आहे की, जो शिक्षक डायरेक्ट प्रशिक्षित पदवीधर म्हणून लागतो अशा दोहोंच्या सेवा ज्येष्ठतेसंदर्भातील वाद आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने या शिक्षकांची सेवा ज्येष्ठता यादी कशाप्रकारे निश्चित करावी याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. न्यायालयाने ऑलरेडी निर्णय दिला असल्यामुळे त्या निर्णयानुसार आपण कारवाई करणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर अभिप्राय मागविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विधी व न्याय विभागाकडे प्रकरण पाठविले आहे. त्यावर विधी व न्याय विभागाकडून फीड बॅक आल्यानंतर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा योग्य तो मान राखून सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, शासनाने बीड जिल्ह्यासाठी केलेली ज्येष्ठता यादी पुन्हा एकदा तपासणार काय? त्यामध्ये त्रुटी राहिल्या असतील तर त्या आपण दुरुस्त करणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : होय.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13300 ......

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, दरवर्षी प्रत्येक जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून अशा प्रकारच्या ज्येष्ठता याद्या तयार करण्याचे काम हाती घेण्यात येते. पण शासनाच्या गचाळ कारभारामुळे वर्षानुवर्षे या याद्या तयार होत नाहीत. परिणामी ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या लेकरांना शिक्षण देण्याचे पवित्र काम करणाऱ्या शिक्षकांना आपल्याकडून न्याय मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून प्रत्येक वर्षी डिसेंबर अखेरपर्यंत शासनाच्या नियमाप्रमाणे ज्येष्ठता याद्या तयार करणार आहात काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्याप्रमाणे खाजगी शाळातील बी.पी.एड.अर्हता धारक शिक्षकांना वर्ग-2 मध्ये पदोन्नती दिली जाते, त्याप्रमाणे जिल्हा परिषदांच्या माध्यमिक शाळांमधील बी.पी.एड. अर्हता धारक शिक्षकांना पदोन्नती दिली जात नाही. हा अन्याय कशासाठी केला जातो? खाजगी शाळांमधील आणि जिल्हा परिषदांच्या शाळांमधील सेवा प्रवेशाचे नियम सारखेच आहेत. म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळेतील बी.पी.एड.अर्हता धारण केलेल्या शिक्षकांना आणि माध्यमिक शाळेमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना वर्ग-2 ची पदोन्नती कधी देणार आहात ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी पहिला प्रश्न विचारला आहे,त्याबाबत सांगावयाचे तर जिल्हा परिषद सेवेतील माध्यमिक शिक्षक संवर्गातील ज्येष्टता याद्या डिसेंबरपर्यंत तयार करण्याबाबत सांगितले जाईल. या विषयाबाबत शासनाची भूमिका सकारात्मक आहे. पूर्वी सेवा ज्येष्ठतेसाठी 30 टक्के आरक्षण होते ते आता जवळजवळ 37.5 टक्के करण्यात आलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी बी.पी.एड. अर्हता धारक शिक्षकांच्या बाबतीत जो विषय मांडलेला आहे, तो सध्या न्यायालयाच्या प्रक्रियेमध्ये आहे. याबाबत न्यायालयामध्ये जो निर्णय होईल, तो अवलंबिण्यात येईल.

-----

. . . .2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथील प्रस्तावित गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या विकासाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(6) *14070 श्री. एस. क्यू. ज़मा** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर येथील प्रस्तावित गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या विकासाचे काम अतिशय संथगतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, 2010 मध्ये वा त्यादरम्यान दिसून आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाने सदरील प्राणी संग्रहालयाच्या विकासासाठी काही उपाययोजना आखली आहे काय,
(3) असल्यास, सदरील उपाय योजनेनुसार उपरोक्त प्राणी संग्रहालय पूर्णत्वास जाण्यास किती काळ लागणार आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (1) प्रस्तावित गोरेवाडा प्राणी संग्रहालयाचा प्रकल्प आराखडा केंन्द्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांना मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला होता. सदर आराखड्यामध्ये काही दुरुस्ती सुचविण्यात आली असल्याने त्याबाबत कार्यवाही सुरु आहे व अद्याप सदर आराखड्यास अंतिम मान्यता दिलेली नसल्याने त्यातील प्रस्तावित विकासाची कामे करता आलेली नाहीत.
(2) केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडील निर्देशानुसार सुधारित आराखडा सुधारित करणेसाठी मे.बर्नाड हॅरिसन ॲन्ड फ्रेन्ड्स, सिंगापुर (सल्लागार) यांना कळविण्यात आले असून त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच विदर्भात वनविभागाचे वन्य प्राणी बचाव केंद्र स्थापित झाले नसल्याने प्राधान्याने नागपूर या केंद्रीय स्थळी वन्यप्राणी बचाव केंद्राची स्थापना करणे गरजेचे असल्याचे लक्षात घेता बचाव केन्द्राचा प्रस्ताव मंजुरीसाठी केन्द्रीय प्राणी प्राधिकरण, नवी दिल्लीकडे पाठविण्यात येत आहे. सदर बचाव केंद्र प्राणीसंग्रहालयाचा भाग असून ज्या ठिकाणी आराखड्यात दाखविले होते त्याच ठिकाणी प्रस्तावित केले आहे.
(3) व (4) सुधारित आराखडा केन्द्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली कडून अंतिमत: मंजूर झाल्यानंतर प्राणी संग्रहालयाची व्याप्ती मोठी असल्याने कामे टप्प्या टप्याने घेणे आवश्यक राहील.

श्री.एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, मंत्री महोदय के लिखित उत्तर से मेरा समाधान हो गया है, क्योकि कल पेश किए राज्य के बजट में गोरेवाडा प्राणी संग्रहालय के लिए प्रोवीजन किया गया है.

----

. . . .2 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजास अनुसूचित जमातीच्या दाखल्याचे**

## वैधता प्रमाणपत्र अद्यापही देण्यात आले नसल्याबाबत

**(7) *14039 श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजास अनुसूचित जमातीच्या दाखल्याचे वैधता प्रमाणपत्र अद्यापही देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ठाकर जमातीस अनुसूचित जमातीच्या सवलातीपासून वंचित करता येणार नाही असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले व ही बाब मा.सर्वोच्च न्यायालयानेही मान्य केली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, ठाकर समाजाला वैधता प्रमाणपत्र न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(4) राज्य शासनाची ठाकर समाजास अनुसूचित जमातीच्या दाखल्याचे वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत भूमिका काय आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) हे खरे नाही.

दिनांक 28.2.2011 पर्यंत एकूण 405 प्रकरणे प्राप्त असून त्यापैकी 15 प्रकरणे वैध, 243 प्रकरणे अवैध व 147 प्रकरणे प्रकरणे प्रलंबित आहेत.

(2), (3) व (4) केंद्र शासनाने राज्यासाठी घोषित केलेल्या अनुसूचित जमातीतीच्या यादीत अनुक्रमांक 44 वर ठाकूर, ठाकर, का-ठाकूर, मा-ठाकूर, मा.ठाकर अशी नोंद आहे.

शिल्पा विष्णू ठाकूर वि.महाराष्ट्र शासन याचिका क्र.5028/2006 (120 रिट याचिका संलग्न) या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठाने दि.7.5.2009 रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करताना उमेदवारास नामसाधर्म्याचा फायदा देता येणार नाही. त्याच्या दाव्या संदर्भात आवश्यक ते कागदपत्र सादर करण्याबरोबरच उमेदवाराने त्याच्या जमातीचा आप्तभाव सिध्द करणे आवश्यक आहे. सदर न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते.

तसेच महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 (2001 चा महाराष्ट्र क्र.23) तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, 2003 च्या नियम 11 (2) मधील आवश्यक कागदोपत्री पुरावे सादर करुन जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या उमेदवारास जमातीची वैधता प्रमाणपत्र मिळते.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, यापूर्वी सदनामध्ये दि.09-04-2002 रोजी या विषयाच्या अनुषंगाने लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली होती. तसेच दि.09-04-2010 रोजी ठाकर समाजाच्या संदर्भात पहिल्यांदाच एक लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये चर्चेसाठी आली होती. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी मंत्रालयामध्ये आपल्या अध्यक्षतेखाली दि.09-06-2010 आणि 11-08-2010 रोजी दोन बैठका घेतल्या. या समाजाच्या संदर्भातील जी काही कागदपत्रे आहेत, ती वेळोवेळी देण्यात आली आहेत. 1880 च्या गॅझेटमध्ये हे लोक 400 वर्षापूर्वी सह्याद्रीच्या बेल्टमध्ये आले आहेत असा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उल्लेख आहे आणि तशा प्रकारचा दस्तऐवज शासनाला देऊन सुध्दा आजमितीपर्यंत त्या समाजाला न्याय दिलेला नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जो ठाकर समाज आहे, त्याला वैधता प्रमाणपत्र कधी देण्यात येणार आहे? माझ्याकडे अजून अशी बरीच प्रकरणे आहेत. त्यातील 14 जणांच्या बाबतीत असे झाले आहे की, वडिलांना वैधता प्रमाणपत्र दिले परंतु मुलाला दिलेले नाही. काही ठिकाणी मुलाला वैधता प्रमाणपत्र दिले पण मुलीला दिलेले नाही, अशी प्रकरणे मी सदनामध्ये सादर केलेली आहेत.म्हणून आपण या समाजाला कशा प्रकारे न्याय देणार आहात असा माझा प्रश्न आहे. तसेच याठिकाणी उत्तरामध्ये शिल्पा ठाकूर यांच्या केसच्या बाबतीत न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.परंतु शासनाला न्यायालयाने असे आदेश दिलेले आहेत की,कोणत्याही परिस्थितीत जात पडताळणी करताना त्यांच्या चालीरीती काय आहेत ते तपासून पहावे. मात्र माझी अशी माहिती आहे की, शासनाने तशा प्रकाराची तपासणी न करता या समाजावर अन्याय केलेला आहे. त्यामुळे या समाजाला दाखले देण्याच्या संदर्भात कधी कार्यवाही करणार आहात? तसेच शासनाकडे एकंदर 147 प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या प्रकरणांना देखील कधी न्याय देणार आहात आणि त्याबाबत कधी पूर्तता करण्यात येणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मागच्या अधिवेशनामध्ये सुध्दा लक्षवेधी सूचना आली होती.त्याबाबत चर्चा करताना ठाकूर समाजाला न्याय देण्याच्या दृष्टीने दोन वेळा बैठका झाल्या. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये आयुक्त आणि विभागाचे सचिव यांनाही बोलविण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी श्रीमती स्मिता ठाकूर यांच्या हाय कोर्टातील केसबाबत उल्लेख केला. तेथील पूर्ण बेंचने असा निर्णय दिलेला आहे की, यापुढे अशा केसेस विचारात घेताना, प्रत्येक केसबाबत छाननी झाली पाहिजे. त्यामुळे शासनाकडे देण्यात आलेली जी प्रकरणे आहेत, त्याबाबतीत " Each Case must be considered in the backdrop of its own facts." म्हणजे प्रत्येक केस स्वतंत्ररित्या पाहिली पाहिजे अशा प्रकारचा कोर्टाने निर्णय दिल्यामुळे आता ही सगळी प्रकरणे तशा प्रकारे तपासली जातात.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14039....

श्री. बबनराव पाचपुते......

147 प्रकरणे लवकरात लवकर तपासून निर्णय देण्यात यावेत, अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून मी आणि सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली हा प्रश्न उपस्थित करीत आहोत, असे असताना या प्रश्नाच्या संदर्भात पुन: पुन: तेच ते उत्तर देण्यात येते आहे. कठपुतळीचा डान्स कोण करतात, ठाकर समाज करतो की इतर लोक करतात याचे उत्तर देण्यात यावे. ज्या समाजाने ही कला टिकविली त्या ठाकर समाजाला अनुसुचित जातीच्या दाखल्या पासून वंचित ठेवण्यात येणार असेल तर प्रगत महाराष्ट्र म्हणण्याचा या शासनाला अधिकार आहे काय, याबाबतीतील निर्णय लवकरात लवकर घेण्यात येईल काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या तिन्ही प्रश्नाची उत्तरे मी दिलेली आहेत. जात पडताळणीच्या बाबतीत ज्यांनी अर्ज केला आहे त्यांना, ते ज्या जातीचे आहेत, याचा पुरावा द्यावा लागतो. त्यांची संस्कृती, राहणीमान या सगळ्या गोष्टींची माहिती द्यावी लागते. ती माहिती त्यांनी दिली पाहिजे. ती माहिती दिल्यानंतर त्यासंदर्भात चौकशी करुन ताबडतोब निर्णय दिला जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या जात पडताळणी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी या जातीच्या लोकांना त्रास देत आहेत अशा लोकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तातडीने बदली करण्यात येईल काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ज्यांच्या बद्दल तक्रारी आहेत त्यांची तातडीने बदली करण्यात येईल. निलंबनाचा प्रस्ताव सुध्दा आलेला आहे. त्यासंदर्भात सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या संबंधीची लक्षवेधी सूचना नागपूर अधिवेशनामध्ये विचारण्यात आली होती, पण हा प्रश्न अजून तसाच प्रलंबित आहे. यांच्या पूर्वजांना अशा प्रकारचे दाखले मिळालेले आहेत. 1880 सालापासून सहयाद्रीच्या कुशीत राहणारा समाज असा यांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. या समाजातील हे सुशिक्षित लोक आहेत. त्यांनी उद्या लंगोटी लावली नाही तर लंगोटी लावणे हा क्रायटेरिया असू शकतो काय? उच्च शिक्षण घेऊन त्यांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14039....

श्री. भाई जगताप.....

त्यांचे राहणीमान सुधारावयाचे नाही काय? या विशिष्ट केसेस आहेत. कोणाच्या तरी दबावाला बळी पडून त्यांच्यावर अन्याय होत असल्यामुळे आम्ही हा प्रश्न या सभागृहात वारंवर उपस्थित करीत आहोत. मंत्री महोदयांनी या वैयक्तिक केसेस आहेत असे सांगितले आहे. या सगळया वैयक्तिक केसेस कन्सिडर करुन त्यांच्या पूर्वजांना जशी प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत तशी त्यांच्या मुलांना देण्यात येतील काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. शिल्पा विष्णू ठाकूर या पिटिशनमध्ये हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे आणि प्रत्येक प्रकरण स्वतंत्ररित्या तपासण्यात यावे, अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. ही प्रकरणे कशा प्रकारे तपासावित याबद्दल सांगितलेले आहे. ज्यांनी अर्ज केला आहे, त्यांनी पुरावे सादर करावयाचे आहेत. जात पडताळणी करण्याच्या संदर्भात समितीला ज्या अडचणी होत्या, त्या सोडविण्यात आलेल्या आहेत. त्या ठिकाणी स्टाफ आणि संगणक दिलेले आहे. त्यामुळे आता हे जात पडताळणीचे काम लवकर होईल. या सगळया छाननीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, प्रत्येक प्रकरण वेगळे तपासण्या एवढा हा समाज मोठा नाही. हा समाज अत्यल्प आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील एक दोन तालुक्यातील काही गावातच हा समाज आहे. केवळ सात हजार लोकांची यांची वस्ती आहे. भिंगवडी आणि आचरा या गावात हा समाज रहातो. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी उल्लेख केल्याप्रमाणे 12 कला अवगत असलेला असा हा समाज आहे. एक-एक प्रकरण न तपासता या संपूर्ण समाजाला अनुसूचित जमातीच्या सूचीमध्ये घेण्याच्या संबंधात शासन गांभीर्याने विचार करणार आहे काय? ज्यावेळी या सूची ठरविण्यात आल्या, त्यावेळी काही समाज दुर्दैवाने वगळले गेले आहेत, त्यामुळे या समाजावर अन्याय होणार नाही, अशा प्रकारचा निर्णय माननीय मंत्री घेतली काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ठाकूर, ब-ठाकूर, र-ठाकूर यांना सर्वांना केंद्र सरकारने 1976 सालीच अनूसूचित जातीमध्ये समाविष्ट केलेले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आदेश सुधारणा कायदा, 1976 मधील अनुसूचित जातीच्या यादीत अनुक्रमांक 44 वर ठाकूर, ठाकर, का-ठाकूर, का-ठाकर, मा-ठाकूर, मा-ठाकर जमाती नमूद केलल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14039 ..... श्री. बबनराव पाचपुते... ..

अनुसूचित जमातीबाबत ठाकूर व ठाकर इत्यादी जातींसाठी तहसीलदार आणि प्रांत कचेरीमध्ये स्वतंत्र दाखले दिले जातात. जात पडताळणीच्या संदर्भात हायकोर्टात केस झालेली आहे आणि त्या पध्दतीने तपासणी करुन त्यावर निर्णय घेतला जातो.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : (पुरवणी) विनियोजन विधेयक.

L.A. BILL NO. VIII OF 2011

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2011.)

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 8 - दिनांक 31 मार्च, 2011 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही. )

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मला आताच अशी माहिती मिळाली की, विधानसभेच्या जवळपास 9 सन्माननीय सदस्यांना 31 डिसेंबरपर्यंत निलंबित करण्यात आलेले आहे. खरे म्हणजे विधानसभा सभागृहाचे काम स्वतंत्रपणे चालते आणि विधान परिषद सभागृहाचे काम स्वतंत्रपणे चालते. परंतु ज्या पध्दतीने त्यांना निलंबित करण्यात आले त्यावरुन सरकारचा जो रोख आहे, काल अर्थसंकल्प मांडला गेल्यानंतर अर्थसंकल्पामध्ये....

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, त्याचा या ठिकाणी काही संबंध नाही.

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मध्ये बोलू नये.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्यांनी मला बोलू द्यावे.

**उप सभापती** : या औचित्याच्या मुद्याबाबतचा निर्णय मी देणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली होती आणि मी त्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मी याबाबत निर्णय देईन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, विधानसभा सभागृह स्वतंत्र आहे आणि विधान परिषद सभागृह स्वतंत्र आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी हरकत घेण्याचे काहीही कारण नाही. ते आम्हालाच समजते. मागच्या कालखंडामध्ये आपल्या सभागृहामध्ये सुध्दा असाच प्रकार घडला होता. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपल्या जागेवर उभे असताना, काही कारण नसताना त्यांना निलंबित करण्यात आले होते. सरकारची ही जी कृती आहे ती अत्यंत दादागिरीची आहे. अशा पध्दतीने निलंबन करुन विरोधी पक्षाच्या

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सन्माननीय सदस्यांचा आवाज दाबण्याचा जर प्रयत्न होत असेल तो निषेधार्ह आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये प्रत्येक सदस्याला विधान परिषदेच्या नियमाप्रमाणे या ठिकाणी वागण्याचा, बोलण्याचा अधिकार आहे. आपल्या सभागृहामध्ये एकदा असा प्रकार घडल्यानंतर पुन्हा जर आपल्या सभागृहात असे व्हावयास लागले, विधानसभा सभागृहामध्ये जो प्रकार घडला तो जर आपल्या सभागृहामध्ये आला तर आम्हाला या ठिकाणी काम करणे मुश्कील होईल. या सभागृहामध्ये असा प्रकार एकदा झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते जागेवर बसलेले असताना त्यांना निलंबित केले गेले होते. त्याची पुनरावृत्ती या ठिकाणी होऊ नये. मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्या पध्दतीने विधानसभा सभागृहामध्ये झाले तसे त्या पध्दतीने या सभागृहामध्ये होऊ नये. आम्ही या घटनेचा तीव्र शब्दामध्ये निषेध करतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विधानसभा सभागृहामध्ये ज्या सन्माननीय सदस्यांना निलंबित केले त्याबाबतचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

तो प्रकार येथे होऊ नये अशा भावना व्यक्त केल्या. त्यांच्या भावनांचा आम्ही सगळेच आदर करतो. विधानसभेच्या सभागृहामध्ये जो प्रकार घडला त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर हे तेथे नव्हते. मी त्या सभागृहात उपस्थित होतो. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अशी घटना आजतागायत घडलेली नाही. लोकसभेमध्ये मागील काळामध्ये विरोधी पक्षाकडून सातत्याने कामकाजावर बहिष्कार घालण्यात आला होता, त्यामुळे तेथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु लोकसभेमध्ये माननीय अर्थमंत्री देशाचा अर्थसंकल्प मांडत असताना विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी माननीय अर्थमंत्र्यांचे संपूर्ण भाषण ऐकले, त्यांना अर्थसंकल्प मांडू दिला. संजय गांधी निराधार योजनेच्या अध्यक्षपदासाठी सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला होता. विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष यांच्या उपस्थितीमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री व वरिष्ठ मंत्री यांची एक बैठक झाली. या बैठकीमध्ये या संदर्भात उचित तोडगा काढण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले होते. परंतु तेथे जो प्रकार घडला तो पूर्वनियोजित होता. सभागृहात काही सन्माननीय सदस्य बॅनर घेऊन आले होते, हातामध्ये स्टीकर्स घेऊन आले होते. त्या सन्माननीय सदस्यांना वारंवार विनंती करण्यामध्ये जवळजवळ 11-12 मिनिटे गेली. अर्थसंकल्प सादर करण्याची ठराविक वेळ असते. माननीय अध्यक्षांनी त्या सन्माननीय सदस्यांना विनंती करुनही ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. माननीय उप मुख्यमंत्री अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन करीत होते त्या जागेपर्यंत जाऊन त्यांच्या तोंडासमोर बॅनर धरुन, त्यांचा माईक हातामध्ये धरुन त्यांना डिस्टर्ब करण्यासाठी असे अचकटविचकट प्रकार करण्यात आले हे लोकशाहीला लांच्छनास्पद आहे. आम्ही देखील अशा आक्रमकपणातून गेलेलो आहोत. पण काही मर्यादा, नीतीमूल्ये पाळावी लागतात. तसा प्रकार या सभागृहामध्ये झाला नाही, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले. या सभागृहाची वेगळी ओळख आहे, प्रतिष्ठा आहे. या सदनाच्या सन्माननीय सदस्यांकडून ही प्रतिष्ठा राखली जाईल असा मला विश्वास असल्यामुळे सरकार विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांबाबत आकसाने कारवाई करणार नाही हे मी शासनाच्या वतीने सांगतो.

2....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सत्तारुढ पक्षाच्या प्रवृत्तीचा हा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या वक्तव्यातून म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये अशी म्हण येत असते. ते नेहमी म्हातारीला मारतात, पण काळ सोकावत आहे. सन्माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांनी त्यांचे मत मांडलेले आहे. विधानवसभेच्या सभागृहात जो प्रकार झाला त्यावेळी आम्ही गॅलरीमध्ये बसलो होतो. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी हौद्यात येऊन निदर्शने केली आणि ते त्यांच्या निलंबनाचे कारण होणार असेल तर ते गंभीर आहे. सत्तारुढ पक्षामध्ये प्रचंड संख्याबळ असल्यामुळे ते सभागृहाचे सर्व कामकाज करु शकतात. पण लोकशाहीमध्ये हे अभिप्रेत नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी सरकारच्या प्रवृत्तीबाबत आम्ही बोलणारच आहोत. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सरकार कसे मोजते, विरोधी पक्षाकडे बघण्याची सरकारची प्रवृत्ती कशी आहे, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या बोलण्याचा शासनाकडून कोणत्या पध्दतीने अर्थ घेतला जातो, हे आपण पहा. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांवर बुलडोझर कसे फिरविता येईल, विरोधी पक्षाच्या सदस्यांना साफ कसे करता येईल. या प्रवृत्तीने सरकार पुढे जात आहे, हा विषय यामध्ये आहे. हौद्यामध्ये गेल्यानंतर सन्माननीय सदस्यांवर निलंबनाची कारवाई होणार असेल तर उद्या हीच प्रवृत्ती या सभागृहात येईल. आम्ही सत्तारुढ आहोत, आमचे संख्याबळ मजबूत आहे. सरकार विरोधी पक्षाला जुमानणार नाही. पण लोकशाही पध्दतीमध्ये असे चालत नाही. वरिष्ठ सभागृहाने मार्गदर्शन करावयाचे असते. अशा प्रवृत्ती घडत असतील तर वरिष्ठ सभागृहाचे मार्गदर्शन करण्याचे काम आहे. विधिमंडळाच्या संपूर्ण कामकाजामध्ये विधानपरिषदेच्या सभागृहात व विधानसभेच्या सभागृहामध्ये कामकाज करीत असताना आमच्या सदस्यांकडून चूका झाल्या असतील तर त्याबाबत आम्ही त्यांना सांगू, आता तो विषय नाही. पण हे अशा पध्दतीने चालणार असेल तर त्याबाबत मार्गदर्शन करणे हे वरिष्ठ सभागृहाचे कामच आहे. आम्ही हे अनुभवलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांना त्यावेळी का निलंबित केले होते ते समजले नाही. सन्माननीय सदस्य श्री.सावंत यांनी एक पुस्तक उचलले होते त्यांना निलंबित करण्यात आले होते. माझ्या निलंबनाबाबत मी विचारणा केली असता मला अद्याप उत्तरच मिळलेले नाही. मला का निलंबित करण्यात आले होते हे मी अजूनही विचारत आहे. मी आज सकाळी सन्माननीय विरोधी

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

पक्ष नेत्यांना सांगितले होते की, सभागृहात गोंधळ होणार असेल तर मी सभागृहात येणार नाही, मला विधेयकांवर बोलावयाचे आहे. माझे निलंबन झाले होते त्यासाठी प्रधान सचिवांची समिती नेमली होती. त्या प्रधान सचिवांच्या समितीचा पत्ताच नाही. त्या समितीची एकही बैठक झालेली नाही, मला तर बोलविलेले नाहीच. या विषयाला 2 वर्षे झालेली आहेत. म्हणजे निभावून न्यावयाचे, अशा प्रकारे अन्याय करावयाचा, सत्तेचा जबरदस्तीने वापर करावयाचा, विरोधी पक्षाला चेपावयाचे, चेपल्याबद्दल दुःख नाही, यासाठी जी समिती नेमली आहे, त्याची अंमलबावणी करावयाची नाही. प्रधान सचिव समितीची बैठक झाली आहे का ते सभागृहात सांगावे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

श्री. दिवाकर रावते...

म्हणजे हा जो काही सत्तेचा मस्त.... सभापती महोदय, कोणते शब्द वापरायचे हे मला समजत नाही. कारण शब्द वापरले तर ते काढून टाकण्याची मागणी होते. त्यासंबंधी मी नंतर बोलणार आहे. मी व्यवस्थित सांगेन. सभापती महोदय, असे करणे कितपत योग्य आणि अयोग्य आहे त्यावर आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे आणि त्याप्रमाणे आम्ही बोलूच. परंतु वरच्या सभागृहाने गांभीर्याने दखल घेऊन एखाद्या गोष्टीबाबत मार्गदर्शन केले तर त्यामध्ये काही गैर आहे असे वाटत नाही. सभापती महोदय, आम्हाला यासंदर्भात प्रवृत्तीचा निषेध करावयाचा आहे. विधानसभेमध्ये काही सन्माननीय सदस्यांचे निलंबन करण्यात आले. या पध्दतीने सरकार वागणार असेल आणि उद्या, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप नेहमी म्हणतात त्याप्रमाणे, जर तीच पध्दत सोकावली तर ते फार गंभीर होईल. ती संपूर्ण समस्या इथपर्यन्त येत असेल तर ती आधीच रोखली गेली पाहिजे. त्यादृष्टीने या सभागृहामध्ये आपल्या भावना व्यक्त झाल्या पाहिजे अशा आग्रही मताचा मी आहे. म्हणून माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी मांडलेल्या मुद्याच्या समर्थनार्थ मी माझ्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

(सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे व सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे बोलण्यासाठी परवानगी मागत असतात.)

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, खरे म्हणजे विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह आहे...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला देखील बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. सभागृहापुढे खूप कामकाज आहे. या विषयावर मी विरोधी तसेच सत्ताधारी पक्षातील दोन-दोन सदस्यांना बोलण्याची परवानगी दिली आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझ्या ऐवजी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो...(अडथळा).. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले आणि मी, आम्ही सहकारी आहोत. त्यामुळे विरोधी पक्षाने त्याची काळजी करु नये...

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे....

सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी काल विधानसभेमध्ये जी काही घटना घडली त्याबद्दलची चिंता या सभागृहामध्ये व्यक्त केली. सन्माननीय राज्यमंत्री श्री. भास्करराव जाधव यांनी सांगितले की, या सभागृहाचा चांगला नावलौकिक आहे, या सभागृहाच्या चांगल्या प्रथा, परंपरा आहेत. याचे कारण असे की, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या आपापल्या कार्यातून,वर्तनातून हा नावलौकिक वाढलेला आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, विरोधी पक्षाने याबाबतीत तशी चिंता करण्याची गरज नाही. काल विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेत्यांनी जाणीवपूर्वक आणि मुद्दाम गोंधळ घातला. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी राज्याला अतिशय चांगला अर्थसंकल्प देऊ केला होता. तो अर्थसंकल्प लोकापर्यन्त जाऊ नये अशा प्रकारची जी तजवीज विधानसभेतील विरोधी पक्षाने केली तसा प्रकार विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते करणार नाहीत. कारण ते चांगले आहेत. चांगल्या माणसाला भीती बाळगण्याचे, काळजी करण्याचे कारण नाही. विधानसभेतील सन्माननीय सदस्यांनी अतिशय वाईट पध्दतीने जो गोंधळ घातला तो योग्य नव्हता. विधान परिषदेतील विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य तसा गोंधळ येथे करणार नाहीत. ते अतिशय चांगले आहेत. सज्जन आहेत. विधानसभेतील विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य तसे कदाचित नसतील. म्हणून त्यांना तशा पध्दतीने निलंबित व्हावे लागले.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी येथील विरोधी पक्षाबाबत चांगले बोलत आहे. विधानसभेतील विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य चांगले वागत नसल्यामुळे, वाईट वर्तन करीत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली असेल. येथे विरोधी पक्ष चांगल्या त-हेने वागत आहे. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चिंता करण्याचे, काळजी करण्याचे कारण नाही. विधानसभेतील सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आले कारण त्यांनी तशा प्रकारचा कट रचला, अर्थसंकल्पावरील भाषण चालू असताना गोंधळ घातला. राज्यातील लोकांपर्यन्त अर्थसंकल्प जाऊ नये म्हणून गोंधळ घातला. अशा पध्दतीचे वाईट वर्तन येथील सन्माननीय सदस्य करत नाहीत. येथील सन्माननीय सदस्य सौजन्याने वर्तणूक करतात...

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.विनायक मेटे..........

खालच्या सभागृहात सौजन्य दाखविले जात नाही. या सभागृहात चांगल्या परंपरा पाळल्या जातात. त्या परंपरा धुळीस मिळविण्याचे काम विरोधी पक्षाकडून खालच्या सभागृहात केले गेले. त्यामुळे यांनी चिंता करण्याचे कारण नाही असे माझे म्हणणे आहे. अशा पध्दतीने हरकत घेणे चुकीचे आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**उप सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.01 ते 2.30 पर्यंत स्थगित झाली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, खालच्या सभागृहात काल जी गोष्ट घडली त्यासंबंधीचा विषय या सभागृहात उपस्थित करण्यात आला तेव्हा मी सुरुवातीलाच सांगितले होते की, खालच्या सभागृहातील विषय खालच्या सभागृहात, येथे त्याचा संबंध नाही. परंतु त्या निमित्ताने जे निलंबनाचे प्रकरण घडले त्यामुळे आमच्या मनात एक प्रकारे भीती निर्माण झालेली आहे. कारण या सभागृहात सुध्दा पूर्वी असाच एक निलंबनाचा विषय झाला असता सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते हे आपल्या आसनावर असलेले असतानाही त्यांना निलंबित करण्यात आले होते. अशा प्रकारे सरकारकडून बहुमताच्या जोरावर दबाव तंत्र चालू आहे त्यामुळे मी तेव्हा या कृतीचा निषेध सुध्दा केला होता. आज देखील सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी खालच्या सभागृहातील माननीय विरोधी पक्षनेत्यांवर कटकारस्थान करुन सभागृह बंद पाडण्याचा प्रयत्न केला असे हेत्वारोप केले. वास्तविक खालच्या सभागृहाचे विरोधी पक्षनेते हे खालच्या सभागृहाचे सदस्य आहेत. कालच या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी माझ्या वक्तव्यावर आक्षेप घेतला असता मी मान्य केले. असे असताना सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी, मात्र खालच्या सभागृहातील विरोधी पक्षनेत्यांवर अशा प्रकारे कटकारस्थान करुन सभागृह बंद पाडण्याचा आरोप करण्यात आला ते वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकले पाहिजे, अशी मी विनंती करतो.

( दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य घोषणा-प्रतिघोषणा देत असतात )

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे,

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाचा सन 2005-06 व 2006-07 चा अनुक्रमे छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----------

श्री. राजेंद्र गावित : महोदय, मी आपल्या अनुमतीने धुळे-नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचा सन 2008-09 चा विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

श्री. राजेंद्र गावित : महोदय, कापूस बाजार कामगार मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2009-10 चा अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

( दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य घोषणा-प्रतिघोषणा देत असतात )

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. उल्हास पवार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करता

शुक्रवार, दिनांक 25 मार्च, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 24 मार्च, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

**शुक्रवार, दिनांक 18 मार्च, 2011 रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव**

1. डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव क्र. 18 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांचा ठराव क्र. 41 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>**

1. श्रीमती अलका देसाई, वि.प.स. - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**उप सभापती** : अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) मौ. शहापूर, धेरंड, थेरोंडा, बाजारपाडा आदि किनारपट्टीतील गावांना दि. 22.3.2010 रोजी समुद्राच्या मोठ्या उधाणाच्या पाण्यामुळे खांडी पडणे, या उधाणामुळे मच्छीमार बोटींचे झालेले नुकसान तसेच शेतीमध्ये समुद्राचे पाणी घुसल्यामुळे जमिनीची झालेली हानी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "गत दोन वर्षांमध्ये मीरा-भाईंदर महानगर पालिकेतील अनेक अधिकारी/कर्मचाऱ्यांना गंभीर कारणास्तव निलंबित करण्यात येणे, महासभेची मान्यता नसताना काही अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी यांनी "अकोला महानगरपालिका विकास नियमावलीनुसार परवानगी देण्यात येणे, मात्र कोणत्याही भोगवटा प्रमाणपत्र, बांधकाम प्रमाणपत्र देण्याची पध्दत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबई महानगरपालिकेने चेंज ऑफ युजर प्रमाणपत्र नसलेल्या मुंबईतील 693 नर्सिंग होमवर नुकताच ठोठावण्यात आलेला दंड " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उप सभापती** ....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दि. 11.3.2011 रोजी मोनिका किरणापुरे या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचा भर दिवसा झालेला खून" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथील उपविभागीय अधिकारी श्री. तेजूसिंग पवार यांचेकडे धामणगांव नगरपरिषदेच्या विविध विकास कामांची अनेक प्रकरणे सन 2008 पासून प्रलंबित असणे, परिणामी नगरपरिषदेचे व लोकांचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी "तहसीलदार, कणकवली (जि. सिंधुदुर्ग) कार्यालयाने श्री. अनंत मांडवकर यांनी केलेले अतिक्रमण न हटविल्यामुळे ग्रामस्थांचा अनेक वर्षांचा असलेला रस्ता बंद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "उस्मानाबाद नगरपालिकेने युबीआयएसएमपी या योजनेअंतर्गत काढलेल्या निविदेच्या प्रक्रियेमध्ये आढळून आलेली अनियमितता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.अन्य नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

...3..



(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विविध पदांच्या सेवा पूर्व परीक्षेत झालेली अनियमितता

**मु. शी.** : लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विविध पदांच्या सेवा पूर्व परीक्षेत झालेली अनियमितता या बाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, धनंजय मुंडे यांनी,"लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विविध पदांच्या सेवा पूर्व परीक्षेत झालेली अनियमितता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : कुंडलवाडी ता. बिलोली, जि.नांदेड येथील आश्रम शाळेच्या शिक्षकांच्या वेतनासंबंधी

**मु. शी.** : कुंडलवाडी ता. बिलोली, जि.नांदेड येथील आश्रम शाळेच्या शिक्षकांच्या वेतनासंबंधी या बाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, श्री. पांडुरंग फुंडकर यांनी,"कुंडलवाडी ता. बिलोली, जि.नांदेड येथील आश्रम शाळेच्या शिक्षकांच्या वेतनासंबंधी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : टागोर नगर, विक्रोळी, मुंबई, येथील बैठया चाळीच्या पुनर्विकासामध्ये मल्टीपल ऑप्शन्स कंपनीकडून रहिवाशांची होत असलेली फसवणूक

**मु. शी.** :टागोर नगर, विक्रोळी, मुंबई, येथील बैठया चाळीच्या पुनर्विकासामध्ये मल्टीपल ऑप्शन्स कंपनीकडून रहिवाशांची होत असलेली फसवणूक याबाबत श्री. कपिल पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील यांनी,"टागोर नगर, विक्रोळी, मुंबई, येथील बैठया चाळीच्या पुनर्विकासामध्ये मल्टीपल ऑपशन्स कंपनीकडून रहिवाशांची होत असलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 6...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी**. : मानोरा(जि.वाशीम) येथील गट शिक्षण अधिका-यांनी लोकप्रतिनिधींना दिलेली अपमानास्पद वागणूक

**मु. शी**. : मानोरा(जि.वाशीम) येथील गट शिक्षण अधिका-यांनी लोकप्रतिनिधींना दिलेली अपमानास्पद वागणूक या बाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, श्री.जयंत प्र.पाटील यांनी,"मानोरा(जि.वाशीम) येथील गट शिक्षण अधिका-यांनी लोकप्रतिनिधींना दिलेली अपमानास्पद वागणूक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी**. : मराठवाडयातील विविध भागात फेब्रुवारी महिन्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतीचे झालेले नुकसान

**मु. शी**. : मराठवाडयातील विविध भागात फेब्रुवारी महिन्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतीचे झालेले नुकसान या बाबत सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, श्री./सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, पाशा पटेल यांनी,"मराठवाडयातील विविध भागात फेब्रुवारी महिन्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतीचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : मौजे कल्याण, ता.अंधेरी येथील ए.एच.वाडीया ट्रस्टच्या जमिनी खाजगी विकासकांना देणे

**मु. शी.** : मौजे कल्याण, ता.अंधेरी येथील ए.एच.वाडीया ट्रस्टच्या जमिनी खाजगी विकासकांना देणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, श्री.परशुराम उपरकर यांनी,"मौजे कल्याण, ता.अंधेरी येथील ए.एच.वाडीया ट्रस्टच्या जमिनी खाजगी विकासकांना देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...9 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**पृ. शी.** : मुंबईतील जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात काम करणा-या प्रगणकांना अद्यापि मोबदला न मिळणे

**मु. शी.** : मुंबईतील जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात काम करणा-या प्रगणकांना अद्यापि मोबदला न मिळणे या बाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, यांनी,"मुंबईतील जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात काम करणा-या प्रगणकांना अद्यापि मोबदला न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...10 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

**पृ.शी**. : पुणे शहरातील महिला स्वच्छतागृहासाठी अर्थसंकल्पात दीड कोटी रुपयांची तरतूद करुनही फेब्रुवारी,2011 पर्यंत स्वच्छतागृहे न बांधणे

**मु.शी**.: पुणे शहरातील महिला स्वच्छतागृहासाठी अर्थसंकल्पात दीड कोटी रुपयांची तरतूद करुनही फेब्रुवारी,2011 पर्यंत स्वच्छतागृहे न बांधणे या संबंधी सर्वश्री अनिल भोसले, हेमंत टकले, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

----

**पृ.शी**.: माध्यमिक परीक्षेच्या इंग्रजी पेपर मध्ये असलेल्या चुका

**मु.शी**.: माध्यमिक परीक्षेच्या इंग्रजी पेपर मध्ये असलेल्या चुका या संबंधी सर्वश्री विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री रमेश शेंडगे, हेमंत टकले, सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

-----

**पृ.शी**.: मुंबई गोवा मार्गावरील वाढत्या रहदारीमुळे अपघातामध्ये होत असलेली वाढ

**मु.शी**.:मुंबई गोवा मार्गावरील वाढत्या रहदारीमुळे अपघातामध्ये होत असलेली वाढ या संबंधी सर्वश्री परशुराम उपरकर, रामदास कदम, डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ पूर्वी श्री. खर्चे पी.

14:35

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत**</u>

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवरील चौथ्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांची असून सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

----

**पृ.शी.**: कांदा दरात अचानक घसरण झाल्यामुळे शेतक-यांचे होत असलेले नुकसान

**मु.शी.**: कांदा दरात अचानक घसरण झाल्यामुळे शेतक-यांचे होत असलेले नुकसान या संबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री सय्यद पाशा पटेल, धनंजय मुंडे, संजय केळकर यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

----

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 6 बाबत**</u>

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवरील सहाव्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चौधरी यांची असून सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

-----

..12..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबत**

**उप सभापती** : आजच्या विशेष उल्लेखाच्या सूचना नंतर घेण्यात येतील.

...13...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विद्यापीठ सुधारणा विधेयक

L. C. BILL NO. I OF 2011 ( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994. ) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 1, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांचा प्रस्ताव आहे त्यांच्या पैकी एकाने तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही. )

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 1 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 1 संमत झाले आहे.

----

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

...14..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**वि.स.वि. क्रमांक 89 बाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेले सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 89 पुढे ढकलण्यात येत आहे.

**नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात येत आहे.

सभागृहापुढील आजचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 25 मार्च, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 38 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 25 मार्च,2011 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही